• पुणे, शुक्रवार, ३० मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 181 • वर्ष ४ थे, अंक १८१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




'टोपीबहाद्दर' गुरूजींना प्रशासनाची 'छडी'

P३






१२

## At a Glance

### महागाई भत्त्यात २% वाढ जाहीर

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला असून. गुरूवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्र सरकारने महागाई भत्ता आणि महागाई सवलत २ टक्क्यांनी वाढवण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता डीए/डीआर ५३ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांवर गेला आहे. ही वाढ ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार » पान ७ वर

### रविवारी कुंभमेळा तयारीचा शंखनाद

**नाशिक :** नाशिकमध्ये दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. प्रयागराज येथील कुंभमेळ्यानंतर आता आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२६-२७ मध्ये नाशिक येथे होणार आहे. रविवार दि. १ जून रोजी यासंदर्भातील एक महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे.
या बैठकीचे अध्यक्षस्थान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भूषवतील. या वेळी तेरा आखाड्यांचे » पान ७ वर

# मनपा: महायुतीचे स्वबळ ?

## भाजपला सर्वाधिक फायदा, राष्ट्रवादी आणि शिवसेनेला फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेच्या येत्या निवडणुकीत महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे तीनही पक्ष स्वतंत्र निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. महायुतीच्या घटक पक्षांनी स्वबळावर ही निवडणूक लढवल्यास, त्याचा सर्वाधिक फायदा भाजपला होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेला मात्र फटका बसण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने राष्ट्रवादीकडे आता स्वतःची व्होट बँक नसल्याने निवडणुकीला सामोरे जाताना या पक्षाची मोठी कोंडी होणार असल्याचे स्पष्ट आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात अधिक जागांची मागणी केल्याने महापालिका निवडणुकीत स्वबळाची तयारी करण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपच्या नेत्यांना दिल्याचे समजते. त्यामुळे आता महायुतीमधील सर्व घटकपक्षांनी स्वतंत्र निवडणूक लढविल्यास नक्की कोणाला फायदा होणार आणि कोणाला तोटा होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. सध्याची पुण्याची राजकीय परिस्थिती पाहता भाजपची प्रचंड मोठी यंत्रणा आहे. याशिवाय मातब्बर इच्छुकही पक्षाकडे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भाजपची हक्काची व्होट बँक असून, ती भाजपबरोबर कायम राहिल्यास त्याचा मोठा फायदा या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला होणार आहे.

यात राष्ट्रवादी काँग्रेसचा मात्र कस लागणार आहे. राष्ट्रवादीचे प्राबल्य असलेल्या उपनगरांतील भागामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात परप्रांतीय मतदारवर्ग वाढला आहे. सोसायटी असलेल्या भागातील मतदार हा भाजपसमवेत कायम राहत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यात भाजपच्या उमेदवारांना या मतदारांची पसंती मिळू शकते. राज्यात भाजपसमवेत असल्याने दलित आणि मुस्लिम मतदारही राष्ट्रवादीपासून सध्या दूरच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे चारच्या प्रभागात राष्ट्रवादीची कोंडी होणार असून, राष्ट्रवादीला भाजपसमवेतच महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा सामना करावा लागेल. » पान ७ वर





### महायुतीचा विरोधकांना फायदा

● भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांची महायुती झाल्यास या तीनही पक्षांमध्ये बंडखोरी होऊन त्याचा फायदा अनेक सक्षम उमेदवार आघाडीला आयते मिळू शकतात. त्यामुळे महायुतीमधील बंडखोरीचा फायदा थेट मत विभाजनातूनही आघाडीच्या उमेदवारांना होऊ शकतो. त्यासाठीच हे तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवतील, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# छत्रपती शिवरायांचा इतिहास ६८ शब्दांत

## सीबीएसई पॅटर्नवर आक्षेप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचं जीवन चरित्र एका पुस्तकात मांडता येणार नाही. त्यांच्या कर्तृत्वाची गाथा सांगणारे पुस्तकाचे खंडच काढावे लागतील. सीबीएसई बोर्डला मात्र हे पटत नसावं. विशेष म्हणजे राज्य सरकारकडून येणाऱ्या नवीन शैक्षणिक वर्षात नवीन 'सीबीएसई पॅटर्न' राज्यात शैक्षणिक धोरणानुसार लागू करण्यात येणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसईच्या) शाळांमध्ये इयत्ता चौथी ते बारावी पर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर फक्त एक धडा असून केवळ ६८ शब्दांमध्ये शिवरायांचा इतिहास मांडण्यात आला आहे. आता यावर अखिल भारतीय मराठा महासंघाने आक्षेप घेतला असून सरकार छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास पूर्ण मांडावा, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा देण्यात आला आहे. अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीनं आज पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी याबाबत भूमिका मांडली.

**अभ्यासक्रम**

यावेळी मराठा महासंघाचे सचिन आडेकर म्हणाले की, सीबीएसईच्या शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि त्यांनी उभ्या केलेल्या स्वराज्याबद्दल केवळ ६८ शब्दांमध्ये इतिहास सांगून सीबीएसई बोर्डाने छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच महाराष्ट्राचादेखील अपमान केला आहे. वास्तविक छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही, » पान ७ वर

# सोने साठ्यात विक्रमी वाढ

## भारतीय रिझर्व्ह बँकेची धमाकेदार कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेला देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य खांब मानला जातो. भारतीय रिझर्व्ह बँक(आरबीआय) ने २०२४-२५ या आर्थिक वर्षात धमाकेदार कामगिरी केली आहे. आरबीआयने सोन्याच्या खरेदीत नवा विक्रम केला असून केंद्राला दिलेल्या नफ्यातही विक्रमी वाढ झाली आहे. हे आकडे भारताच्या आर्थिक आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. नुकतेच भारतीय अर्थव्यवस्थेने जपानच्या अर्थव्यवस्थेला मागे टाकल्याची बातमी आली होती.

या आर्थिक वर्षात आरबीआयने ५७.५ टन नवीन सोने खरेदी केले आहे. यामुळे त्यांचा एकूण सोन्याचा साठा ८७९.५८ टन झाला आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत ७% जास्त आहे. जागतिक अनिश्चितता आणि डॉलरच्या चढ-उतार लक्षात घेता, आरबीआय आता सोन्याला एक मजबूत राखीव मालमत्ता म्हणून पाहत आहे. हा निर्णय भविष्यातील कोणत्याही आर्थिक संकटाचा सामना करण्यास भारताला अधिक बळ देईल.

आरबीआयच्या ताज्या अहवालानुसार, सोन्याचे मूल्यांकन दररोज लंडन बुलियन मार्केट असोसिएशन च्या सोन्याच्या किमतीच्या ९०% आणि रुपया-डॉलर विनिमय दरावर आधारित असते. या मूल्यांकनातून होणारा नफा किंवा तोटा चलन आणि सोने पुनर्मूल्यांकन खात्यात नोंदवला जातो. एकूण परकीय चलन साठा देखील ५.९५% ने वाढून ५७.१२ लाख कोटी रुपये झाला आहे. आरबीआयच्या » पान ७ वर




### भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग सर्वाधिक

● रिझर्व्ह बँकेचा ताळेबंद मार्च २०२५ पर्यंत वाढून ७६.२५ लाख कोटी रुपयांवर पोहोचला असून, परकीय चलन व्यवहारात सुमारे ३३ टक्के वाढ झाली असून, त्यामुळे केंद्र सरकारला २.७ लाख कोटी रुपयांचा बंपर लाभांश मिळाला आहे, असे रिझर्व्ह बँकेच्या गुरुवारी जाहीर झालेल्या वार्षिक अहवालात म्हटले आहे.

### सावरकर आणि गोडसे यांच्यात नातं

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** लोकसभातील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी सावरकर संबंधित मानहानी प्रकरणात एक महत्त्वाचा दावा केला आहे. या प्रकरणात तक्रारदार सत्यकी सावरकर यांचा संबंध महात्मा गांधींचे मारेकरी नथुराम गोडसे यांच्या कुटुंबाशी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

पुण्याच्या विशेष न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात राहुल गांधींनी आरोप केला आहे की, सत्यकी सावरकर हे नथुराम गोडसे यांचे धाकटे भाऊ गोपाळ विनायक गोडसे यांचे नातू आहेत. तक्रारदाराने जाणूनबुजून आणि पद्धतशीरपणे" आपल्या वंशावळीचा खुलासा केला नसल्याचा दावाही राहुल गांधींनी केला आहे. राहुल » पान ७ वर

# महाराष्ट्राचे अभिनंदन!

## सर्वाधिक विदेशी गुंतवणूक राज्यात - देवेंद्र फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आपल्या एक्स अकाऊंट वरून विशेष माहिती महाराष्ट्राला दिली आहे. त्यात त्यांनी थेट परदेशी गुंतवणूकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचे सांगितले आहे. सर्वाधिक परकीय गुंतवणूक ही महाराष्ट्रात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. देशात एकूण परकीय गुंतवणूक आली, त्याच्या जवळपास ४० टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. त्यामुळे परकीय गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास अधिक रस असल्याचे ही पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

याबाबत ट्वीट करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीची (जानेवारी ते मार्च २०२५) आकडेवारी सुद्धा आता जाहीर झाली आहे. आता या संपूर्ण वर्षांत मिळून महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. जी यावर्षी देशात आलेल्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. यावर्षी देशात आलेली गुंतवणूक ही ४,२१,९२९ कोटी रुपये इतकी आहे.



> महाराष्ट्रात गेल्या वर्षीचा विचार केला तर यावर्षी त्यापेक्षा ३२ टक्के गुंतवणूक अधिक आली आहे. या शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत हे वर्ष गेल्या १० वर्षांतील रेकॉर्ड स्थापित करणारे वर्ष ठरले. अर्थात हे रेकॉर्ड आपण पहिल्या ९ महिन्यातच मोडलं होतं. मी महाराष्ट्रातील जनतेचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजितदादा पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड ही अशीच कायम राहील."
>
> **— देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

### आणीबाणीची ५० वर्षे, काँग्रेसची सरकारवर टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा विरोधी पक्ष वारंवार सांगतो आहे की, ऑपरेशन सिंदूर नंतर संसदेचे विशेष अधिवेशन घेतले जावे, पण सरकार या मागणीला प्रत्युत्तर देत नाही. आता आम्हाला असे समजते आहे की, आणीबाणीच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त २५-२६ जून रोजी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा विचार केला जात आहे. वास्तविक आणि अधिक महत्त्वाच्या मुद्द्यांवरून लक्ष वळवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा आणखी एक उत्कृष्ट प्रयत्न असेल, असे प्रतिपादन काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केले आहे.

जयराम रमेश म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर संसदेचे विशेष अधिवेशन » पान ७ वर

**वैष्णवीच्या वडिलांनी आरोपींच्या वकिलांना सुनावले खडे बोल**

# लेकराच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आरोपींचे वकील जे बोलले ते चुकीचं आहे. आरोपींनी माझ्या मुलीचा बळी घेतला आहे. त्यांना वाचवण्यासाठी वकील विषय वेगळीकडे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी आम्हाला चॅटची कल्पना दिलेली नाही आणि त्यावर काहीही भाष्य नाही. माझ्या मुलीच्या चारित्र्यावर संशय घेतला जात आहे.माझी मुलगी तर गेलीच आहे, तुम्हालाही मुलंबाळं असतील. तुम्ही एखाद्याच्या लेकराच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका; अशा शब्दात मयत वैष्णवी हगवणे यांचे वडिल अनिल कस्पटे यांनी आरोपीचे वकिल अ‍ॅड. विपुल दुशिंग यांना खडे बोल सुनावले. हे सांगत असतानाच त्यांना अश्रु अनावर झाले.

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाची सुनावणी बुधवारी संपन्न झाली. या सुनावणीमध्ये आरोपींचे वकील विपुल दुशिंग यांनी कोर्टात वैष्णवीचं चारित्र्य हनन होईल, असे मुद्दे उपस्थित केले. त्या प्रकारामुळे वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी नाराजी व्यक्त केली. गुरुवारी

### वैष्णवीच्या बाबतीतील घटना दुर्दैवी: गौतमी पाटील

● वैष्णवी हगवणेसोबत जे झाले ते दुर्दैवी आहे. मी तिच्या बाजूने आहे. मला कलाकार म्हणून त्या कार्यक्रमात बोलावले होते. आम्ही तिथे कला सादर करतो. मला त्या कार्यक्रमाचे पूर्ण मानधन मिळालें होते. आम्हाला त्यात घेऊ नका, आम्ही फक्त तिथे कला सादर केली होती, असे गौतमी पाटील हिने गुरुवारी सांगितले. गौतमी ही एका कार्यक्रमाला पुण्यात आली होती. त्यानंतर माध्यमांशी तिने संवाद साधला. गौतमी म्हणाली, वैष्णवीच्या आरोपींना कडक शिक्षा मिळावी, अशी मागणी केली आहे. जे झाले आहे ते खूप चुकीचे झाले आहे. या घटनेतून आपल्याला बरेच काही शिकायला मिळत आहे. ज्यांनी ही चूक केली, त्यांना कडक शिक्षा मिळाली पाहिजे.



> आरोपींचे वकील विपुल दुशिंग यांनी कोर्टाला सांगितलं होतं की, हगवणे कुटुंबियांकडे पाच कोटी रुपयांच्या गाड्या आहेत. मग ते फॉर्च्युनरची मागणी कशाला करतील? या मुद्द्यावर बोलताना अनिल कस्पटे म्हणाले, त्यांच्याकडे ही एकच फॉर्च्युनर गाडी आहे. बाकी एकही गाडी नाही. ते खोटं बोलत आहेत."
>
> **— अनिल कस्पटे,** वैष्णवीचे वडिल

### महाराष्ट्रात सापडले पाकिस्तानचे हेर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर भारतामध्ये काम करत असलेलं पाकिस्तानी हेरांचं नेटवर्क उघड होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये देशातील वेगवेगळ्या भागांमध्ये पाकिस्तानच्या हेरांना अटक करण्यात आली आहे. आता ठाण्यातील दहशतवाद विरोधी पथकानं मोठी कारवाई करत ३ पाकिस्तानच्या हेरांना अटक केली आहे.

महाराष्ट्र एटीएसला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे या सर्वांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर पाकिस्तानची गुप्तहेर संस्था पाकिस्तान इंटेलिजन्स ऑपरेटिव्हच्या संपर्कात असल्याचा आणि भारत सरकारने प्रतिबंधित केलेली संवेदनशील व गोपनीय माहिती सोशल मीडियाद्वारे शेअर केल्याचा आरोप आहे. » पान ७ वर

**वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण**

# शशांक, लता, करिश्मा यांना न्यायालयीन कोठडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सासरच्या मानसिक आणि शारिरीक त्रासाला कंटाळून वैष्णवी शशांक हगवणे हिने राहत्या घरात आत्महत्या केली आहे. या घटनेतील आरोपी वैष्णवी हगवणेच्या सासू लता हगवणे, नणंद करिष्मा हगवणे, पती शशांक हगवणे यांची गुरूवारी पोलीस कोठडी संपल्यावर त्यांना सत्र न्यायालयात हजर केलं. यावेळी सत्र न्यायालयानं या तिघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

वैष्णवी हगवणे प्रकरणातील पाचही आरोपींची पोलीस कोठडी बुधवारी संपल्यावर त्यांना न्यायालयात हजर केलं. यावेळी वैष्णवी हगवणेचा पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, करिष्मा हगवणे यांना एक दिवसाची तर, सासरे राजेंद्र आणि सुशील हगवणे यांना ३१ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.आज पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, करिष्मा हगवणे यांना शिवाजीनगर सत्र न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

वैष्णवी हगवणे प्रकरणात बुधवारी न्यायालयात झालेल्या सुनावणीत हगवणे यांच्या वकिलांनी वैष्णवी हगवणे यांच्या चारित्र्यावर संशय व्यक्त करत तिचं नको त्या व्यक्तीसोबत नको ते चॅट सुरु होतं, ते आम्ही पकडलं होतं, असं म्हटलं होत. यानंतर वैष्णवीच्या घरच्यांनी याच खंडन केलं » पान ७ वर

# सर्वोच्च न्यायालयाला मिळाले तीन न्यायाधीश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रपतींनी कॉलेजियमच्या शिफारशींना मंजुरी दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात तीन नव्या न्यायाधीशांच्या नियुक्तीची अधिसूचना जारी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सोमवारी कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एन. व्ही. अंजारिया, गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश विजय बिश्नोई आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर यांच्या नावाची शिफारस केली.

कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचा वापर करून राष्ट्रपतींनी सरन्यायाधीशांशी सल्लामसलत करून कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एन. व्ही. अंजारिया, गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती विजय बिश्नोई आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे.

माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती अभय एस ओक आणि न्यायमूर्ती हृषिकेश रॉय निवृत्त झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या तीन रिक्त जागांसाठी त्यांच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. या » पान ७ वर

# फुकट्यांचा 'पीएमपीएमएल'ला ९१ लाखांचा 'आहेर'...!

**वाहतूक**

### पाच, दहा रुपयांसाठी निर्लज्जांचा 'खेळ': प्रशासनाची धडक कारवाई; चक्कटफुगिरी महागात

**पीएमपी प्रशासनाच्या माहितीनुसार, दररोज ६० ते ७० फुकटे प्रवासी पकडले जातात, तर प्रत्यक्षात ही संख्या याहून अधिक आहे. मागील १२ महिन्यांत एकूण १८,१७० प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामधून ९१ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.**


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अवघ्या पाच ते दहा रुपयांची बचत करण्यासाठी काही प्रवाशांनी निर्लज्जपणाचा अक्षरशः कळस गाठला आहे; त्याबदल्यात तब्बल पाचशे रुपयांचा दंड भरण्याची मर्दुमकी हे प्रवासी दाखवत असून त्यांना वठणीवर आणण्यासाठी 'पीएमपीएमएल' प्रशासनाने ही कारवाई अधिक कडक केली आहे. विशेष म्हणजे या तपासणीत चक्क १८ हजाराहून अधिक फुकटे प्रवासी आढळले आहेत, त्यांच्याकडून तब्बल ९१ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. त्यामुळे त्यांना 'चक्कटफुगिरी' चांगलीच महागात पडली आहे. ही कारवाई अधिक कडक करण्याचा आणि त्यामध्ये सातत्य ठेवण्याचा निर्वाणीचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत लाखो नागरिकांना दररोज वाहतूक सेवा पुरवणाऱ्या पुणे महानगर परिवहन महामंडळासमोर (पीएमपी) विनातिकीट प्रवास मोठी अडचण बनली आहे. बस ताफ्याची संख्या घटलेली असतानाच, उत्पन्नावरही याचा विपरीत परिणाम होत असून, दररोज अनेक प्रवासी तिकीट न काढता बसने प्रवास करत असल्याचे समोर आले आहे.

पीएमपी प्रशासनाच्या माहितीनुसार, दररोज ६० ते ७० फुकटे प्रवासी पकडले जातात, तर प्रत्यक्षात ही संख्या याहून अधिक आहे. मागील १२ महिन्यांत एकूण १८,१७० प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामधून ९१ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. » पान ७ वर



> प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे; विशेष म्हणजे उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातच अशा फुकट्या प्रवाशांमुळे हा तोटा अधिकच वाढत आहे; त्यामुळे त्यांच्यावर जरब बसविण्यासाठी यापुढील कालावधीत कडक मोहिम राबविण्याचे आदेश संबधित विभागाला देण्यात आले आहेत."
>
> **— दीपा मुधोळ-मुंडे,** अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका, पीएमपीएमएल

#रा



## रिक्षावर झाड कोसळले, वृद्ध महिला ठार

**पुणे :** पेशवे उद्यानाच्या शेजारी गुलमोहराचे झाड अचानक कोसळल्याने एक वृद्ध महिला मृत्युमुखी पडली, तर रिक्षाचालक जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात पुन्हा एकदा झाडांमुळे सुरक्षिततेच्या प्रश्नांना उजाळा मिळाला आहे. शुभदा यशवंत सप्रे (वय ७६, रा. आनंदनगर, सिंहगड रस्ता) या महिलेला रिक्षातून नातेवाइकांच्या घरी जात असताना अचानक गुलमोहराचे झाड त्यांच्या रिक्षावर कोसळले. ही घटना नीलायम चित्रपटगृहाजवळून पेशवे उद्यानाच्या मागील बाजूस घडली. गंभीर जखमी झालेल्या सप्रे यांना तातडीने नागरिक आणि अग्निशामक दलाच्या मदतीने खासगी रुग्णालयात दाखल केले गेले, परंतु डॉक्टरांनी डोक्याला लागलेल्या गंभीर जखमेमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले. रिक्षाचालक संजय अवचरे यालाही जखम झाली होती, त्यानंतर प्राथमिक उपचारानंतर त्याला घरी सोडण्यात आले. कर्वेनगर भागात दोन दिवसांपूर्वी झाड कोसळल्यामुळे दुचाकीस्वार राहुल श्रीकांत जोशी (वय ४९, रा. कर्वेनगर) यांचा मृत्यू झाला होता.




## फसवणूक झाल्याने तरुणीची आत्महत्या

**पुणे :** विवाहाचे आमिष दाखवून फसवणूक झाल्याने दोन तरुणींनी आत्महत्या केल्याच्या घटना हडपसर आणि वाघोली येथे घडल्याचे उघडकीस आले आहे. विवाहाच्या आमिषाने फसवणूक केल्याने एका १७ वर्षीय युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागातील फुरसुंगी परिसरात घडली. युवतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका १७ वर्षीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत युवतीच्या आईने फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. १७ वर्षीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी युवक एका महाविद्यालयात अकरावीत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसरमधील फुरसुंगी भागात युवती राहायला आहे. युवतीच्या घराशेजारी आरोपी युवक राहायला आहे. युवकाने तिच्याशी ओळख वाढवून प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर तिला विवाहाचे आमिष दाखविले. दरम्यान, युवती वेगळ्या जातीतील असल्याने युवकाने आपल्या विवाहाला कुटुंबीय मान्यता देणार नाहीत. तू दुसऱ्या जातीतील आहे, असे सांगितले. तेव्हापासून युवती नैराश्यात होती. २३ मे रोजी युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## कात्रज डेअरीच्या दूध दरात वाढ नाही

**पुणे :** सध्या राज्यातील बहुतेक दूध संघांनी दूध विक्री दरात प्रतिलिटर ₹२/- इतकी वाढ केली आहे. मात्र, पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात कात्रज डेअरीने ग्राहकांच्या हिताचा विचार करून गाय दूधाच्या दरात कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे.



या निर्णयामुळे कात्रज डेअरीचे नियमित ग्राहक आर्थिकदृष्ट्या सवलतीचा लाभ घेऊ शकणार आहेत. सध्या कात्रज डेअरीकडून जिरा ताक, लस्सी आणि दही ही दुग्धजन्य उत्पादने अत्यंत माफक दरात विक्री केली जात असून, दर्जात कोणतीही तडजोड न करता उच्च गुणवत्ता कायम ठेवली जात आहे. याचमुळे या वर्षीच्या उन्हाळी हंगामात प्रतिदिन ४५ हजार लिटर ताक विक्रीचा उच्चांक गाठण्यात आला आहे. कात्रज डेअरी पुणे जिल्ह्यातील विविध गावांमधून दूध संकलन करून कमी वेळेत दर्जेदार दूध ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहे. संघाचे चेअरमन स्वप्नील ढमढेरे यांनी दिलेल्या निवेदनात सांगितले की, "सध्या गाय दूधाच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. सर्व ग्राहकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा." तसेच, कात्रज डेअरीने ग्राहकांना आवाहन केले आहे की, दूध दरवाढीच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही वितरकाने अधिक दराची मागणी केल्यास, तात्काळ संघाच्या ग्राहक तक्रार निवारण क्रमांकावर संपर्क साधावा, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

## सन्मान मार्गदर्शकांचा...!




**पुणे** पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचा ४९ वा वर्धापन दिन संपन्न झाला.यात मार्गदर्शक व्याख्यान व उत्तम कामगिरी केलेल्या व्यक्ती व संस्था यांचा स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचा ४९ वा वर्धापन दिन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचा ४९ वा वर्धापन दिन संपन्न झाला. यात मार्गदर्शक व्याख्यान व उत्तम कामगिरी केलेल्या व्यक्ती व संस्था यांचा स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला. ऑटो क्लस्टर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष बाळ पाटील. उपाध्यक्ष प्रदीप तुपे, ऋषिकेश धांडे(TCS चे सीईओ), प्रसाद कुलकर्णी(SAP), सम्राट फडणीस, आदी मान्यवर उपस्थित होते. बाळ पाटील यांनी प्रास्तविक केले त्यात पुणे मॅनेजमेंट असोसिएशनची माहिती दिली. प्रसाद कुलकर्णी यांनी बोलतांना तरुणांनी शहरात न येता खेडोपाडी छोटे उद्योग उभे करावेत असे आवाहन केले. ऋषिकेश धांडे यांनी देशाच्या प्रगती मध्ये सर्व क्षेत्रांत प्रगती हवी असे सांगितले. सम्राट फडणीस यांनी माध्यमांनी विकासासाठी आवश्यक ते विचार समजत रुजवावेत त्याचा आज नाही तर उद्या उपयोग होईल असे प्रतिपादन केले.

# अतीक्रमणांच्या 'तटबंदी'वर 'हातोडा'...!

## सिंहगडावरील अतीक्रमणे भुईसपाट: जिल्हा प्रशासनाची धडक कारवाई

पुण्यापासून अवघ्या तासभराच्या अंतरावर असलेल्या आणि पर्यटकांचे खास आकर्षण असलेल्या ऐतिहासिक अशा सिंहगड किल्ल्यावरील अतीक्रमणांमध्ये दिवसेंदिवस अधिकच वाढ होत आहे, त्यातूनच छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि माँ जिजाऊ साहेब यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या किल्ल्याला अतीक्रमणांचा अक्षरश: 'विळखा' बसला आहे. त्यामुळे या किल्ल्यासह राज्यभरातील सर्व किल्ल्यावरील अतीक्रमणे हटविण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत; त्यानुसार जिल्हा प्रशासनाने त्याची कठोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे हा किल्ला मोकळा श्वास घेणार असून पर्यटकांनाही पर्यटनाचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे.मात्र; हे वास्तव असले तरी त्यामध्ये सातत्य असणे गरजेचे आहे. अन्यथा ही नऊ दिवसांची 'नवलाई'ठरेल हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज पडणार नाही.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड किल्ल्यावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी पुणे वन विभागाने अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरु केली आहे. ३१ मे पर्यंत राज्यातील सर्व किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याच्या राज्य सरकारच्या निर्देशानुसार, गुरुवार, २९ मे रोजी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

पुणे वन विभागाने किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामे आणि स्टॉल्सवर कारवाई केली आहे. अनेक स्थानिक विक्रेत्यांनी शासकीय जमिनीवर खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि इतर व्यवसाय सुरु केले आहेत. किल्ल्याच्या परिसरात अतिक्रमण करणाऱ्या खाजगी मालमत्ता मालकांनाही या मोहिमेत लक्ष्य करण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या तोडफोडीच्या मोहिमेमुळे आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव सिंहगड किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे. या भागात मुसळधार पाऊस पडत असल्याने भूस्खलनाचा धोका वाढला आहे. पुणे वन विभागाने पर्यटकांना पुढील सूचना मिळेपर्यंत पर्यटकांसाठी किल्ला बंद करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सर्व अतिक्रमणे हटवली जात आहेत का? भविष्यात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांपासून किल्ल्यांचे संरक्षण होईल यावर देखरेख ठेवणार आहे. राज्य सरकारने सर्व जिल्हा प्रशासनांना ३१ मे पर्यंत डोंगरी किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशाचे उद्दिष्ट या किल्ल्यांच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वाचे रक्षण करणे आणि सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे. पुणे जिल्हा प्रशासनाने दिलेल्या वेळेत सर्व अतिक्रमणे हटविली जातील असे आश्वासन दिले आहे.

> **ही अतीक्रमणे हटविण्यासाठी संबधित विभागांना सक्त सूचना देण्यात आली आहे; त्यानुसार त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु करण्यात आली असून या कारवाईत सातत्य ठेवण्यात येणार आहे. त्याशिवाय आगामी काळात ही अतीक्रमणे पुन्हा होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येणार आहे.** **-जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

## आरोग्य विभागाची कोरोनासाठी मार्गदर्शक तत्त्वे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात कोरोना रुग्णांचा संख्यात्मक वाढ लक्षात घेऊन आरोग्य विभागाने नवीन उपचार मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या तत्त्वांनुसार रुग्णांच्या वय, स्थिती आणि ऑक्सिजन पातळीच्या आधारावर उपचार पद्धतींमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

नव्या मार्गदर्शकांनुसार, सहव्याधी असलेल्या आणि रुग्णालयात दाखल असलेल्या कोरोना रुग्णांना तीन ते पाच दिवस रेमडेसिव्हीर औषधाचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यामुळे उपचार अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.

सिंगापूर आणि हाँगकाँगसारख्या मोठ्या शहरांमध्ये कोरोना रुग्ण वाढत असल्यामुळे राज्यातही या संसर्गाचा प्रसार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीचे नेतृत्व आरोग्य प्रमुख डॉ. निना बोराडे यांनी केले, तसेच साथी रोग अधिकारी डॉ. वैशाली जाधव, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ डॉ. ज्योती गुरव, ससून रुग्णालयाचे डॉक्टर डॉ. रोहिदास बोरसे, डॉ. संजय गायकवाड, डॉ. राजेश कार्यकर्ते व डॉ. स्मिता सांगडे यांसह इतर तज्ज्ञ उपस्थित होते.

बैठकीत ठरविण्यात आले की, कोरोना संक्रमित असूनही ज्यांना लक्षणे नसतील किंवा अतिशय सौम्य लक्षणे असतील अशा रुग्णांना अँटीव्हायरल औषधे देणे टाळावे. तसेच फ्लूच्या आजारासारख्या लक्षणांवर स्टिरॉइड्स देण्याचा सल्ला दिला जात नाही. डेक्सामेथासोनसारखे स्टिरॉइड्स लिहिण्याचा मार्गदर्शनात स्पष्टपणे विरोध केला आहे.

खासगी रुग्णालयांना कोरोना रुग्णांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोरोना संक्रमितांच्या संपर्कात असलेल्या लोकांनी डॉक्टरांच्या शिफारशीनुसारच चाचण्या कराव्यात, अशी सूचना देण्यात आली आहे. तसेच रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना गरजेनुसार ऑक्सिजन पुरविण्यावर भर देण्यात आला आहे. डी-डायमर पातळी वाढलेल्या रुग्णांवर रक्त पातळ करणाऱ्या गोळ्यांचा उपचार करण्याचे निर्देशही यामध्ये दिले गेले आहेत.

या सर्व उपाययोजनांमुळे कोरोना रुग्णांच्या व्यवस्थापनात सुधारणा होण्यास मदत होईल, अशी आशा आरोग्य विभागाने व्यक्त केली आहे.

## विद्यार्थी हितासाठी आक्रमक होण्याचा हिंदू महासंघाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींबाबत हिंदू महासंघाच्या पालक आघाडीने शिक्षणमंत्री दादा भुसे यांची मुंबई निवासस्थानी भेट घेऊन निवेदन दिले. पालक आघाडीच्या प्रतिनिधींसह हिंदू महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद दवे ,आदिती जोशी, तृप्ती तारे, नितीन शुक्ल,अजित जोशी,.तृप्ती वाकडे,अश्विन वाकडे,कविता दोशी आणि आरती जोशी उपस्थित होते.यावेळी ११ वीच्या प्रवेशाच्या जी.आर. मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत चर्चा करण्यात आली. शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पालक आघाडीला सकारात्मक आश्वासन दिले आहे.परंतु ३ जून २०२५ पर्यंतच प्रवेश प्रक्रियेची मुदत असल्यामुळे पालक आघाडी मागणीबाबत आक्रमक राहणार आहे.

सीईटीप्रमाणे प्रवेशप्रक्रिया सुलभ असल्याचे सांगीतले जात आहे. मात्र प्रत्यक्षात अडचणी येत आहेत.प्रवेश प्रक्रियेतील अर्ज भरण्याकरिता असलेले संकेतस्थळ बिघडते. विद्यार्थ्यांच्या शाळेच्याच असलेल्या महाविद्यालयाचे संकेत स्थळावर दिसतच नाही. रहिवासी असलेल्या ठिकाणापासून जवळ असलेले महाविद्यालय देखील संकेत स्थळावर दिसत नाही. महाविद्यालयात असलेला प्रशासकीय जागा देखील शासकिय जागा शासनाकडे जमा झाल्याने महाविद्यालयांकडे पर्याय शिल्लक नाही. या सर्व अडचणीमुळे विद्यार्थ्यांबरोबरच पालक चिंताग्रस्त झाले असून संतप्त प्रतिक्रिया सर्व स्तरातून येत आहेत.चांगले गुण असले तरी प्रवेश प्रक्रिये मुळे चांगले महाविद्यालय मिळण्याची खात्री उरलेली नाही.हिंदू महासंघाने या विषयाकडे लक्ष देऊन राज्यभर पालक आणि विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून येत्या काळात न्यायासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



**पुणे** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींबाबत हिंदू महासंघाच्या पालक आघाडीने शिक्षणमंत्री दादा भुसे यांची मुंबई निवासस्थानी भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी ११ वीच्या प्रवेशाच्या जी.आर. मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत चर्चा करण्यात आली. शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पालक आघाडीला सकारात्मक आश्वासन दिले.

# अमनोराच्या वाहनांमुळे पोलीस दलाची कार्यक्षमतेत भर पडणार: अमितेश कुमार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अमनोरा सिटी कॉर्पोरेशनने पोलीस दलाला दिलेल्या नऊ वाहनांमुळे पोलिसांची कार्यक्षमता वाढीस लागण्यास उपयोग होणार आहे. पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटीबद्ध आहे. पुण्यातील वाहतूक प्रश्नासह महिला सुरक्षा, रस्त्यांवरील गैरप्रकार, अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करून नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज दिली.

सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा) यांनी सी. एस. आर. फंडामधून पुणे शहर पोलीस दलास नऊ चारचाकी वाहने (किया कॅरेन्स) रितसर खरेदी प्रक्रिया राबवून पोलीस दलाकडे सुपूर्द केली. वाहने हस्तांतरणाचा सोहळा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत अमनोरा पार्क टाऊन क्लब, हडपसर येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा)चे व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध देशपांडे यांनी वाहनांच्या चाव्या पोलीस आयुक्तांकडे या वेळी सुपूर्द केल्या. आदित्य देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

महिला पोलीस सारथ्य करत असलेल्या नऊ किया कॅरेन्सला पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अनिरुद्ध देशपांडे, आदित्य देशपांडे हिरवा झेंडा दाखविला व वाहने पोलीस दलात सामिल करून घेण्यात आली.

अमितेश कुमार पुढे म्हणाले, पुण्यासारख्या सातत्याने विस्तारित होणाऱ्या शहरात नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्य करणे अवघड आहे; परंतु तंत्रज्ञान, मनुष्यबळ यांच्या मार्फत नागरिकांचे सुरक्षा, वाहतूकप्रश्न सोडण्यासाठी पोलीसदल कटीबद्ध आहे. नागरिकांनी आमच्या कामास सहकार्य करून सहभागही नोंदविल्यास पोलीस दलाची कार्यक्षमता वाढण्यास तसेच शहराला शिस्त लागण्यास मदत होईल. सूत्रसंचालन स्नेहल जाधव, तहसीन बेग यांनी केले तर आभार डॉ. राजकुमार शिंदे यांनी मानले.



सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा) यांनी सी. एस. आर. फंडामधून पुणे शहर पोलीस दलाकडे नऊ चारचाकी वाहने (किया कॅरेन्स) सुपूर्द केली. वाहनांची प्रतिकात्मक चावी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे सोपविताना अनिरुद्ध देशपांडे. समवेत मनोज पाटील, राजकुमार शिंदे.

> महिलांचे सबलीकरण, पाणी बचतीचा संदेश, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात कार्य केले जात आहे. आरोग्य उपक्रमांतर्गत १२०० महिला पोलिसांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. अमनोरा येथील घरेलु कामगार महिलांना (अवंतिका) पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आलेआहे. खामगाव येथे पारधी मुलांच्या शाळेची जबाबदारी घेण्यात आली असून तेथील १५० विद्यार्थ्यांना कौशल्यविकास उपक्रमाअंतर्गत प्रशिक्षित करण्यात आले असून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.
>
> — **अनिरुद्ध देशपांडे,** व्यवस्थापकीय संचालक, सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा)



# ‘टोपीबहाद्दर’ गुरुजींना प्रशासनाची ‘छडी’

## बदल्यांसाठीची ‘बनवाबनवी’पडणार महागात: ‘लाखमोलाचा’ सौदा येणार अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यातील महत्त्वाच्या आणि जवळच्या शाळांमध्ये ‘क्रिम पोस्टिंग’ मिळविण्यासाठी समाजात आदराचे स्थान असलेल्या शिक्षकांनी थेट मुके, बहिरे आणि दिव्यांग असल्याची प्रमाणपत्रे सादर केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे; त्यामध्ये अधिकारीही सहभागी असल्याची चर्चा आता दबक्या आवाजात सुरु झाली आहे. त्यामुळे या प्रकाराची जिल्हा परिषद प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे; त्यासाठी या प्रमाणपत्रांची आता कडक पडताळणी सुरु केली आहे. त्यामुळे या बदल्यांसाठी आतापर्यंत झालेला ‘लाख मोलाचा’ सौदा आता चांगलाच अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

प्रशासनाने थेट ‘छडी’ उगारल्याने ‘टोपीबहाद्दर’ शिक्षकांना ही ‘बनवाबनवी’ महागात पडण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत; विशेष म्हणजे या पडताळणीत दोषी आढळलेल्या शिक्षकांना थेट ‘घरचा रस्ता’ दाखविण्यात येइल असा निर्वाणीचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे बदल्यांसाठी ‘नेतागिरी’ करत असलेल्या शिक्षकांच्या कंपूत आता प्रचंड खळबळ उडाली आहे.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये तब्बल बारा हजार शिक्षक आहेत, दर तीन वर्षांनी या शिक्षकांच्या बदल्या करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. मात्र; आपल्या घराच्या जवळ असलेल्या शाळांमध्ये नोकरी करण्यासाठी या शिक्षकांची पसंती असते. त्यासाठी यापूर्वी या बदल्यांसाठी लाखो रुपयांचे व्यवहार होत होते; त्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदांमध्ये ‘नेतागिरी’ कार्यरत होती. त्यासंदर्भात राज्य शासनाकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्यामुळे त्यांची ही मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी या बदल्यांमध्ये पारदर्शकता आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला होता. त्यासाठी ऑनलाईन बदल्यांची पद्धत सुरु करण्यात आली होती.

या निर्णयामुळे बदल्यांमधील घोळ कमी होउन पारदर्शकता येइल, असा राज्य शासनाच्या शिक्षण विभागाचा कयास होता. मात्र; तरीही या शिक्षकांनी आणि त्यासाठी ‘नेतागिरी’ करत असलेल्या नेत्यांनी हार मानली नाही. त्यासाठी आता चक्क समाजात मनासन्मान असलेल्या या शिक्षकांनी आता थेट मुके, बहिरे आणि काही प्रमाणात दिव्यांग असल्याची दिव्यागांची बोगस प्रमाणपत्रे मिळविण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे त्यासाठी लाखो रुपयांचा चुराडा केला जात आहे. या घोटाळयाचा दैनिक ‘राष्ट्र संचार’ ने २६ मे च्या अंकात सविस्तर पोलखोल केला होता. या वृत्ताने जिल्हा परिषदेच्या वर्तुळात आणि त्यासाठी नेतागिरी करत असलेल्या शिक्षकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. प्रशासकीय कामकाजात ‘दबंग’ अधिकारी अशी ओळख असलेल्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे; त्यासाठी ज्या शिक्षकांनी अशी प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्यांची पडताळणी करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. अशा प्रकारची गैरवर्तणुक आढळल्यास संबधितांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल असा निर्वाणीचा इशारा पाटील यांनी दैनिक ‘राष्ट्र संचार’शी बोलताना दिली.








यासंदर्भात माहिती मिळाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने असा ‘गफला’ करत असलेल्या शिक्षकांवर कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय हा कौतुकास्पद असाच आहे; त्यामुळे खरोखर दिव्यांग असलेल्या शिक्षकांना न्याय मिळण्यास मदत होणार आहे. मात्र; ही कारवाई करताना २०१८ पासून ज्या शिक्षकांनी असे ‘उद्योग’ केले आहेत त्यांच्यावरही कारवाई करण्याची गरज आहे. अन्यथा प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे.
**-धर्मेंद्र सातव पाटील,** प्रदेशाध्यक्ष प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन


हा प्रकार निश्चितच गंभीर आहे; त्यामुळे असे प्रकार टाळण्यासाठी आणि त्याची पुनरावृत्ती होउ नये यासाठी प्रशासनाच्या वतीने योग्य ती दखल घेण्यात येणार असून संबधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र; प्रशासनावरील कामाचा व्याप लक्षात घेऊन त्यासंदर्भात माहिती दिल्यास ही कारवाई करणे अधिक सोपे जाणार आहे.
**-गजानन पाटील,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे



## कोथरूड मधील विजेचा लपंडाव थांबणार कधी: गिरीश गुरनानी

**कोथरूड :** वारंवार वीज जाण्याचे प्रमाण पावसाळ्यात अधिक प्रमाणात वाढल्याबाबत कोथरूड महावितरण चे अभियंता राजेश काळे यांना कोथरूड विधानसभा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार अध्यक्ष गिरीश गुरनानी यांनी निवेदन दिले. कोथरूड मधील बऱ्याच भागात वीज जाण्याचे प्रमाण अधिक आहे आणि त्यात पावसामुळे तर अजूनच वीज खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. एकदा वीज गेल्यास ती पुन्हा ३-४ तासांनी येत आहे, तर काही भागात याहून अधिक वेळ वीज जात आहे. तसेच विजेचा भार कमी जास्त होत असल्याने नागरिकांच्या घरातील विद्युत उपकरणे बंद पडत आहेत व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान व हाल सुद्धा होत आहे. या सर्व विषयास अनुसरून राष्ट्रवादी युवक कोथरूड विधानसभेच्या वतीने गुरुवारी कोथरूड महावितरण अभियंता राजेश काळे यांना निवेदन दिले व याकडे लक्ष देऊन वारंवार वीज खंडीत होणार नही याची दक्षता घेतली पाहिजे असे नमूद करण्यात आले. या वेळी काळे यांनी अश्वासन दिले आहे की या विषयावर गांभीर्याने उपयोजना करू आणि वारंवार वीज खंडीत होण्यापासून नागरिकांची सुटका करू.

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज 'युवा प्रेरणा संवाद'



**पुणे :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या शुक्रवारी (ता. ३०) दुपारी २.०० वाजता शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम होणार आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने सकाळी वेशभूषा स्पर्धा घेण्यात येणार असून, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे,भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे आदी उपस्थित राहणार आहेत. अधिकाधिक युवकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी केले आहे.




## ख्रिस्ती हक्क परिषदेचे उद्या पुण्यात आयोजन

**पुणे :** रिजनल ख्रिश्चन सोसायटी यांच्या वतीने पुण्यात येत्या शनिवारी (31 मे) ख्रिस्ती हक्क परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत विविध विषयांवर चर्चा होणार असल्याची माहिती रिजनल ख्रिश्चन सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत (लुकस) केदारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे पत्रकार भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेला राहुल डंबाळे, अ‍ॅड. अंतुन कदम, जॉन मंतोडे, जुबेर मेमन, पिटर डिसूझा, के. बी. एन. सॅमसन आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्रशांत (लुकस) केदारी म्हणाले, ख्रिस्ती हक्क परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून, बिशप थॉमस डाबरे, राज्यसभेचे खासदार पी. विल्सन (DMS, तमिळनाडू), दिलीप नाईक, पिटर डिसूझा, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी अब्दुल रहेमान, पा.पिटर जॉर्ज, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड, रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे,आमदार बापूसाहेब पठारे, काँग्रेस अरविंद शिंदे, प्रशांत जगताप,सतिश मेहेंद्रे, ॲथोनी जेकब उपस्थित राहणार आहेत. शनिवार, दि.३१ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ यावेळेत ही परिषद पापल सेमिनरी हॉल, नगर रोड, रामवाडी, वडगावशेरी, पुणे येथे होणार आहे. परिषदे विषयी अधिक माहिती देताना केदारी म्हणाले, यंदाची ख्रिस्ती हक्क परिशद ही सहावी परिषद आहे.

# तोडफोडीचे ‘पालकत्त्व’...!

## अल्पवयीनांचा गुन्हा पालकांच्या माथी: थेट ठपका; बारमालकही जबाबदार

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पुण्यातील गुन्हेगारी चांगलीच वाढली आहे. कोयता हातात घेऊन दहशत माजविणे, वाहनांची तोडफोड करणे आदी गुन्हेगारींमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यांना आळा घालण्यासाठी आणि या गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी पोलीसांनी त्यांची धिंड काढण्याची शक्कल लढविली, तरीही या समाजकंटकांना अद्यापही आळा बसलेला नाही. याउलट त्यामध्ये दिवसेंदिवस अधिकच वाढ होत आहे; धक्कादायक बाब म्हणजे त्यामध्ये अल्पवयीन गुन्हेगारांचा समावेश असल्याने पोलीसांची डोकेदुखी वाढत आहे. त्यामुळे अशा प्रकाराची पोलीसांनी गंभीर दखल घेतली असून काल रात्री सिंहगड रस्त्यावर अल्पवयीन मुलांनी केलेल्या गुन्ह्याचे ‘पालकत्त्व’ पोलीसांनी थेट आई-वडिलांनाच बहाल केले आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रोड परिसरातील हिंगणे भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. काही तरूणांनी हातात कोयते घेऊन दहशत माजवली. तसेच १५-२० वाहनांची तोडफोड केली. विशेष म्हणजे या प्रकरणी पोलिसांनी आरोपींवर थेट कारवाई न करता त्यांच्या आई वडिलांवर गुन्हा दाखल केला आहे.

पुण्यातील सिंहगड रोड परिसरात असणाऱ्या हिंगणे भागात काही १५-२० तरूणांनी हातात कोयते घेऊन दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनांची तोडफोड केली. या तोडफोडीमध्ये दुचाकी तसेच चार चाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले. या घटने संदर्भात पुण्यातील सिंहगड रोड पोलीस ठाण्यात काही तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी तात्काळ या घटनेचा तपास करायला सुरुवात केली असता वाहनांची तोडफोड करणारे सर्वजण अल्पवयीन असल्याचं लक्षात आलं. इतकंच काय तरी सर्वजण दारूच्या नशेत असल्याचा देखील तपासातून समोर आलं आहे. अल्पवयीन असल्यामुळे आरोपींना अटक करता येत नसली, तरी पोलिसांनी थेट त्यांच्या आई-वडिलांवर गुन्हा दाखल केला आहे. तसेच पोलिसांनी ज्या बारमधून या अल्पवयीन तरुणांनी दारूची खरेदी केली होती तो बार सील केला आहे. बार मालकावर अल्पवयीनांना मद्यपुरवठा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस उपआयुक्त यांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ तारखेला पुण्यातील हिंगणे भागात येथे काही तरुणांनी वाहनं तोडफोड केली आहेत अशी माहिती मिळाली होती. २० वाहनांचे मोठे नुकसान या घटनेत झाले होते.

### थेट ‘पोर्शे कार’ पॅटर्नचा आधार...!

● गेल्या वर्षी कोरेगांव पार्क येथे झालेल्या पोर्शे कारच्या भीषण अपघातात एक तरुणी आणि तिच्या तरुण मित्राला प्राण गमवावा लागला होता; या प्रकरणातही एका बड्या बांधकाम व्यवसायिकाच्या अल्पवयीन मुलाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली होती. त्यानुसार या अपघाताला जबाबदार धरुन या अल्पवयीन मुलाच्या पालकांना गजाआड करण्यात आले होते, आताही या प्रकरणात या अल्पवयीन मुलाच्या पालकांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्याशिवाय या अल्पवयीन मुलांना मद्यविक्री केल्याप्रकरणी बारमालकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास दिल्यास अथवा त्यांच्याकडून काही गुन्हा घडल्यास थेट पालकांना जबाबदार धरण्यात येइल; असे पुणे पोलीसांनी यापूर्वीच जाहीर केले आहे. तरीही या प्रकारात घट होण्याच्या ऐवजी त्यात दिवसेंदिवस अधिकच वाढ होत आहे; त्यामुळेच अन्य गुन्हेगारांना आणि त्यांच्या पालकांना जरब बसविण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला असून यापुढील कालावधीत हाच फंडा वापरण्यात येणार आहे.
**-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे

## आमदार भीमराव तापकीर यांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील भारतीय जनता पक्षाचे खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली. शंकर सर्जेराव धुमाळ (वय ४७) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

सहकार नगर पोलीस ठाण्यात त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भीमराव तापकीर यांच्या धनकवडी परिसरातील घरात घुसण्याचा त्याने प्रयत्न केला होता. आमदारांच्या सुरक्षेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षा कर्मचारी अजित गणपत देवघरे यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे.

या प्रकरणी अधिक माहिती अशी की, आरोपी शंकर धुमाळ हा वारंवार आमदार भीमराव तापकीर यांच्या घराजवळ जाऊन गोंधळ घालत होता. त्याने तीन वेळा आमदारांच्या घरात घुसण्याचा प्रयत्न केला. त्याला रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदारांच्या सुरक्षेसाठी तैनात असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला त्याने शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिली होती. सतत होणाऱ्या या प्रकारामुळे आमदार [illegible] त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेव[illegible] प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

दरम्यान सुरुवातील आमदारांच्या वतीने सहकारनग[illegible] पोलिस ठाण्यात तक्रार देण्या[illegible] आली होती. सुरुवातीला आरोपीव[illegible] किरकोळ स्वरूपाची कारवा[illegible] करण्यात आली. मात्र त्यानंतरह[illegible] तो पुन्हा पुन्हा येत राहिला आणि शिवीगाळ करत धमक्या दे[illegible] राहिला. या प्रकरणात कारवाई [illegible] झाल्यामुळे आमदारांनी थेट पु[illegible] पोलिस आयुक्त अमितेश कुमा[illegible] यांना पत्र पाठवून लक्ष घालण्याच[illegible] मागणी केली. त्यानंतर पोली[illegible] आयुक्तांच्या सूचनेनुसार उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी या संपू[illegible] प्रकरणात कारवाई करण्याच[illegible] आदेश दिले होते.त्यानुसार

सहकारनगर पोलिसां[illegible] तत्काळ कारवाई करत आरोप[illegible] शंकर धुमाळ याला अटक केली.

आरोपी शंकर धुमाळ याच्[illegible] विरोधात मुंबई दारूबंदी अधिनिय[illegible] कलम ८५(१) भारतीय दंड संहित[illegible] कलम ३५२ (उपद्रव करणे) ३५१(२)(३) (आक्रमणाची धमकी) १३२ (सरकारी कर्मचाऱ्यांव[illegible] हल्ला), ३३३ (कर्तव्य बजाव[illegible] असलेल्या लोकसेवकाला दुखाप[illegible] करणे), पोलीस (अप्रीतीची भाव[illegible] चेतवणे) अधिनियम, १९२२ अंतर्ग[illegible] कलम ३ या कायद्यांनुसार गुन्[illegible] दाखल करत त्याला अटक केली.

## सकल हिंदू सामुदायिक व्रतबंध सोहळ्यात ५८ बटूंची मुंज

**पुणे :** गणेश पूजन...पारंपरिक पद्धतीने केलेले चौलकर्म... मातृभोजन... व्रतबंधन असे शास्त्रोक्त पद्धतीने विधी करत समाजातील वेगवेगळ्या घटकातील आणि अनाथ - विशेष मुलांची मुंज विधिवत पार पडली. व्रतबंध या पवित्र संस्कारामुळे मूळ संस्कृतीशी मुलांची नाळ जोडत ५८ मुले आणि मुली यांचा एकत्रित व्रतबंध सोहळा पार पडला. सामाजिक एकतेचा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विचार या माध्यमातून समाजापर्यंत पोचविण्यात आला.

स्वानंद चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मी सावरकर उपक्रम अंतर्गत हिंदूंच्या १८ विविध समाजातील ५८ मुलामुलींच्या सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन कर्वे रस्त्यावरील अश्वमेध मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर उपस्थित होते.

संस्काराचे समाजव्यापी महत्त्व ओळखून स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरीत आपल्या कार्यकाळात सर्व हिंदू समाजासाठी सामुदायिक व्रतबंध सोहळ्याची संकल्पना मांडली होती. सावरकरांनी मालवणला तथाकथित १५० अस्पृश्यांच्या मुंजी लावल्या होत्या आणि त्यांना स्वतः जानवं घातली होती. त्यांच्या या विचारातून प्रेरणा घेऊन स्वानंद चॅरिटेबल ट्रस्ट मागील चार वर्षे हा उपक्रम सातत्याने राबवत आहे.


पुणे स्वानंद चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मी सावरकर उपक्रम अंतर्गत हिंदूंच्या १८ विविध समाजातील ५८ मुलामुलींच्या सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन कर्वे रस्त्यावरील अश्वमेध मंगल कार्यालयात करण्यात आले होते.

# उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी तहसील कार्यालयात ‘जागरण गोंधळ’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गरीब रुग्णांना उपचार व विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी महत्वपूर्ण असलेल्या उत्पन्नाचे दाखले देण्यात पुणे शहर व हवेली तहसील कार्यालय जाणूनबुजून दिरंगाई करत आहे. रुग्णांचे डिस्चार्ज झाले, विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया संपत आली, तरी गरजुंना उत्पन्नाचा दाखला मिळत नाही. हे दाखले त्वरित दिले जावेत, या मागणीसाठी रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.

शिवाजी रस्त्यावरील मामलेदार कचेरीसमोर रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात गोंधळी, संयोजक शहराध्यक्ष अपर्णा मारणे-साठ्ये, कविता डाडर, प्रभा अवलेलू, सोनाली ओव्हाळ, रेखा वाघमारे, चित्रा साळवे, सुरेश फाले, रेश्मा जांभळे, अशोक भोसले, राजेश अडसूळ, अमृता जाधव, राजाभाऊ गायकवाड, राजाभाऊ कदम, शारदा लडकत, गौरी चव्हाण, सुलभा क्षीरसागर, डॉ. योगेश कदम, डॉ. सुनील साळवे, आशिष गांधी, इकबाल शेख, फारुख सोलापूरे, विमल सोंडे, अनिता चिंचोलीकर, मंदार देसाई, दिलीप ओव्हाळ, सविता चौहान, सुनील मालुसरे, मनोज ढोणे, मुकुंद पायगुडे, विनोद बाफना, सलीम शेख, संगीता रुद्राप, साईराज जांभळे, आदित्य कांबळे, लक्ष चौधरी, युवराज साळुंखे, मीरा दोडके, रजनी पाचंगे, मंगल रासगे, निशा गायकवाड, हसीनाआपा सय्यद, मंदाताई साठे आदी उपस्थित होते. उमेश चव्हाण म्हणाले, "रुग्णांचे डिस्चार्ज झाले, तरी उत्पन्नाचे दाखले न देणाऱ्या, निद्रिस्त हवेली आणि पुणे शहर तहसीलदारांना झोपेतून जागे करण्यासाठी हे धार्मिक स्वरूपाचे जागरण गोंधळ आंदोलन आहे. गेल्या एक महिन्यांपासून उत्पन्नाचे दाखले देण्यात वेळखाऊ धोरण सुरु आहे. त्यामुळे मोफत आरोग्य योजनेचा लाभ घेता येत नाही. खाजगी ई-सेवा केंद्रात मनमानी पद्धतीने पैसे घेऊनही दाखला मिळायला २०-२५ दिवस लागतात. विद्यार्थ्यांनाही याचा मोठा फटका बसत आहे.


उत्पन्नाचे दाखले देण्यात पुणे शहर व हवेली तहसील कार्यालय जाणूनबुजून दिरंगाई करत आहे. रुग्णांचे डिस्चार्ज झाले, विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया संपत आली, तरी गरजुंना उत्पन्नाचा दाखला मिळत नाही. हे दाखले त्वरित दिले जावेत, या मागणीसाठी रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.


घरेदारे विकून, सोनेचांदी गहाण ठेवून, कर्ज काढून रुग्ण व विद्यार्थी वेळ भागवून नेतात. मात्र, योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले दाखले मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची घरे उद्ध्वस्त होत आहेत. हे टाळण्यासाठी उत्पन्नाचे दाखले वेळेत द्यावेत, ही मागणी या आंदोलनाद्वारे आम्ही करत आहोत.
**-उमेश चव्हाण,** संस्थापक अध्यक्ष रूग्ण हक्क परिषद



**संघर्ष हक्काच्या जागांसाठी...!**

अतिक्रमणांविरोधात व हिंदूंवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शिवाजी रस्त्यावरील फडगेट पोलीस चौकीसमोर हजारो हिंदू बांधवांनी रस्त्यावर ठिय्या देत आंदोलन केले. विविध हिंदू संघटना, संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिक्रमणे हटवून आरक्षित जागा ताब्यात घ्याव्यात

## गुरुवार पेठेतील अतिक्रमणांविरोधात सकल हिंदू समाजाचा रास्ता रोको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> महापालिका प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेत तात्काळ कारवाई करावी. प्रत्येकवेळी पोलिसांना पुढे करून महापालिकेने याकडे दुर्लक्ष करू नये. अतिक्रमणे आणि त्याबरोबर होणाऱ्या राष्ट्रविरोधी घटनांना आळा घालण्यासाठी येथील हिंदू समाज जागरूकपणे रस्त्यावर उतरून आंदोलन करेल.
> **-योगेश टिळेकर, आमदार**

**पुणे:** "गुरुवार पेठेतील मिर्झा मशीद ट्रस्ट, रजाशाह हॉल दर्गा, बलवार आळी जोग दर्गा, हजरत सिद्दीक शाह मौला दर्गा येथील अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करून येथील आरक्षित जागा पुणे महानगरपालिकेने तात्काळ ताब्यात घ्याव्यात," अशी मागणी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी केली. या अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई केली नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

अतिक्रमणांविरोधात व हिंदूंवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शिवाजी रस्त्यावरील फडगेट पोलीस चौकीसमोर हजारो हिंदू बांधवांनी रस्त्यावर ठिय्या देत आंदोलन केले. विविध हिंदू संघटना, संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापालिका प्रशासन लेखी निवेदनाद्वारे पंधरा दिवसात आरक्षित जागा ताब्यात घेऊ, असे आश्वासन देत नाही, तोवर रास्ता रोको सुरूच ठेवणार, अशी भूमिका घेतल्याने वाहतूकही खोळंबल्याचे पाहायला मिळाले. जवळपास अडीच ते तीन तास रास्ता रोखून धरला.

योगेश टिळेकर म्हणाले, "हा लढा कोणत्याही दर्ग्याच्या विरोधात नाही. मात्र, त्याच्या आडून इथे होत असलेली अतिक्रमणे आणि त्यातून घडणाऱ्या राष्ट्रविरोधी घटना रोखण्यासाठी हा जनआक्रोश आहे.

या परिसरात महानगरपालिकेचे भाजी मंडईचे आरक्षण आहे. मात्र, ४० वर्षांपासून पालिका येथील अतिक्रमणांवर कारवाई करत नाही व आरक्षित जागा ताब्यात घेत नाही. ही जागा ताब्यात घेऊन येथे नागरिकांसाठी भाजी मंडई उपलब्ध करून द्यावी. महापालिका प्रशासन दुर्लक्ष का करतेय, याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे."

दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन याप्रकरणी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर योगेश टिळेकर आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन संपल्याचे जाहीर करत सर्व हिंदू बांधवाना शांततेने घरी जाण्याचे आवाहन केले. पोलिसांच्या सहकार्याबद्दल टिळेकर यांनी त्यांचेही आभार मानले.

## वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्या तरुणींची जेल मधून सुटका

**पुणे :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. या भारत - पाकिस्तान संघर्षादरम्यान १९ वर्षीय तरुणीने सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकली होती. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी तिच्यावर गुन्हा दाखल करत अटक केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी तरुणीला जामीन मंजूर केला. त्यानंतर संध्याकाळी लगेचच तिची येरवडा कारागृहातून सुटका केली. पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी ही माहिती दिली. उच्च न्यायालयाने कठोर कारवाई करून विद्यार्थिनीला गुन्हेगार बनवायचे आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. होता. पोलिस अधिकारी आणि महाविद्यालय या तरुणीचे आयुष्य उद्ध्वस्त करू पाहात आहे, असे ताशेरे न्यायालयाने ओढले होते. बुधवारी पोलिस संरक्षणात तरुणी महाविद्यालयात गेली होती. तसेच तिने परीक्षाही दिली, अशी माहिती पोलिसांनी दिली. न्यायालयाने तिला जामीन मंजूर करताच तिची सुटका करण्यात सांगितले. संबंधित तरुणीला ती शिकत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयानेही काढून टाकले होते. या निर्णयाविरोधात तिने न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने महाविद्यालयातून काढून टाकण्याच्या निर्णयालाही स्थगिती देत, तिला परीक्षेला बसू द्यावे, हॉल तिकीट द्यावे, असे निर्देश दिले होते.

## पीटी ३ फॉर्म भरूनही चाळीस टक्के सवलत नाहीच

**पुणे :** महापालिकेच्या मिळकत कर विभागातील गोंधळ काही थांबत नाही. पीटी ३ फॉर्म भरून दिलेल्या मिळकतदारांना अद्यापही चाळीस टक्के सवलत दिली जात नाही. चुकीच्या पद्धतीने झालेल्या अर्ज नोंदणीचा फटकाही मिळकतदारांना बसत आहे. महापालिकेच्या मिळकत विभागाशी संबंधित तक्रारींवर आपले पुणे, आपला परिसर, नागरी हक्क संस्था यांच्यावतीने उज्वल केसकर, प्रशांत बधे, सुहास कुलकर्णी आणि काका कुलकर्णी यांनी मिळकत कर विभागाची सुत्रे नुकतीच हाती घेतलेले अविनाश सपकाळ यांची भेट घेतली. यावेळी सहाय्यक कर संकलन प्रमुख अस्मिता तांबे, प्रशासकीय प्रमुख रवींद्र ढावरे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. निवासी मिळकतदार स्वत: राहत असलेल्या मिळकतीच्या करात चाळीस टक्के सवलत देण्यात येत आहे. राज्य सरकारने ही सवलत बंद केली होती, ती पुन्हा गेल्यावर्षी सुरु केली गेली. ही सवलत मिळविण्यासाठी मिळकतदारांना पीटी ३ फॉर्म भरून देणे बंधनकारक केले गेले. तसेच क्षेत्रीय कार्यालय स्तरावरही महापालिकेकडून मिळकतींचे सर्वेक्षण केले गेले होते. यामध्ये साडे तीन लाखाहून अधिक मिळकतींचा समावेश आहे. सुमारे १ लाख ६० हजार मिळकतींचा वापर स्वत: मालक करीत असल्याची माहीती पुढे आली. यातील बहुतेकांनी पीटी ३ फॉर्म भरला असुन, साधारणपणे १ लाख १४ हजार मिळकतदारांना ही सवलत मिळणे आवश्यक असल्याचा दावा केला गेला. यासंदर्भात केसकर म्हणाले, खात्याकडे नेमके किती पीटी ३ अर्ज आले त्यातले किती पात्र आहेत किती अपात्र आहेत याबाबत थोडा संभ्रम वाटत आहे. कर आकारणी आणि संकलन प्रमुख हे नव्याने या ठिकाणी आल्यामुळे त्यांना थोडा वेळ अजून देण्याचे आम्हाला वाटले. 40% ची सवलत रद्द केल्यापासून साधारणतः साडेतीन लाख नवीन मिळकतींना महानगरपालिकेने कर लावला आहे.

## पुरवणी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना ३० मे ते १७ जून अर्ज करता येणार

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना ३० मे ते १७ जून पर्यंतनियमित शुल्कासह अर्ज करता येतील. विलंब शुल्कासह १८ ते १९ जून दरम्यान अर्ज करता येतील.

विद्यार्थी ३० मे पासून अधिकृत वेबसाइट cbse.gov.in ला भेट देऊन कंपार्टमेंट किंवा सुधारणा परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. नियमित विद्यार्थ्यांना संबंधित शाळांमधून अर्ज करावे लागतील. १० वी आणि १२वी दोन्हीसाठी पुरवणी परीक्षा १५ जुलैपासून घेतल्या जातील.



विलंब शुल्कासह अर्ज केल्यानंतर शाळांकडून अर्ज किंवा विद्यार्थ्यांची यादी सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ देणार नाही. शाळांना कंपार्टमेंट श्रेणीत ठेवलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एलओसी सादर करावा लागेल. तसे झाले नाही तर संबधित विद्यार्थ्यांना कंपार्टमेंट परीक्षेत बसण्याची संधी मिळणार नाही.

बोर्डाशी संलग्न शाळांमधून २०२५ च्या दहावी परीक्षेत बसणारे आणि 'कंपार्टमेंट म्हणजेच अनुत्तीर्ण घोषित केलेले नियमित विद्यार्थी एक किंवा दोन कंपार्टमेंट विषयांमध्ये अर्ज करण्यास पात्र आहेत. यावर्षी बोर्डाशी संलग्न शाळांमधून ६ किंवा ७ विषयांसह दहावीची परीक्षा दिलेल्या आणि उत्तीर्ण घोषित झालेल्या नियमित विद्यार्थ्यांनी कामगिरी सुधारणा श्रेणी अंतर्गत त्या विषयांमध्ये त्यांची कामगिरी सुधारू शकतात. दहावी उत्तीर्ण झालेले नियमित विद्यार्थी कामगिरी सुधारणा श्रेणी अंतर्गत जास्तीत जास्त दोन विषयांसाठी बसू शकतील.

## वाघोलीत तरुणीची आत्महत्या

**पुणे :** विवाहाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याने एका तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वाघोली परिसरात घडली. तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एकाविरुद्ध वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अमित परमार (वय २६, रा. ग्वाल्हेर, मध्य प्रदेश) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिवानीचा भाऊ चंद्रशेखर सिंग (वय ३२, रा. जबलपूर, मध्य प्रदेश) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सहायक पोलीस निरीक्षक विनायक अहिरे तपास करत आहेत.

## खान,क्रशरच्या अवैध वाहतुकीला तहसिलदारांचा दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** लोणीकंद(ता.हवेली) येथे हवेली तालुक्याच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी प्रत्यक्षात कारवाई पथकासह येऊन खान,क्रशर वरील अवैध वाहतुकीवर तहसिलदारांचा 'सर्जिकल स्ट्राइक' पद्धतीने कारवाई केली.यामध्ये सातच वाहनांकडे पास मिळाले.त्यामुळे "नियमभंग करणाऱ्यांना आता माफी नाही" असे माहिती देताना अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी सांगितले.

सविस्तर माहिती अशी की,लोणीकंद येथील सुरभी चौकात अपर तहसीलदार तृप्ती कोलते यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या तीन बारा सदस्यीय पथकाने अवैध वाहतूक दारांवर धडाकेबाज कारवाई केली आहे.सोळा वाहनांची तपासणी केली असता फक्त सात वाहनचालकांकडे वाहतूक पास आढळले.उर्वरित वाहनचालकांनी नियम मोडले होते.

या कारवाईदरम्यान एका ड्रायव्हरांनी अधिकाऱ्यांच्या समोरून गाडी आतून पळवण्याचा प्रयत्न केला;तहसीलदार तृप्ती कोलते यांनी स्वतः भाग घेतून स्पष्ट केले की, "नियमभंग करणाऱ्यांना आता माफ नाही." तहसीलदारांच्या आगमनाची माहिती मिळताच अनेक डंपर चालक आणि मालकांची पळापळ झाली, डंपर गायब झाले.परिसरात अचानक भयानक शांतता पसरली आहे. अवैध वाहतुकीच्या उपरोधकांवर आता कठोर कारवाईची वेळ आली आहे, असा संदेश प्रशासनाने दिला आहे.



**पुणे** लोणीकंद(ता.हवेली) येथे हवेली तालुक्याच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी प्रत्यक्षात कारवाई पथकासह येऊन खान,क्रशर वरील अवैध वाहतुकीवर तहसिलदारांचा 'सर्जिकल स्ट्राइक' पद्धतीने कारवाई केली.यामध्ये सातच वाहनांकडे पास मिळाले.

# दगडखाण अतिक्रमणधारकांच्या यादीमध्ये 'बनवाबनवी'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** वाघोलीतील गायराण जमिनीवर अनेक वर्षे राहणाऱ्या अतिमागास व आर्थिक दुर्बल दगडखाण कामगार कुटुंबांना शासन निर्णयानुसार प्रत्येक कुटुंबांला विनामुल्य भूखंड वाटप करणे कामी नुकतीच जिल्हाधिकारी यांचे अध्यतेखाली बैठक संपन्न झाली.वाघोली येथील पूर्वी निवास प्रयोजनासाठी अतिक्रमण करून राहणाऱ्या खाण कामगारांची यादी ग्रामपंचायत/गटविकास अधिकारी हवेली यांचे कडून प्राप्त करून सदर यादीची तपासणी करून अंतिम पात्र लाथार्थीच्या यादीसह जागा मागणी प्रस्ताव पंधरा दिवसात जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे आदेश पुणे महानगर पालिकेला देण्यात आले आहेत.अशी



वाघोली येथील गायरान जमीनीवर दगडखाण अतिक्रमणधारकांच्या यादीमध्ये 'बनवाबनवी' निर्माण झाली आहे; त्यासंदर्भात योग्य ती चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशा मागण्यांचे निवेदन दगडखाण कामगार विकास परिषदेच्या वतीने महापालिकेच्या उपायुक्तांना देण्यात आले.

माहिती अँड बी.एम्.रेगे यांनी दिली.

महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांशी विचारणा केली असता सदर विषयांची जबाबदारी सह उपायुक्त नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय पुणे महानगर पालिकेकडे वर्ग करण्यात आले आहे असे दिसून आले. सदर प्रलंबित प्रकरणी वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयाचे महापालिका सह उपायुक्त संजय पोळ यांचे बरोबर आज बैठक घेण्यात आली, बैठकीत दगडखाण कामगार विकास परिषद महाराष्ट्रच्या वतीने निवेदन देण्यात आले असून निवेदनाला अनुसरून झालेल्या मॅरेथॉन बैठकीमध्ये ग्रामपंचायतीने केलेला अतिक्रमण धारकांचा सर्वे हा पूर्वग्रह दुषीत व जाणिवपूर्वक आपल्या खास मर्जीतील लोकांकडे पाहूनच ही यादी तयार केली आहे.



> महानगरपालिकेने वाघोली अतिक्रमण धारकाची यादी अंतिम करण्यापूर्वी जुन्या सर्वे/यादीतील सर्व त्रुटी दुरुस्त करूनच अंतिम यादी प्रसिद्ध करावी तदनंतरच प्रस्ताव जिल्हाधिकार्यांकडे लवकरात लवकर सुपूर्द करावा, तसेच अनधिकृतपणे कचरा डेपो असलेला भूखंड दगडखाण महिला कौशल्य विकास भवनासाठी मंजुर करावा.
> **-अॅड. बी.एम.रेगे,**
> संस्थापक अध्यक्ष,दगडखाण कामगार विकास परिषद



## डी वाय पाटील मध्ये इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी नोकरी मेळावा

**पिंपरी :** डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन्स अँड मॅनेजमेंट आकुर्डी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व टॅलेंलिओ यांच्या सहकार्याने एमबीए व एमसीए विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप आणि प्लेसमेंट साठी "कार्यानुभव व ऑन द जॉब ट्रेनिंग" नोकरी मेळाव्याचे आयोजन आकुर्डी कॅम्पस मध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमात एकूण ३० हून अधिक कंपन्या तर आणि १६०० हून अधिक इच्छुक उमेदवारांनी नोंदणी केली. ही संधी विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकिर्दीची दिशा ठरवण्यासाठी आणि विविध क्षेत्रातील संभाव्य नियोक्त्यांशी थेट संवाद साधण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ ठरली. नोकरी मेळावा यशस्वी करण्यासाठी संचालिका डॉ. के. निर्मला, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभागाच्या अधिष्ठाता प्रा. जस्मिता कौर डीवाय पाटील एमसीए कॉलेजच्या संपूर्ण कार्यसमितीने जॉब फेअर २०२५ यशस्वीरीत्या यजमान म्हणून पार पाडले.



## पालखी मार्गावरील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई

**पुणे :** पिंपरी :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मंगळवारी हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रोडवरील धोकादायक अनधिकृत होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आली. पालखी मार्गासह इतर महत्त्वाच्या ठिकाणी लावलेल्या अनधिकृत होर्डिंगवर कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. प्राधिकरण हद्दीतील सर्व अनधिकृत होर्डिंग काढण्यात येणार असून त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

पुणे शहरात संतांच्या पालख्यांचे आगमन २० जून २०२५ रोजी होणार आहे. पुणे – सासवड रोड मार्गे संत ज्ञानेश्वर माऊलींची तसेच पुणे – सोलापूर रोड मार्गे संत तुकाराम महाराजांची पालखी मार्गस्थ होईल. या दोन्ही रस्त्यांवरील २१ होर्डिंग काढण्यात आले असून यापुढेही अनधिकृत होल्डिंगवर निष्कासनाची कारवाई सुरु राहणार आहे. या दोन्ही पालखी मार्गावरील सर्व अनधिकृत होर्डिंग पुढील १० दिवसात काढण्याच्या दृष्टीने पीएमआरडीएच्या अनाधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाने नियोजन केले आहे.

## पावसाच्या पाण्यामुळे उद्योजकांची गैरसोय

**पिंपरी :** गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावरुन वाहणारे पाणी भोसरी एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये शिरत आहे. त्यामुळे उद्योजकांची गैरसोय होत असून पाणी बाहेर काढण्यासाठी महापालिकेने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी केली आहे. यासंदर्भात भोर यांनी प्रसिद्धिपत्रक दिले आहे. त्यात म्हटले आहे, "भोसरी, एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये पावसाचे पाणी शिरत आहे. उद्योग अडचणीत आले आहे. एमआयडीसी परिसरात जलनिस्सारण वाहिन्या किंवा गटारे नाहीत. पावसाच्या पाण्याला वाहून जाण्यासाठी मोकळी वाट मिळत नाही. रस्त्याची उंची वाढल्यामुळे अनेक कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरत आहे. कंपन्यांमधील कामावर त्याचा परिणाम पडत असून कंपन्यांमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यास जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर कंपनी बंद ठेवून कामगारांना बसून पगार द्यावा लागत आहे. उत्पादित माल वेळेत पोहोचवण्यात अडचणी येत आहेत. पाण्यामुळे डास तयार होत असून कंपनीतील कामगारांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेने यावर उपाययोजना करून त्वरित मार्ग काढावा."

## लिंकरोडवर दुभाजकावरील झाडांची छाटणी

**चिंचवड :** चिंचवडगाव ते पिंपरी लिंक रोडवरील 'ब' क्षेत्रीय कार्यालयासमोरच्या दुभाजकावरील झाडांची (बोगन वेल) भर पावसात नुकतीच छाटणी करण्यात आली. मात्र छाटणी केलेल्या झाडाचा पालापाचोळा रस्त्यावरील पाण्यात वाहत चालल्याचे दिसून आले. या परिसरातील दुभाजकावरील बोगन वेल झाडे मोठ्या प्रमाणावर वाढली असून त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. भर पावसात कामगार रेनकोट घालून छाटणी करत असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. मात्र त्याने महापालिकेच्या उद्यान आणि वृक्ष संवर्धन विभागाच्या कार्यपद्धतीवरील प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी त्यावर नाराजी व्यक्त केली असून वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या सर्वच दुभाजकांवरील झाडांची वेळेवर छाटणी करण्याची मागणी केली आहे. जेणेकरून रस्त्यावरील अपघात होणार नाहीत.
'ब' क्षेत्रीय कार्यालयाचे उद्यान सहाय्यक (वृक्ष संवर्धन) प्रदीप गजरमल म्हणाले,"या ठिकाणी दुभाजकावरील बोगनवेल झाडांची छाटणी चिंचवड ते पिंपरी लिंक रोडवर चालू असेल. परंतु ते काम ठेकेदाराकडे असते. त्यांच्या लोकांना काम कमी असते किंवा कर्मचाऱ्यांना वेळ मिळतो. तेव्हा ते छाटणीचे काम करत असतात."

## जयंती महोत्सव



पिंपरी **प्रकाशन :** पिंपरी चिंचवड महापालिका आणि राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय जयंती महोत्सवात पुस्तक प्रकाशन करण्यात आले.

## अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव सुरू

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिका आणि राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक २९ मे ते शनिवार दिनांक ३१ में २०२५ असा तीन दिवसीय जयंती महोत्सव साजरा केला जाणार आहे. यासंदर्भात जयंती महोत्सव समितीच्या सदस्यांनी पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला आहे.

जयंती महोत्सवानिमित्त गुरुवारी खेळ रंगला पैठणीचा हा खास महिलासाठीचा कार्यक्रम, यशोगाथा अहिल्यादेवींची हा शाहिरी कार्यक्रम महानृत्य पुण्यश्लोक सादर करण्यात आले. शुक्रवारी महिलांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची वेशभूषा स्पर्धा, सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव कार्यक्रम, प्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांचे अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. शनिवारी सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची भव्य जयंती दिंडी यात्रा मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी आठ वाजता सांगवी स्मारक या ठिकाणी गजनृत्य हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

# प्रस्तावित टीपी स्कीम अखेर रद्द!

### भूमिपुत्रांच्या एकजुटीचा विजय : प्रशासनाने प्रक्रिया थांबवली



" माझ्या गेल्या २० वर्षांतील सामाजिक व राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू म्हणून पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्र राहीला आहे. त्यामुळे भूमिपुत्रांच्या हिताबाबत कोणतीही तडजोड नाही, अशीच माझी भूमिका आहे. चिखली आणि चऱ्होली दोन्ही गावातील टीपी स्कीम रद्द झाली. तसे नोटिफिशेन लवकरच काढण्यात येईल. महानगरपालिका प्रशासनाचे मनापासून आभार मानतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत पाठबळ दिले. शास्तीकर सरसकट माफी असो, प्राधिकरण परतावा आणि बफर झोन रद्द करण्यासारखे निर्णय भाजपा महायुती सरकारने घेतले. या पुढील काळातही भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम आग्रही राहणार आहे.

**-महेश लांडगे,** आमदार



- भूमिपुत्रांची एकजुट आणि आमदार महेश लांडगे यांची साथ यामुळे मौजे चिखली येथील टीपी स्कीम रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. त्यानंतर मौजे चऱ्होलीची टीपी स्कीम रद्द करण्यासाठी महापालिका भवनासमोर आंदोलन करण्यात आले.
- त्यानंतर ग्रामस्थांची बैठक झाली आणि शुक्रवारी, दि. ३० मे रोजी चऱ्होली बंदची हाक दिली होती.
- माजी महापौर नितीन काळजे, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांच्यासह ग्रामस्थांनी वज्रमुठ बांधली होती.
- विशेष म्हणजे, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिपुत्रांच्या हितासाठी निर्णय घ्यावा लागेल, अशी मागणीही केली.
- अखेर महापालिका प्रशासनाने नमते घेतले आणि चऱ्होलीची टीपी स्कीम रद्द करण्यात येणार आहे.
- याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मौजे चऱ्होली येथील प्रस्तावित टीपी स्कीम सुरू केलेल्या प्रक्रियेला स्थगिती दिली.

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मौजे चऱ्होली येथे प्रस्तावित केलेली टीपी स्कीम अखेर रद्द करण्यात आली. प्रशाससनाने आज तशी घोषणा केली आणि आगामी सर्वसाधारण सभेत त्या प्रस्तावाला मंजुरी देऊन 'नोटिफिफकेशन' काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांच्या एकजुटीचा विजय झाला असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. प्रशासनाने मौजे चिखली आणि चऱ्होलीसह शहरातील काही गावांमध्ये टीपी स्कीम राबवण्याची योजना आखली होती. स्थानिक भूमिपुत्र आणि नागरिकांना विश्वासात न घेता ही स्कीम लादण्याचा प्रयत्न सुरू होता. या टीपी स्कीम ला तीव्र विरोध करण्यात आला.

दरम्यान, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी या टीपी स्कीम विरोधात रान पेटवले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत तीन बैठका घेतल्या. शहराच्या स्थापनेपासून भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. सुरूवातीला एमआयडीसीए, त्यानंतर नवनगर प्राधिकरण आणि महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतरही विविध आरक्षणांसाठी शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या आहेत. आता टीपी स्कीम च्या माध्यातून शेतकरी भूमिहीन होतील. त्यामुळे आमचा टीपी स्कीम ला तीव्र विरोध आहे. तसेच, संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (DP) तयार होत असताना टीपी स्कीम चा आग्रह कशासाठी? असा प्रश्नही आमदार लांडगे यांनी उपस्थित केला होता.

## पावसामुळे उद्भवलेल्या समस्यांची जोरदार पाहणी





■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे रहाटणी प्रभागात निर्माण झालेल्या अडचणी आणि समस्यांची माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी पाहणी केली. प्रभागातील सर्व अडचणी आणि समस्या तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना पालिका प्रशासनाला दिल्या आहेत.

बाबासाहेब त्रिभुवन यांनी दोन दिवसांपासून संपूर्ण रहाटणी प्रभागात जाऊन पावसामुळे उदभवलेल्या समस्यांची पाहणी केली. यामध्ये प्रभागातील मुख्य व अंतर्गत रस्त्यावर साचलेल्या पाण्याचा निचरा करणे, लोकनेते गोपीनाथ मुंडे फलक चौक याठिकाणी उखडलेले ब्लॉक दुरुस्त करणे, तुंबलेले ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे, जागोजागी साचलेला कचरा साफ करणे, नादुरुस्त स्ट्रॉम वॉटर लाईन दुरुस्त करणे, साचलेल्या पाण्याचा निचरा करणे, नागरी वस्त्यांमध्ये शुद्ध पाणीपुरवठा करणे, रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवने, तसेच प्रभागातील नैसर्गिक नाल्यांची सफाई करणे तसेच लवकरात लवकर नवीन भिंत बांधण्याच्या सूचना त्रिभुवन यांनी दिल्या.

**समस्या तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना**

- या पाहणी दौऱ्यात बाबासाहेब त्रिभुवन यांनी छत्रपती चौक ते तापकीर मळा मार्गावरील विविध कॉलन्या आणि सोसायट्या, लिंक रोड, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे फलक चौक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उद्यान, प्रभागातील सर्व मुख्य व अंतर्गत रस्ते, पवनानगर, पवना नदी काठ या भागांची पाहणी केली. व त्या त्या ठिकाणच्या समस्यांसंदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा करून या समस्या तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या.

# युवा पिढीने स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्य पुढे नेणे गरजेचे : शत्रुघ्न काटे

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** "स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ एक व्यक्ती नव्हते, तर ते एक विचार होते. त्यांचे जीवन, त्यांचे कार्य आणि त्यांचे विचार हे आजही आपल्याला प्रेरणा देतात. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले त्याग आणि समर्पण हे अतुलनीय आहे. सावरकरांनी 'हिंदुत्वा'ची संकल्पना मांडून देशाच्या सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले. विज्ञाननिष्ठा, सामाजिक सुधारणा आणि भाषाशुद्धी यावर त्यांनी भर दिला. आजच्या युवा पिढीने सावरकरांच्या विचारांचा अभ्यास करून त्यांचे कार्य पुढे नेणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपा पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) तर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली, त्यावेळी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. मोरवाडी येथील भाजपा मध्यवर्ती कार्यालयात बुधवारी कार्यक्रम पार पडला. प्रसंगी, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याची माहिती दिली.



# भारत-पाकिस्तान संघर्ष अटळ : अरविंद व्यं. गोखले

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**तळेगाव दाभाडे :** पाकिस्तानी गुप्तचर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (ISI) या संस्थेचा पायाच भारत द्वेषाचा आहे. त्यामुळे ही संस्था अस्तित्वात असेपर्यंत भारत व पाकिस्तानमधील संघर्ष संपणार नाही, असे मत ज्येष्ठ पत्रकार व पाकिस्तानविषयक अभ्यासक अरविंद व्यं. गोखले यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आणि श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालयाच्या स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त तळेगाव दाभाडे येथे आयोजित "संघर्ष पाकिस्तानशी" या विषयावरील विशेष व्याख्यानात अरविंद गोखले यांनी भारत-पाकिस्तान संबंधांच्या गुंतागुंतीच्या पैलूंवर सखोल प्रकाश टाकला. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार तसेच संस्थेचे अध्यक्ष दिनेश कुलकर्णी उपस्थित होते.




**लष्करी राजवटीचे भाकीत..**

- पाकिस्तानमध्ये लष्करशहांनी अनेकदा सत्ता हस्तगत केली असून, सध्याचे पंतप्रधान शाहबाज शरीफ पदच्युत होऊन लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी सत्ता हातात घेतली तरी आश्चर्य वाटून घेण्यासारखे काही नसेल, असे भाकीतही गोखले यांनी केले. पाकिस्तानशी संघर्ष यापुढेही सुरूच राहणार असल्यामुळे पाकिस्तानमधील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवणे खूप गरजेचे आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

भारताने अलीकडच्या काळात आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण परराष्ट्र धोरण स्वीकारले आहे. कोणी एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करण्याची वृत्ती सोडून आता भारत 'जशास तसे' उत्तर देत आहे. त्यामुळे पाकिस्तानला बचावात्मक भूमिकेत यावे लागत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. गोखले यांनी अमेरिका- पाकिस्तान संबंधांवर भाष्य करताना सांगितले की, अमेरिका केवळ स्वार्थासाठी पाकिस्तानला मदत करते, मात्र आता भारत कोणाच्याही दबावात राहत नाही. ऑपरेशन सिंदूर थांबवणे ही पाकिस्तानची गरज होती, कारण त्याचे अण्वस्त्र साठे धोक्यात आले होते.

" पाकिस्तानचा आर्थिक कणा हा अवैध ड्रग्ज व्यापारावर आधारित असून त्यातून मिळणारा काळा पैसा दहशतवाद पोसण्यासाठी वापरला जातो. यामुळे पाकिस्तान हा दहशतवादी कारवायांचा अड्डा ठरत असून, ISI ही संस्था यामागे सक्रिय आहे. जगातील कोणत्याही देशात लष्कराच्या मालकीचे मॉल नाहीत, पण पाकिस्तानात लष्कराच्या मालकीचे मॉल व शॉपिंग कॉम्प्लेक्सेस आहेत.

**— अरविंद व्यं. गोखले,** अभ्यासक

संपादकीय विशेष

# काय बोध घेणार?

चारित्र्यावरील शिंतोडे आणि घरगुती हिंसाचाराची कथित वकिली व्याख्या यामुळे आणखी चिघळलेल्या वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने नवा वाद निर्माण केला. देशात 1961 पासून हुंडाबंदी कायदा अस्तित्त्वात असला, तरी वेगवेगळ्या कारणांच्या नावाखाली विवाहित महिलांचा कसा छळ केला जातो, याच्या मन हेलावून टाकणाऱ्या अशा घटना सभोवताली सतत घडत असतात. हुंड्याला वेगवेगळी गोंडस नावे देऊन विवाहितेला माहेरून पैसे, गाडी, दागिने आदी मागायला लावले जाते. त्यासाठी तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जातो. शारीरिक आणि मानसिक छळाच्या कलमाचा काही ठिकाणी गैरवापर झाला आहे. नाही असे नाही; परंतु याचा अर्थ विवाहानंतर तरुणींचा छळ केला जात नाही, असे म्हणण्याचे धाडस कुणीही करणार नाही. पुण्यात दीपा निसळ हत्याकांड गाजले होते. त्याविरोधात मोठे जनआंदोलन झाले. दीपा निसळ प्रतिष्ठानची स्थापना झाली. त्या माध्यमातून पीडितांना मदत केली जात असली, तरी महिला आयोग महिलांनी केलेल्या तक्रारींना कशी केराची टोपली दाखवतो, हे ताज्या निमित्ताने प्रकर्षाने पुढे आले. एरव्ही महिला नेत्या आक्रस्ताळ्या आवाजात एकमेकींवर नळावरच्या भांडणासारख्या टीका करत असतात;परंतु वैष्णवीच्या प्रकरणात मात्र राजकीय नेत्यांचाच संबंध असल्याने महिला नेत्या सुरुवातीला गोंधळलेल्या होत्या. महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर या केवळ पद मिरवायला आहेत, की काय असा प्रश्न पडावा अशी स्थती होती.

वैष्णवीची आत्महत्या झाल्याचे सांगितले जात असले, तरी शवविच्छेदन अहवालावरून तिला मारहाण करून गळफास लावला असावा, असे मानायला जागा आहे. या प्रकरणी रोज नवी माहिती समोर येत आहे. वैष्णवीच्या सासरची मंडळी गुन्हेगारी प्रवृत्तीची आणि विकृत मनोवृत्तीची आहेत, हे या प्रकरणातून पुढे आले आहे. पोलिस आणि महिला आयोगाने वेळीच दक्षता घेतली असती, तर वैष्णवीचा मृत्यू टाळता आला असता. हगवणे कुटुंबाकडून केवळ वैष्णवीलाच नाही, तर थोरला मुलगा सुशीलची पत्नी मयुरीचाही छळ करण्यात आला होता. मयुरीच्या आईने महिला आयोगाला लिहिलेले पत्र वाचले, तर हगवणे कुटुंबीयांची सडलेली मानसिकता लक्षात येते. महिलांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नेमक्या भावना ओळखणे, त्यांचा स्वीकार करणे, त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे खूप महत्त्वाचे आहे. याशिवाय गरज पडली तर पालकांनी योग्य भूमिका घेत हस्तक्षेप करून नेमकी परस्थती समजून घ्यावी आणि संवेदनशीलतेने त्यांच्या सोबत उभे रहायला हवे. आर्थिक स्थैर्य, आत्मनिर्भरता, साहस आणि मानसिक स्थैर्यासाठी कौशल्य विकास आणि शिक्षणाची कास धरायला हवी. विवाहित स्त्रियांच्या आत्महत्येच्या समस्येचा सामना करण्यासाठी केवळ मानसशास्त्रीय उपायच नव्हे, तर कुटुंब, समाज आणि यंत्रणेने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. देशात कायदा असला, तरी आम्ही कायद्यापेक्षा मोठे आहोत, कायदा आमचे काहीही करू शकणार नाही, असा समजणारा एक वर्ग आहे. त्यात मुळशीतील राजेंद्र हगवणे आणि त्याच्या कुटुंबीयांचा समावेश आहे.

प्रेमात आकंठ बुडताना आपण ज्याच्यावर प्रेम करतो, त्याचे प्रेम खरे आहे का, याचा विचार करण्याचे भान तरुणींना राहत नाही. तसेच निर्णय चुकला असेल, तर लग्नानंतरही दुरुस्त करता येतो, हे वैष्णवी आणि तिच्या आईवडीलांनाही कळले नाही. 'नॅशनल क्राइम रेकॉर्डस ब्यूरो (एनसीआरबी) च्या अहवालानुसार, 2017 ते 2021 या कालावधीमध्ये भारतात एकूण 35,493 हुंडाबळीच्या घटना नोंदवण्यात आल्या आहेत. याचा अर्थ हुंड्यामुळे दररोज सरासरी वीस महिलांचा बळी जातो. या मृत्यूंपैकी बहुतांश घटना उत्तर भारतात घडतात. तिथे सामाजिक दबाव, पितृसत्ताक मूल्ये आणि आर्थिक असमानता अधिक तीव्र आहे. उत्तर प्रदेश 7,048, बिहार 4,891, मध्य प्रदेश 2,979, पश्चिम बंगाल 2,576, राजस्थान 2,276, महाराष्ट्र 998, आंध्र प्रदेश 869, ओडिशा 785, झारखंड 721, कर्नाटक 611 अशी हुंड्यामुळे बळी जाणाऱ्या महिलांची आकडेवारी आहे. महाराष्ट्र हे देशाच्या औद्योगिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत राज्यांपैकी एक मानले जाते; परंतु हुंडाबळीच्या बाबतीत राज्याचा सहावा क्रमांक असणे, हे सामाजिक विकासापुढे प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. महिला आज पुरूषाच्या खांद्याला-खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कर्तव्य बजावत आहेत. शासन तसेच विविध सामाजिक संघटनांकडून महिलांसाठी वेगवेगळे उपक्रम घेऊन त्यांना बळ देण्याचे प्रयत्न केले जात आहे; मात्र आजही उंबऱ्याच्या आत ठेवून महिलांवर हक्क गाजवण्याच्या पुरुषी मानसिकतेमध्ये बदल झालेला नाही, असेच या घटनांवरून दिसते.

संस्कृती आणि शिक्षणाच्या माहेरघरात महिलांच्या छळाच्या घटना घडत असून दोनशेहून अधिक युवतींनी वर्षभरात आत्महत्येचा मार्ग निवडला. या पोलिस दप्तरी नोंद झालेल्या घटना आहेत. पोलिसांपर्यंत न पोहचलेल्यांची संख्याही मोठी आहे. अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली कुटुंबे विवाहितांचा छळ करत आहेत. प्रथम या विवाहिता त्रास सहन करतात; मात्र अतिरेक झाल्यानंतर त्याची वाच्यता होते. आई-वडिल तसेच नातेवाइकांना या गोष्टी सांगितल्या जातात. त्यातून दोन्ही कुटुंबातील वडिलधारी मंडळी एकत्र येऊन मार्ग काढतात; मात्र, काही दिवस सुखाने गेल्यानंतर पुन्हा छळ सुरू होतो. अशा वेळी सततच्या त्रासाला कंटाळून या विवाहिता जीवन संपवतात. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत कलम 80 नुसार, विवाहाच्या सात वर्षांच्या आत जळणे, शारीरिक जखम किंवा संशयास्पद परिस्थितीमध्ये एखाद्या स्त्रीचा मृत्यु झाला असल्यास आणि तिच्या मृत्युपूर्वी तिचा नवरा किंवा त्याचे नातेवाइक हुंड्याच्या मागणीसाठी तिचा छळ किंवा अत्याचार करत असल्याचे सिद्ध झाले, तर ही घटना 'हुंडाबळी' म्हणून गणली जाते. कायद्यानुसार अशा प्रकरणांमध्ये कठोर शिक्षा ठोठावली जाऊ शकते. यात आरोपी पती किंवा त्याचे नातेवाईक दोषी आढळल्यास आजीवन कारावास किंवा किमान सात वर्षांची शिक्षा होऊ शकते. 'बीएनएस'अंतर्गत कलम 108 मध्ये एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला आत्महत्या करण्यास उद्युक्त करते किंवा मदत करते तेव्हा या व्यक्तीवर गुन्हा दाखल होतो. याअंतर्गत दोषी आढळलेल्या व्यक्तीला दहा वर्षांपर्यंतचा तुरुंगवास आणि दंडही होऊ शकतो. हुंड्याच्या आरोपांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण वाढले, तर अशा प्रकारांना आळा बसू शकतो.

# समाजहिताला कॉर्पोरेट्सचे सहकार्य

**देशातल्या बड्या कंपन्यांनी भूक-गरिबीचे निर्मूलन, रोजगार वाढवणाऱ्या कौशल्यांचा तसेच शिक्षणाचा प्रचार आदी उपक्रमांसाठी तसेच केंद्र सरकारने सामाजिक आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या निधीत योगदान द्यावे, असे अपेक्षित आहे. मार्च 2024 मध्ये संपलेल्या वर्षात देशात सीएसआर फंडात 16 टक्क्यांची वाढ होणे, ही बाब स्वागतार्ह आहे. या उपक्रमांमधून काय साध्य झाले हेही तपासून पाहण्याजोगे आहे.**

परामर्श

हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार



गेल्या काही वर्षांमध्ये सीएसआर किंवा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ही संकल्पना विकसित झाली आहे. कंपन्यांनी देशाच्या सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणीय विकासात योगदान देणाऱ्या उपक्रमांसाठी मदत करावी, हा त्यामागील हेतू आहे. व्यवसाय-उद्योगांनी नफा जरूर मिळवावा, परंतु समाजासाठी सकारात्मक कृतीही करावी, अशी अपेक्षा असते. भारतात सीएसआर नियंत्रित करणारी कायदेशीर चौकट प्रामुख्याने कंपनी कायदा, 2013 मध्ये नमूद केली आहे. या कायद्याच्या अनुसूची सातमध्ये केलेल्या नियमानुसार कंपन्यांनी मागील तीन वर्षांमध्ये आपल्या सरासरी निव्वळ नफ्याच्या किमान दोन टक्के सीएसआर उपक्रमांवर खर्च करणे आवश्यक आहे. तसेच 500 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक उलाढाल आणि पाच कोटी रुपये किंवा त्याहून अधिक निव्वळ नफा मिळवणाऱ्या कंपन्यांनी त्यांचे सीएसआर धोरण तयार करण्यासाठी आणि त्यावर देखरेख करण्यासाठी एक समिती नेमावी, जेणेकरून निधीचा प्रभावी वापर होईल, अशी अपेक्षा सरकारने यासंदर्भात व्यक्त केली आहे. भूक आणि गरिबीचे निर्मूलन, विशेष शिक्षण आणि रोजगार वाढवणाऱ्या व्यावसायिक कौशल्यांसह शिक्षणाचा प्रचार, लिंगभाव समानतेला प्रोत्साहन देणे आणि महिलांना सक्षम बनवणे, पर्यावरणीय शाश्वतता निश्चित करणे तसेच किंवा केंद्र सरकारने सामाजिक आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही निधीत योगदान द्यावे, असे सीएसआरच्या नियमात म्हटले आहे. भारतात सीएसआर 2014-15 मध्ये 10 हजार कोटी रुपयांवरून 2020-21 मध्ये 24 हजार कोटी रुपयांवर गेला होता.

मार्च 2024 मध्ये संपलेल्या वर्षात सीएसआर फंडात 16 टक्क्यांची वाढ झाली असून 17 हजार 967 कोटी रुपये जमले आहेत, ही गोष्ट स्वागतार्हच म्हणावी लागेल. यामध्ये बाजी मारली आहे ती एचडीएफसी बँकेने. त्यांचा सीएसआर फंड होता 945 कोटी रुपये. त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीज- 900 कोटी, टीसीएस-827 कोटी आणि ओएनजीसी-634 कोटी अशा रकमा खर्च झाल्या आहेत. सीएसआर खर्चात इतकी वाढ होण्यामागील एक कारण म्हणजे कोरोना संपल्यानंतर अर्थव्यवस्था आणि औद्योगिक क्षेत्र पुन्हा एकदा गतिमान होऊ लागले. कंपन्यांच्या नफ्यामध्ये 18 टक्के वाढ झाली असून खर्च करण्यासाठी त्यांच्याकडे रकमादेखील उपलब्ध होऊ लागल्या. टाटा स्टील, आयसीआयसीआय बँक, आयएफसी, इन्फोसिस, आयटीसी, पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन अशा कंपन्यांनी सीएसआरमधून भरपूर खर्च केलेला दिसतो. गेल्या तीन वर्षांमधील 1394 कंपन्यांचा निव्वळ नफा सरासरी नऊ लाख कोटी रुपयांवर गेला गेला आहे. 2022-23 च्या तुलनेत त्यात दीड लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. एकूणच कंपन्यांची उलाढाल वाढली असून त्यानुसार सीएसआर सक्तीची मर्यादा वाढवणे आवश्यक आहे. तसे केल्यास छोट्या कंपन्यांना हा खर्च करावा लागणार नाही. सीएसआरमधून सर्वाधिक म्हणजे 1,104 कोटी रुपये खर्च हा शिक्षणावर आणि 720 कोटी रुपये आरोग्यसेवांसाठी खर्च करण्यात आला आहे.

आजघडीला भारतात शिक्षण आणि आरोग्याच्या सेवा-सुविधा वाढवण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने कंपन्यांचा हातभार लागत आहे, हे महत्त्वाचे. परंतु त्याच वेळी झोपडपट्टी विकास, आपत्ती व्यवस्थापन यावरील खर्च तुलनेने खूपच कमी आहे. आनंदाची बाब म्हणजे, शाश्वत पर्यावरण विकासाकरता सीएसआरमधून अगोदरपेक्षा 54 टक्के अधिक खर्च करण्यात आला आहे. ग्रामीण विकासासाठीदेखील फारशी मदत झालेली नाही. आणखी एक बाब म्हणजे काही कंपन्यांनी खर्चाच्या रकमेच्या बंधनापलिकडे जाऊन अधिक खर्च केला आहे तर 269 कंपन्यांनी दोन टक्क्यांपेक्षा कमी खर्च केला आहे. तसेच दिलासा देणारी बाब म्हणजे सार्वजनिक उपक्रमांच्या सीएसआर खर्चामध्ये 19 टक्क्यांची भरघोस वाढ झाली आहे. काही कंपन्यांनी 'सीएसआर' फंडातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या योजना घेतल्या आहेत. गौतम अदानी यांच्या कंपनीचा त्यात पुढाकार आहे. देश ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दिशेने निर्णायक पावले उचलत आहे. पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना आणि अदानी फाउंडेशन यांच्या संयुक्त पुढाकारामुळे अमेठीतील टिकारिया भागातील गावांमध्ये क्रांतिकारी बदल दिसून येत आहेत. 'अदानी ग्रुपच्या एसीसी सिमेंट प्लांट'च्या 'सीएसआर' निधीतून आणि सरकारी अनुदानातून प्रति लाभार्थी 15 हजार रुपयांच्या मदतीतून ग्रामस्थांच्या घरांच्या छतावर सौर पॅनेल बसवली जात आहेत. 'प्रधानमंत्री सूर्य घर योजना' ही केवळ एक सरकारी योजना नाही, तर भारताच्या ऊर्जा क्रांतीचा पुढचा अध्याय आहे. हा उपक्रम पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि स्वावलंबन यांचा मेळ घालतो.

सुर्याच्या ऊर्जेपासून तुम्ही पैसे कमावू शकता, ते ही तुमच्या स्वतःच्या अंगणातून. भारत सरकारच्या योजनेअंतर्गत देशभरातील एक कोटी घरांच्या छतावर सौर पॅनेल बसवण्याचे लक्ष्य आहे. त्यामुळे प्रत्येक घराला दरमहा तीनशे युनिटपर्यंत मोफत किंवा स्वस्त वीज मिळेल. या उपक्रमामुळे घरगुती खर्च कमी होईल, हरित ऊर्जेला प्रोत्साहन मिळेल आणि पर्यावरण संरक्षण मजबूत होईल. या योजनेचे उद्दिष्ट 2026-27 पर्यंत 30 गीगावॅट रूफटॉप सोलर क्षमता स्थापित करण्याचे आहे. त्यामुळे स्थानिक तरुणांसाठी रोजगाराची नवीन दारे उघडतील. 'अदानी फाउंडेशन'च्या टीमने गावोगावी जाऊन योजनेच्या फायद्यांची माहिती दिली, लाभार्थींची यादी तयार केली, त्यांची राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी केली आणि निवडलेल्या विक्रेत्यामार्फत सौरऊर्जा प्रकल्प बसवले. आतापर्यंत 90 घरांमध्ये सौर पॅनेल बसवण्यात आले आहेत. एका किलोवॅटवर फक्त पाच हजार रुपये खर्च होतात. अधिकाधिक लोकांना प्रेरणा मिळावी, म्हणून 'प्रधानमंत्री सूर्य घर योजने'अंतर्गत प्रत्येक घराला सौर पॅनेलने ब्रँड केले गेले आहे. एखाद्या लाभार्थ्याने एक किलोवॅटचा, सुमारे 65 हजार रुपये खर्च असणारा सौरऊर्जा प्रकल्प बसवल्यास 45 हजार रुपयांच्या सरकारी अनुदानानंतर आणि 15,000 रुपयांच्या अदानी फाउंडेशनच्या मदतीनंतर फक्त 5,000 रुपये द्यावे लागतील. यातून दररोज सरासरी 4.5 युनिट वीज निर्मिती झाल्यामुळे दरमहा अंदाजे 877 रुपये उत्पन्न मिळते. मोठ्या सिस्टीमवर ही कमाई आणखी वाढते. दोन किलोवॅटसाठी 1,755 रुपये, तीन किलोवॅटसाठी 2,632 रुपये आणि सहा किलोवॅटसाठी 5,265 रुपये प्रति महिना उत्पन्न मिळते आणि घरी वीजही वापरता येते.

सौर ऊर्जेच्या प्रसारासाठी वीज निर्माता कंपनी असलेल्या अदानी समूहाने सामाजिक दायित्व निधी देऊन संपूर्ण गावाला एका लोकचळवळीत सहभागी करून घेतले, हे चांगले झाले. काही मोठ्या आणि नावाजलेल्या कंपन्यांनी स्वतःचे एक चॅरिटेबल ट्रस्ट फाउंडेशन किंवा संस्था स्थापन केली आहे. त्या ट्रस्टमार्फत विविध समाजोपयोगी कामे केली जातात. त्यासाठी सीएसआर निधी वापरला जातो. उदाहरणार्थ, टाटा ट्रस्ट किंवा रिलायन्स फाउंडेशन इत्यादी. या संस्था इतर संस्थांसोबतही काम करतात आणि त्यांना निधी उपलब्ध करून देतात. सामाजिक कार्य करणाऱ्या छोट्या-मोठ्या संस्थांनादेखील सीएसआर निधी मिळवता येतो. पण त्यासाठी काही कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असते. तुमचे ट्रस्ट किंवा संस्था ही धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी केलेली असावी किंवा कंपनी कायद्याखाली कलम 8 खाली नोंदलेली कंपनी असावी. तुमची संस्था ही आयकर कायद्याच्या कलम 12 ए खाली नोंद केलेली असावी. तुमच्या संस्थेला आयकराचे 80जी सर्टिफिकेट प्राप्त असावे. तुमच्या संस्थेची नोंदणी ही नीती आयोगाच्या वेबसाईटवर केलेली असावी. संस्था अगदीच नवीन नसावी, तिला कुठल्या तरी क्षेत्रात काम केल्याचा दोन-तीन वर्षांचा अनुभव असावा. भारताबाहेरील कंपनीकडून देणगी हवी असल्यास तुमच्या संस्थेला एफआरएचे नोंदणी प्रमाणपत्र असावे. कंपनी कायद्याखाली सीएसआर वन फॉर्म मध्ये अर्ज करून नोंदणी केलेली असावी, हे नियम पाळले तर सीएसआर फंडाचा अनेक संस्थांना उत्तम उपयोग करून घेता येतो.

खेचाखेची

## बँकेचा मेल

सर, कृपया आपला पॅनची सविस्तर माहिती पाठवा.

.
.
.
.
.
.

**दुकानदार** : ओली सुपारी, वेलची, चेरी, गुलकंद, बडीशेप आणि चुना थोडा कमीच लावा.

सुप्रभात — वेगळं काही

उत्तर प्रदेशातल्या प्रतापगड जिल्ह्यातल्या प्रदीपकुमार तिवारीने आपल्या लग्नाची वरात चक्क सायकलवरून काढली. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्याच्या उद्देशाने प्रदीपने असं केलं. त्याच्या भावनांचा आदर राखत वधूपक्षानेही फुलांऐवजी रूद्राक्षाच्या माळा घालून वरपक्षाचं स्वागत केलं. प्रदीपकुमारच्या या कृतीचं सगळीकडून खूप कौतुक होत आहे. प्रदीपचे वडील सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी आपल्या मुलाचं लग्न जवळच राहणाऱ्या मुलीशी ठरवलं. काही दिवसांपूर्वीच प्रदीपने पर्यावरणपूरक लग्नाच्या संकल्पनेविषयी वाचलं होतं. मग आपणही असंच काही तरी करावं असं त्याच्या मनाने घेतलं आणि त्याने सायकलवरून वरात काढली.

फॅशन पॅशन

## ...मिळेल साजेसा लूक



कार्यक्रमांच्या स्वरुपानुसार कपड्यांची निवड केली जाते. थोडं नियोजन असेल तर तुम्ही प्रत्येक कार्यक्रमासाठी परफेक्ट लूक मिळवू शकता. कसं ते पाहू...
* फॅमिली गेटटुगेदर– अशा कार्यक्रमांसाठी सनड्रेस, स्कर्टस, पलाजो आणि क्रॉप टॉप हे पर्याय तुम्ही निवडू शकता. याशिवाय तुम्हाला आरामदायी वाटणारा कोणताही पेहराव या कार्यक्रमात घालू शकता. * बर्थडे पार्टी– अशा कार्यक्रमांना मिनी स्कर्ट, स्लिप ड्रेस, ह्युब ड्रेस, केप्री, पलाझो हे पर्याय निवडू शकता. या ड्रेससोबत तुम्ही हँगिंग इअररिंग्ज, एथनिक रिंग्ज वापरू शकता. याशिवाय रोप सँडल, टिपटॉप सँडल आणि किटन हिल्स वापरू शकता. * फेस्ट– या कार्यक्रमासाठी आपल्याकडे लेटेस्ट आणि इतरांपेक्षा वेगळा ड्रेस असेल याची काळजी घ्या. अशा कार्यक्रमांसाठी लेटेस्ट ड्रेससोबत स्लिप आणि नेट ड्रेस, मिनी विथ शॉर्ट टॉप, लाँग गाऊन हे पर्याय सर्वोत्तम आहेत. एथनिक ज्वेलरी, चेन ज्वेलरी या आउटफिटवर उठून दिसतात. यासोबत हाय हिल्स कॅरी करायला विसरू नका. * आउटिंग– या प्रसंगी शॉर्टस, क्रॉप टॉप, केप्री हे पर्याय उत्तम ठरतात.




राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षापूर्तीसाठी कठोर परिश्रमावर भर द्या. कर्तव्याकडे अधिक लक्ष द्यावं. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ** : कार्यात अडथळे येतील. हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. उष्णतेचे विकार उद्भवू शकतात.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. थोरामोठ्यांचं मार्गदर्शन हितावह ठरेल. पुरेसा संयम बाळगावा.
- **कर्क** : रेंगाळलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक उलाढाल बऱ्यापैकी राहील. कौटुंबिक मतभेद संभवतात.
- **सिंह** : विचारपूर्वक आश्वासनं द्या. प्रक्रिया उद्योगात विशेष अनुकूलता राहील. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **कन्या** : कामकाजात पुरेशी सतर्कता बाळगावी. व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. नव्या ओळखी होतील.
- **तूळ** : मित्र, सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. आपलंच खरं हा आग्रह टाळा. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **वृश्चिक** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. मतभेदाचे प्रसंग टाळायला हवे.
- **धनु** : जवळच्या व्यक्तिकडून विश्वासघात संभवतो. प्रवास शक्यतो टाळावा. अपचनाचे विकार संभवतात.
- **मकर** : प्रयत्नांना अधिक बळ मिळेल. पतप्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करावा. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : वागण्या–बोलण्यात विशेष काळजी घ्यावी. कौटुंबिक प्रश्नांची चिंता राहील. विचारपूर्वक पावलं टाका.
- **मीन** : अनपेक्षित घटना ताण वाढवतील. व्यवसायात साधारण स्थिती राहील. प्रकृतीची काळजी घ्यावी.

सुगरणीचा सल्ला

## थंडगार लज्जतदार!

आईस्क्रीम हा आबालवृद्धांचा आवडता पदार्थ आहे. असह्य उन्हात आईस्क्रीमची चव चाखायला मिळाली तर ... आहाहा! कल्पना करूनच छान वाटू लागलं आहे. उन्हाळ्यात विविध प्रकारचं आईस्क्रीम घरी करणार असाल तर या रेसिपी तुम्हाला उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

**ब्लूबेरी कोकोनट पॉप्सिकल्स**

**साहित्य–** दोन कप करवंदाचा गर, चार टेबलस्पून पाणी, पाच टेबस्पून मेपल सिरप, तीन चतुर्थांश नारळाचं दुध, अर्धा कप बदामाचं दुध

**कृती–** सगळ्यात आधी एका भांड्यात करवंदांचा गर, पाणी आणि तीन टेबलस्पून मेपल सिरप मंद आचेवर उकळून घ्यावं. थंड होण्यासाठी ठेवून द्यावं. दुसऱ्या भांड्यात नारळाचं दुध, दोन टेबलस्पून मेपल सिरप आणि बदामाचं दुध मिसळून घ्यावं. पॉप्सिकल्सचे मोल्ड घ्यावेत. त्यात अर्ध्यापर्यंत ब्लूबेरीचं मिश्रण घालावं. अर्ध्यापर्यंत नारळाच्या दुधाचं मिश्रण घालावं. **क्रमश:**

दिनविशेष

## ३० मे

२०१५ : भूसंपादन विधेयकावर सुरू असणाऱ्या विरोधाला न जुमानता मोदी सरकारने तिसरा अध्यादेश मंजूर केला.
२०१७ : पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत त्यांच्याबरोबर क्रिकेट मालिका होणार नसल्याचं केंद्रीय क्रीडामंत्री विजय गोयल यांनी स्पष्ट केलं.
२०१८ : एअरसेल मॅक्सिस गैरव्यवहारप्रकरणी माजी केंद्रीय अर्थमंत्री पी.चिदंबरम यांना पुढील सुनावणीपर्यंत अटक न करण्याचे न्यायालयाचे आदेश.

वेगळ्या वाटा

## विश्व व्हिज्युअल इफेक्टचं...

व्हीएफएक्सला असणारी वाढती मागणी लक्षात घेता तुम्ही यातील तंत्रज्ञ म्हणून काम करू शकता. या क्षेत्राविषयी...

व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचे ३, ६ आणि १२ महिन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही संस्थांमध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रमही चालवला जातो. व्हिडिओ प्रोडक्शन, ग्राफिक डिझाइन, मोशन ग्राफिक्स, कॅमेरा ट्रॅकिंग, फिल्म रिस्टोरेशन अशी तंत्र यात शिकवली जातील. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते. बारावी किंवा पदवीनंतर तुम्ही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रपट, मालिका, ॲनिमेशन, व्हिडिओ गेम्स, ॲप्स, व्हिडिओ, जाहिराती तसंच मनोरंजन क्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकाल. माध्यमक्षेत्रात ग्राफिक डिझायनर तसंच व्हीएफएक्स तंत्रज्ञांना बरीच मागणी असते. महानगरांसोबतच छोट्या शहरांमध्येही बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काहीतरी वेगळं करायचं असेल तर व्हीएफएक्सच्या क्षेत्रात काम करायला हरकत नाही. इथे तुम्हाला चांगला वाव मिळेल.

पंचांग

**शुक्रवार, ३० मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ शु. ४, नक्षत्र : पुनर्वसु
चंद्रराशी : मिथुन , योग : गंड
सूर्योदय: ६.०३, सूर्यास्त: ७.१०

फॉरवर्डस

**कुछ कह गये**
**कुछ सह गये**
**कुछ कहते कहते रह गये।**
**हम सही तूम गलत के**
**खेल में न जाने,**
**कितने रिश्ते ढह गये...।**

आरोग्यमंत्र

## वेळेत निदान गरजेचं

कुष्ठरोग हा एक गंभीर आजार असून भारतात त्याचं प्रमाण कमी झालेलं असलं तरी अद्याप त्याचं समूळ उच्चाटन झालेलं नाही. मुख्य म्हणजे समाजातील काही वर्गांमध्ये आजही यासंदर्भातील काही गैरसमज पहायला मिळतात. मात्र कुष्ठरोग अनुवंशिक नसतो त्याचप्रमाणे तो दैवी प्रकोपही नसतो. स्पर्श केल्याने तो पसरत नाही. वेळीच उपचार झाले तर कुष्ठरोग बरा होतो. या पार्श्वभूमीवर कुष्ठरोगाच्या प्राथमिक लक्षणांची माहितीही घ्यायला हवी.



* भुवयांचे केस गळणं हे याचं प्राथमिक लक्षण आहे. * कोणतीही जखम दीर्घकाळ भळभळती राहणं हे देखील कुष्ठरोगाचं लक्षण असू शकतं. त्वचेवर डाग दिसणं आणि या जागी कोणताही स्पर्श न जाणवणं हे कुष्ठरोगाचं लक्षण आहे. त्वचेवरील हा डाग रंगहीन असतो. या ठिकाणी सुई टोचली तरी कोणत्याही वेदना जाणवत नाहीत. * हातापायांची बोटं बधीर होणं, नसांमधील संसर्ग कमी होणं हे कुष्ठरोगाचं प्रमुख लक्षण आहे. हातापायांची बोटं बधीर झाल्याने रुग्ण स्पर्शज्ञान अनुभवू शकत नाही. * हातापायातील ताकद कमी होणं, वस्तू पकडण्याची हातांची क्षमता कमी होणं हे देखील कुष्ठरोगाचं प्रमुख लक्षण आहे. * या रुग्णांना डोळ्यांची उघडझाप करताना अडचण जाणवू शकते. * कुष्ठरोग पुढच्या अवस्थेत पोहोचल्यानंतर श्वसनसंस्थेमध्ये संसर्ग उत्पन्न होतो, कफ साठून राहतो आणि रुग्णाची स्थिती उत्तरोत्तर खालावत जाते. यात रुग्णाचा अंत होतो. म्हणूनच वेळेत निदान होणं अत्यंत गरजेचं असतं.

वाचा तर खरं

## रेझ्युमे बनवण्यासाठी...

दोस्तांनो, परीक्षांचे निकाल लागल्यानंतर नोकरीचा शोध सुरू होतो. नोकरी मिळवण्यासाठी रेझ्युमे बनवावा लागतो. तुमचा रेझ्युमे आकर्षक असणं गरजेचं आहे. यासाठी काही वेबसाईट्स तुम्हाला मदत करू शकतात. यासाठी 'सीव्ही डॉट मी' ही साईट सर्वात सोपा पर्याय आहे. या साईटवर जाऊन प्रत्येक चौकट भरायला सुरूवात करा. या साईटवर रेझ्युमेचा फॉरमॅट देण्यात आला आहे. याची पीडीएफ कॉपी तुम्ही डाउनलोड करू शकता. याशिवाय 'बायो टोरे' या साईटवरून स्मार्टफोन फॉर्मेटमध्ये रेझ्युमे बनवता येईल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# ऑपरेशन सिंदूर संपलेलं नाही

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कोलकाता :** ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेलं नाही, असं सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, पाकिस्तानवर यापूर्वीच तीन वेळा हल्ले करण्यात आले आहेत. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या सर्वांवर भारत निर्णायक कारवाई करेल, असा इशाराही त्यांनी दिला.

ऑपरेशन सिंदूरनंतर पहिल्यांदाच पश्चिम बंगालमधील अलीपूरद्वार येथे एका रॅलीला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, भारतीय महिलांच्या प्रतिष्ठेचा अपमान करणाऱ्या दहशतवाद्यांच्या धाडसाचा बदला देशाच्या सशस्त्र दलांनी घेतला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, बंगालच्या या भूमीवरून मी १४० कोटी भारतीयांच्या वतीने जाहीर करतो की, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूरतेनंतर पश्चिम बंगालमध्येही प्रचंड संताप ाची लाट उसळली होती. तुमचा राग मला चांगलाच समजला होता. आमच्या बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस दहशतवाद्यांनी केले. आमच्या सैन्याने त्यांना सिंदूरच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली. भारताने दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुतेचे धोरण अवलंबल्याचा पुनरुच्चार करताना ते म्हणाले, पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जगाला सांगितले आहे की, आता भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर शत्रूला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. पाकिस्तानने हे समजून घेतले पाहिजे की, आम्ही त्यांच्या घरात घुसून तुमच्यावर तीन वेळा हल्ले केले आहेत.

त्यांनी या कारवाईचे स्पष्ट नाव घेतले नसले, तरी २०१६ मध्ये भारताने केलेले सर्जिकल स्ट्राईक, २०१९ मधील बालाकोट एअर स्ट्राईक आणि अलीकडेच ऑपरेशन सिंदूरचा भाग मानल्या जाणाऱ्या सीमेपलीकडील छुप्या हल्ल्यांचा संदर्भ म्हणून त्यांच्या वक्तव्याकडे पाहिले जात आहे.

ते म्हणाले की, आम्ही सीमेपलीकडील दहशतवादी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्या आहेत, ज्याचा पाकिस्तानने कधी विचारही केला नव्हता. आम्ही पाकिस्तानच्या घरात घुसून तीन वेळा हल्ला केला आहे. पाकिस्तानी लष्कराने दहशतवाद आणि सामूहिक हत्या हे आपले सर्वात मोठे कौशल्य बनवले आहे, असा आरोप मोदी यांनी पाकिस्तानच्या लष्करी यंत्रणेला केला. दहशतवाद आणि सामूहिक हत्या हे पाकिस्तानी लष्कराचे सर्वात मोठे कौशल्य आहे. जेव्हा जेव्हा युद्ध होते तेव्हा त्यांना पराभवाला सामोरे जावे लागते, असे पंतप्रधान म्हणाले.



**मुंबई :** दरड कोसळणे, वीज कोसळणे, झाडे किंवा वास्तू कोसळणे अशा घटनांमुळे गेल्या पाच दिवसांत महाराष्ट्रात सोळा जणांचा मृत्यू झाला आहे.

## अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त 'भाजयुमो'तर्फे 'युवा प्रेरणा संवाद'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या शुक्रवारी (ता. ३०) दुपारी २.०० वाजता शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम होणार आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने सकाळी वेशभूषा स्पर्धा घेण्यात येणार असून, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे,भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## भोर-मांढरदेवी घाटात दरड कोसळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील मांढरदेवी घाटात आज सकाळी दरड कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. सकाळी 6:30 वाजण्याच्या सुमारास, एका वळणावरून जात असलेल्या वाहन चालकाने डोंगरावरून माती आणि दगडं खाली सरकताना पाहिले. त्याने प्रसंगावधान राखत तात्काळ आपले वाहन थांबवले आणि त्याच वेळी त्याने मोबाईल कॅमेराद्वारे दरड कोसळतानाचे दृश्य शूट केले. या थरारक घटनेची व्हिडीओ क्लिप सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. घटनेच्या ठिकाणी वाहन सुरूच असते तर मोठा अपघात किंवा जीवितहानी झाली असती. मात्र चालकाने वेळीच वाहन थांबवले आणि दुसऱ्यांना सावध केले यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर आंबाडे गावचे सरपंच शिवाजी खोपडे यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाला (PWD) याबाबत माहिती दिली. PWDच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून दोन तासांत जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावर पडलेला राडारोडा बाजूला केला. त्यामुळे वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात यश आले आहे.

पान १ वरून

## फुकट्यांचा 'पीएमपीएमएल' ला ९१ लाखांचा 'आहेर'...!

फुकट प्रवास करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलत, पीएमपीकडून शहरातील विविध मार्गांवर तिकीट तपासणी पथके नेमली गेली आहेत. ही पथके बसस्थानकांवर आणि प्रवासादरम्यान तपासणी करत असून, तपासणी दरम्यान अनेक विनातिकीट प्रवासी हाती लागतात. विशेष म्हणजे, फक्त ५ ते १० रुपयांचे तिकीट टाळण्यासाठी प्रवासी ५०० रुपयांपर्यंत दंड भरतात. तरीही ही प्रवृत्ती थांबलेली नाही. पीएमपीला या दंडात्मक कारवाईतून दर महिन्याला ८ ते ९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते, हे चित्र चिंताजनक असून, हा महसूल सेवा सुधारण्यासाठी नव्हे तर गैरप्रवृत्तीवर कारवाईसाठी खर्च होतो. पीएमपी प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, फुकट प्रवासाच्या मोहात न पडता नियमांचे पालन करावे, कारण किरकोळ रक्कम वाचवण्याच्या नादात मोठा दंड भोगावा लागू शकतो. तिकीट काढून प्रवास केल्यास सेवाही सुस्थितीत राहील आणि गैरप्रवृत्तीही आटोक्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रात सापडले पाकिस्तानचे हेर

तपासात समोर आले आहे की, या तरुणाचा नोव्हेंबर २०२१ मध्ये फेसबुकद्वारे एका पाकिस्तानी गुप्तहेर एजंटशी संपर्क झाला होता. त्यानंतर, नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ दरम्यान, त्याने व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून गोपनीय आणि संवेदनशील प्रादेशिक माहिती पाठवली होती.

या प्रकरणात तिन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे एटीएस युनिटने या सर्वांवर गुप्तचर अधिनियम १९२३ च्या कलम ३(१)(अ), ५(१) आणि बीएनएसच्या कलम १२०(ब) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या सर्वांकडून दहशतवादाशी संबंधित पैलूंची सखोल चौकशी केली जात आहे.

## मनपाः महायुतीचे स्वबळ?

त्यामुळे ही निवडणूक राष्ट्रवादीसाठी तरी सोपी जाणार नसल्याचे स्पष्ट आहे. तर शिवसेनेची काही प्रमाणात हीच अवस्था असणार आहे.

महायुतीमधून जरी एकत्र निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला, तरी जागा वाटपाचा तिढा अत्यंत गहन असाच असेल. महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपचे ९९ नगरसेवक होते. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसचे ४२ आणि शिवसेनेचे १० नगरसेवक निवडून आले होते. आता आगामी निवडणुकीत नगरसेवकांची संख्या १६६ च्या जवळपास असेल. त्यातच ठाकरे गटाचे ५ माजी नगरसेवक भाजपात आले आहेत. त्यामुळे भाजपने किमान ११० ते ११५ जागांची मागणी केली, तर राष्ट्रवादी आणि शिवसेनेला एकही जागा वाढून मिळणार नाही. त्यामुळे जागा वाटपाचा पेच सोडवून एकत्र निवडणूक लढविणे तसेही अशक्यच ठरणार आहे. त्यावर अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती हाच पर्याय असणार आहे.

## न्यायालयीन कोठडी

होत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी देखील वकिलांच्या विरोधात वक्तव्य केलं होत. मात्र, आज पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, करिष्मा हगवणे यांना शिवाजीनगर सत्र न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं या तिघांनी १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

## महागाई भत्त्यात २% वाढ जाहीर

लागू केली गेली आहे आणि ती १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार आहे.

या निर्णयामुळे लाखो कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. उदाहरणार्थ: जर एखाद्या कर्मचाऱ्याची बेसिक सॅलरी ५०,००० असेल, तर आधी त्याला ५३% प्रमाणे २६,५०० डीए मिळत होता. आता ५५% प्रमाणे २७,५०० मिळेल. म्हणजेच १,००० वाढ. ७०,००० बेसिक सॅलरीवर आधी ३७,१०० डीए मिळत होता, तो आता ३८,५०० होईल. म्हणजे १,४०० वाढ. १,००,००० बेसिक सॅलरी असलेल्या कर्मचाऱ्याला आता ५५,००० डीए मिळेल.

गेल्या सहा-सात वर्षांत डीए मध्ये सामान्यत: ३% किंवा ४% वाढ केली जात होती. मात्र, ७८ महिन्यांमध्ये प्रथमच डीए मध्ये केवळ २% वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी २०१८ मध्येच अशा प्रकारची २ टक्क्यांची वाढ झाली होती.

## रविवारी कुंभमेळा तयारीचा शंखनाद

प्रमुख साधू-संत, राज्य सरकारमधील महत्त्वाचे मंत्री, तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या बैठकीत नाशिकमधील शाहीस्नानाच्या तारखा अधिकृतपणे जाहीर होणार आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा भरणार असून त्र्यंबकेश्वर येथील तारखा यापूर्वीच जाहीर झाल्या आहेत. परंतु अद्याप नाशिकच्या तारखा जाहीर करण्यात आलेल्या नव्हत्या, त्यामुळे साधू-महंतांमध्ये नाराजी होती. हीच नाराजी दूर करण्यासाठी रविवारी बैठक होत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात दुपारी १२ ते २ या वेळेत बैठक होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीसांसह मंत्री छगन भुजबळ, दादा भुसे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचीही उपस्थिती असणार आहे.

## सोने साठ्यात विक्रमी वाढ

या वाढत्या मालमत्तेमुळे भारताची आर्थिक स्थिरता अधिक मजबूत होत असल्याचे संकेत मिळतात.

आरबीआयच्या आर्थिक स्थितीत मोठी सुधारणा झाली आहे. त्यांचे एकूण उत्पन्न २२.८% ने वाढले आहे. एकूण ताळेबंदाचा आकार ८.२% ने वाढून ७६.२५ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, खर्चात फक्त ७.७६% वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम आरबीआयच्या नफ्यावर दिसून आला. आरबीआयने २०२४-२५ मध्ये सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा विक्रमी अधिशेष दिला आहे. हा आकडा मागील वर्षाच्या तुलनेत २७.३७% जास्त आहे.

सरकारला मिळालेला हा मोठा निधी वित्तीय तूट कमी करण्यास मदत करेल. यामुळे सरकारला पायाभूत सुविधांवर अधिक खर्च करता येईल किंवा लोकाभिमुख योजनांसाठी निधी वापरता येईल, ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. आरबीआयच्या या धोरणांमुळे भारताची आर्थिक स्थिरता आणि रुपयाचे मूल्य मजबूत होण्यास मदत मिळते.

आरबीआयचा एकूण ताळेबंद ८.२% ने वाढून ७०.४७ लाख कोटी रुपयांवरून ७६.२५ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. ही आकडेवारी आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील आहे. देशांतर्गत मालमत्ता : एकूण मालमत्तेपैकी २५.७३% वाटा देशांतर्गत मालमत्तेचा आहे. मागील वर्षी हे प्रमाण २३.३१% होते. विदेश मालमत्ता : परकीय चलन, सोने आणि इतर परदेशी गुंतवणुकीचा वाटा ७४.२७% आहे.

## छत्रपती शिवरायांचा इतिहास ६८ शब्दांत

निजामशाहीसह त्या काळाच्या जगातल्या सर्वात बलाढ्य असलेल्या मुघल साम्राज्याविरुद्ध लढा देऊन स्वराज्य निर्माण केलं. परंतु जगभराचा अभ्यास एका पुस्तकात बसवण्यासाठी ज्यांनी हा देश वाचवला त्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि त्यांच्या कर्तृत्वाबद्दल केवळ ६८ शब्द या पुस्तकामध्ये लिहिण्यात आले आहे. सीबीएसई बोर्ड हे देश पातळीवर शिकवल्या जाणाऱ्या इयत्ता चौथी ते बारावी पर्यतच्या पुस्तकामध्ये जर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केवळ एक धडा आणि त्यामध्ये जर फक्त ६८ शब्द छापले असतील तर हे नक्कीच निषेधार्ह आहे. सरकारने महाराजांचा खरा इतिहास मांडला पाहिजे, असे ते म्हणाले.

दिल्लीच्या सीबीएसई पॅटर्नमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठ्यांचा इतिहास हा केवळ ६८ शब्दांमध्ये मांडला आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि मराठ्यांच्या कर्तृत्वाचा अपमान आहे. त्यामुळं सीबीएसई बोर्डाचा हा पॅटर्न महाराष्ट्रामध्ये आम्ही लागू होऊन देणार नाही. राज्य सरकारने जर तो लागू केला तर ती सर्व पुस्तक आम्ही जाळून टाकू आणि येणाऱ्या पिढीला छत्रपतींचा इतिहास आणि मराठ्यांचं कर्तृत्व सांगण्यासाठी प्रयत्न करू. तसेच राज्य सरकारने सीबीएसई पॅटर्न राज्यात लागू करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि संपूर्ण मराठा साम्राज्याचा खरा इतिहास येणाऱ्या पिढीला कळावा, याची काळजी घेणं गरजेचं आहे. राज्य सरकारने याबाबतीत ठोस पावले उचलली नाहीत आणि या सर्व गोष्टींची दखल घेतली नाही तर सीबीएसई पॅटर्नच्या या पुस्तकांची आम्ही होळी करू, असा इशारा देखील यावेळी देण्यात आला.

## सर्वोच्च न्यायालयाला मिळाले तीन न्यायाधीश

नियुक्त्यांशी संबंधित फायली बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पोहोचल्या, त्यानंतर त्यांना मंजुरी मिळाली. त्यांच्या नियुक्त्यांमुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची मंजूर संख्या ३४ झाली आहे. कॉलेजियममध्ये सर्वोच्च न्यायालयातील पाच ज्येष्ठ न्यायमूर्तींचा समावेश आहे. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यासह न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना हे न्यायाधीशांच्या निवड समितीचे सदस्य आहेत. कॉलेजियमने २६ मे रोजी झालेल्या बैठकीत तिन्ही न्यायाधीशांच्या पदोन्नतीची शिफारस केली होती.

## सावरकर आणि गोडसे यांच्यात नातं

गांधींनी न्यायालयाला विनंती केली आहे की, तक्रारदाराला त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीची माहिती सार्वजनिक करण्याचे आदेश द्यावेत.

राहुल गांधी यांनी याबाबत दाखल केलेल्या तक्रारीनुसार, हे सत्य केवळ संबंधित नाही, तर या मानहानी खटल्याची दिशा आणि हेतू स्पष्ट करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावू शकते. काँग्रेस खासदारांनी आपल्या अर्जात असेही म्हटले आहे की, तक्रारदाराची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि गोडसे कुटुंबाशी असलेले कथित संबंध या प्रकरणात हितसंबंधांच्या संघर्षाची शक्यता निर्माण करतात, जे न्यायालयासमोर स्पष्ट करणे आवश्यक आहे. राहुल गांधी यांचे वकील मिलिंद शिंदे यांनी याबाबत सांगितलं की, या खटल्यातील फिर्यादी सत्यकी सावरकर यांनी खटला दाखल करताना मी विनायक दामोदर सावरकर यांचा पणतू आहे, असं फिर्यादीमध्ये म्हंटलं आहे. त्यांचा वंशज म्हणून त्यांनी ती तक्रार दाखल केली. ही तक्रार दाखल केल्यानंतर त्यांनी सावरकर कुटुंबीयांची पूर्ण वंशावळ कोर्टात दाखल केली. पण, त्यांनी त्यांची आई हिमानी सावरकर यांच्याकडची वंशावळ सादर केली नाही. सात्यकी सावरकर हे अशोक सावरकर आणि हिमानी सावरकर यांचे पूत्र आहेत. अशोक सावरकर हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुतणे आहेत. हिमानी सावरकर हे गोपाळ गोडसे यांच्या कन्या आहेत. गोपाळ गोडसे हे नथुराम गोडसे यांचे सख्खे भाऊ आहेत. या दोघांनाही फाशी दिली गेली. गोपाळ गोडसे, नथुराम गोडसे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे महात्मा गांधी यांच्या हत्येमध्ये आरोपी होते. सावरकर त्यामधून निर्दोष सुटले. आम्ही हा अर्ज दाखल केलाय की सावरकरांचे वंशज म्हणून तुम्ही हा खटला दाखल करत असाल तर आईकडची वंशावळ देखील सादर करावी. सात्यकी सावरकर यांनी ही वंशावळ न्यायालयात दाखल करावी. त्यांनी दाखल केली नाही तर विश्रामबाग पोलिसांनी तपास करुन ती दाखल करावी, अशी मागणी आम्ही न्यायालयात केली आहे.

## लेकराच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका

आयोजित पत्रकार परिषदेत त्यांना अश्रू अनावर झाले होते.

आरोपींचे वकील विपुल दुशिंग यांनी कोर्टाला सांगितलं होतं की, हगवणे कुटुंबियांकडे पाच कोटी रुपयांच्या गाड्या आहेत. मग ते फॉर्च्युनरची मागणी कशाला करतील? या मुद्द्यावर बोलताना अनिल कस्पटे म्हणाले, त्यांच्याकडे ही एकच फॉर्च्युनर गाडी आहे. बाकी एकही गाडी नाही. ते खोटं बोलत आहेत.

माझ्या मुलीला टॉर्चर करुन त्यांनी गाडी घेतली. मी दुसरी गाडी बुक केली होती. परंतु आरोपी शशांकने फॉर्च्युनरचाच हट्ट धरला. आधीच माझ्या मुलीचं लग्न दोन ठिकाणी मोडलं होतं. सोनं, गाडी, चांदीचं ताट, गौरी, अधिक महिन्यात जावयाला चांदीचं ताट.. या सगळ्या मागण्या मी पूर्ण केल्या आहेत, असेही कस्पटे यांनी स्पष्ट केले.

ही घटना घडली म्हणून नाही तर प्रत्येकवेळी मी महिलांना सांगत असते की तुम्ही कोणालाही घाबरू नका. जे योग्य वाटत आहे तेच करा. तुम्ही घाबरून बसता, याला कसे सांगू, त्याला कसे सांगू, घरातल्यांना कसे सांगू. असे करू नका. या गोष्टी तुम्ही जितक्या लपवून ठेवणार, तितकाच तुम्हाला त्रास होणार. असे काही झालं तर पटकन बोलून, पटकन त्यावर निर्णय घेऊन मोकळे व्हा, असा सल्लाही गौतमीने यावेळी दिला.

## आणीबाणीची ५० वर्षे, काँग्रेसची सरकारवर टीका

बोलावण्याची मागणी काँग्रेस सतत केंद्र सरकारकडे करत आहे. पण सरकारने त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे. रमेश म्हणाले की, २२ एप्रिलच्या रात्रीपासून काँग्रेस पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्याच्या परिणामांवर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी करत आहे. अद्याप असे झालेले नाही.

१० मे रोजी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची आणि ठरावाद्वारे देशाचा सामूहिक संकल्प दाखविण्याची विनंती केली. पंतप्रधानांनी ती सूचनाही स्वीकारली नाही. भारत-पाकिस्तान युद्धबंदीत मध्यस्थी करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या दाव्यांवर काँग्रेस वारंवार पंतप्रधान मोदींना मौन सोडण्याची मागणी करत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वारंवार दावा करत आहेत की, त्यांनी भारत आणि पाकिस्तानमधील तणाव कमी करण्यास मदत केली आहे. पण यावर उत्तर देण्यासही पंतप्रधान मोदींना वेळ नाही, असेही ते म्हणाले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सदर जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही १) **सौ. मनिषा सुधीर बागाईतकर व २) श्री. सुधीर सिताराम बागाईतकर** दोघेही रा. प्लॉट नं. २३ इंदुमती रक्षा लेखा सोसायटी, धनकवडी पोस्ट ऑफीस जवळ, धनकवडी, पुणे ४११०४३. यांचे मालकी हक्काची व तावेवहिवाटीची असून, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची व सदर मिळकतीचे हक्क आज रोजी सदर विदयमान मालक यांचेकडेच असल्याची खात्री व भरवसा देऊन त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल यांना खरेदी देण्याबाबत बोलणी झालेली असुन विसारही स्विकारलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, लीज, पोटगी, चोळीबांगडी, करारमदार, दिवाणी अथवा महसुली कोर्टवाद, लीज पेंडन्सी, बोजा इ. स्वरूपाचा कसलाही हक्क, हितसंबंध इ. असल्यास त्याबाबतचा पुर्ण खुलासा व्हावा व टायटलची शहानिशा व्हावी यासाठी म्हणुन सदरची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास संबंधितांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन **०८ दिवसांचे आत** त्याबाबत मूळ कागदपत्रांनिशी खाली नमुद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवुन तशी लेखी पोहोच घ्यावी. नमुद मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहीत अशी समजुन व असल्यास संबंधितांनी त्यांचे हक्क जाणीवपूर्वक सोडुन दिले आहेत असे समजून सदर मिळकतीचा पुढील खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, जिल्हा पुणे मधील मे. सह दुय्यम निबंधक साहेब हवेली, पुणे यांचे कार्य क्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका हद्दीमधील गाव मौजे धायरी येथील, स. नं. १२५/१ ते ४+८/५१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या " **इडन कोर्ट**" या इमारतीमधील म्हणजेच " **इडन कोर्ट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**" या इमारतीमधील **पहिल्या मजल्यावरील रहिवासी गाळा / फ्लॅट नं. १०१** यासी क्षेत्र ३९.९४ चौ.मी. म्हणजेच ४३० चौ.फु. कारपेट अधिक लगतची गच्ची यासी क्षेत्र ९.२९ चौ.मी. म्हणजेच १०० चौ. फु. ( एकुण सेलेबल क्षेत्र ६६३ चौ. फु.) व कार पार्किंग क्र. १९ यासी क्षेत्र ८.३६ चौ.मी. म्हणजेच ९० चौ. फु. ही संपूर्ण रहिवासी गाळा / फ्लॅट मिळकत या फ्लॅट मिळकतीच्या चतुः सिमा पुढीलप्रमाणे पुर्वेस फ्लॅट नं. १०२ पश्चिमेस फ्लॅट नं. १०८ दक्षिणेस इमारतीमधील पॅसेज, जिना व लिफ्ट उत्तरेस ईमारतीची मोकळी जागा येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

स्थळ : पुणे,

दि. २७/०५/२०२५

सही /-
**अॅड. शुभांगी अनिल पाटणकर**
**पत्ता :** स. नं. ३७ / १३+१४, फ्लॅट नं. ३४,
कृष्णा सह. गृह. संस्था मर्या., धनकवडी पुणे ४३.
संपर्क नं. ९९७५२७०६१२



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.**

दुरध्वनी : ०२० - २६१२५७७९ email : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. ३२/२०२५/६९४
पुणे, दिनांक : २४/०३/२०२५/१७१

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
सुविधा निसर्ग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. ३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/१ते३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/८,
खेड-शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे - ४११००५
तर्फे अध्यक्षः श्री. आदित्य चंद्रकांत बांडेहवलदार सचिव श्री. अभिजीत प्रदीप सट्टे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/जागा मालक/ जाब देणार नं. १
१. सुविधा रिअलकॉन प्रायव्हेट लिमिटेड
ऑफिस पत्ताः प्लॉट नं. २, क्षिप्रा सोसायटी, हिंगणे बुद्रुक (कर्वेनगर),
स.नं. २५/१ब, पुणे ४११०५२
तर्फे संचालक, श्री. राजेश अनंत अत्रे, रा. प्लॉट नं. ११,४था मजला, चंद्रसेन अपा.,
लेन नं ८. प्रभात रोड पुणे- ०४
अ.क्र.२ ते ८ तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. रविंद्र रामचंद्र बांडे, ३. सौ. रेखा रविंद्र बांडे, ४. श्री. अमर रविंद्र बांडे
(स्वतःकरिता व अ. क्र.६ तर्फे अ.पा.क म्हणून)
५. सौ. गौरी अमर बांडे (स्वतः करिता व अ. क्र. ७ तर्फे अ.पा.क म्हणून )
६. चि. परम अमर बांडे, ७. चि. पराग अमर बांडे
अ.क्र.२ ते ७ रा. मौजे खेड-शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे ४१२२०५
८. उनो फास्ट इन्फा सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड तर्फे अधिकृत संचालक
श्री. विकास मधुकर मठकरी, ऑफिस पत्ताः ८, रतानी हाऊसिंग सोसायटी, शिवाजीनगर, पुणे- ०४

२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सुविधा निसर्ग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित गट नं. ३९२/३९३/३९४ /३९५/३९६/३९८/१ते३९२/३९३/३९४/३९५/३९६/३९८/८, खेड- शिवापुर, ता. हवेली, जि. पुणे - ०५ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३२ / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०८/०५/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर.

गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ८ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक १२/०६/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २७/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

## लाच मागितल्याप्रकरणी महसूल निरीक्षकाला अटक

**हैदराबाद :** तेलंगणाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगारेड्डी जिल्ह्यातील एका महसूल निरीक्षकाला तक्रारदाराकडून १२ लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी अटक केली आहे. तहसीलदार कार्यालयातील महसूल निरीक्षक, इब्राहिमपट्टणम मंडल यांनी तक्रारदाराच्या वडिलांच्या पट्टादार पासबुकमध्ये सात गुंठे जमीन जोडण्याचे काम पूर्ण करण्यासाठी आणि फाईल वर कार्यवाही झाली आहे की नाही हे पाहण्यासाठी अधिकृत अनुकूलता दर्शविण्यासाठी १२ लाख रुपयांची लाच मागितली. तेथील आरोपी अधिकाऱ्याने आपले सार्वजनिक कर्तव्य चुकीच्या पद्धतीने आणि बेईमानीने पार पाडले, असे एसीबीने म्हटले आहे.

## बालतस्करी प्रकरणी १३ जणांना अटक

**हैदराबाद :** तेलंगणातील सूर्यापेट जिल्ह्यात मुलांची तस्करी करणाऱ्या टोळीतील तेरा जणांना बुधवारी अटक करण्यात आली असून १० बालकांची सुटका करण्यात आली आहे. सूर्यापेट जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक के. नरसिम्हा यांनी सांगितले की, बेकायदा दत्तक घेतल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी टोळीच्या सदस्यांना पकडले आणि सूर्यापेट आणि नलगोंडा जिल्ह्यातील विविध गावांमधून सात मुले आणि तीन मुली अशा दहा मुलांची सुटका केली आणि त्यांना नलगोंडा येथील बाल कल्याण केंद्राच्या ताब्यात देण्यात आले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मध्यस्थ म्हणून काम करणाऱ्या सूर्यापेट शहरातील एक पती आणि त्याच्या पत्नीचा समावेश आहे. ते नि:संतान जोडप्यांची चौकशी करायचे आणि मुलांची तस्करी करणाऱ्या इतर आरोपींशी सल्लामसलत करून त्यांना (कायदेशीर दत्तक प्रक्रियेचे पालन न करता) पाच लाख ते दहा लाख रुपयांपर्यंतच्या रकमेत विकण्याची ऑफर देत असत, असे पोलिसांनी सांगितले.

## दिल्लीतून चार अवैध बांगलादेशी अटक



**नवी दिल्ली :** दिल्लीतील नरेला येथे बेकायदा वास्तव्यास असलेल्या चार बांगलादेशी नागरिकांना गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या पथकाने संवेदनशील भागात, विशेषत: रस्त्याच्या कडेला असलेल्या वस्त्या आणि नरेला आणि आजूबाजूच्या तात्पुरत्या घरांमध्ये अवैध स्थलांतरितांचा शोध घेण्यास सुरुवात केली. गेल्या काही आठवड्यांपासून मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने २५ मे रोजी बांगलादेशातील खुदीग्राम आणि नाकेश्वरी जिल्ह्यातील रहिवासी हफीजुल (१९), मोमिनुल (२१), शमीम (२२) आणि इनामुल (३८) या चौघांना ताब्यात घेतले.

## दिल्लीचे मंत्री सिरसा पूंछ दौऱ्यावर



**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या जम्मू-काश्मीरमधील पुंछ जिल्ह्याच्या दौऱ्यापूर्वी दिल्लीचे वनमंत्री मनजिंदर सिंह सिरसा यांनी गुरुवारी सीमावर्ती शहराचा दौरा करून पाकिस्तानी गोळीबारामुळे प्रभावित झालेल्या लोकांशी संपर्क साधला. शुक्रवारपासून जम्मू भागात सुरू होणाऱ्या दोन दिवसांच्या मुक्कामादरम्यान अमित शहा पुंछ जिल्ह्यालाही भेट देतील, जिथे ७ ते १० मे दरम्यान झालेल्या चकमकीत पाकिस्तानच्या अंदाधुंद तोफगोळ्याआणि ड्रोन हल्ल्यांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या एकूण २८ नागरिकांपैकी सर्वाधिक १४ नागरिक ंचा मृत्यू झाला आहे. सिरसा हेलिकॉप्टरने पूंछला गेले आणि गुरुद्वारा सिंह सभेला भेट दिली, जिथे त्यांनी व्यवस्थापन समितीची भेट घेतली आणि गोळीबारामुळे झालेल्या नुकसानीबद्दल चर्चा केली.

## मिझोराममध्ये पावसामुळे शाळा बंद




**आयझॉल :** मिझोरममध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाच्या अंदाजामुळे गुरुवारी शाळा बंद राहणार आहेत. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने बुधवारी रात्री उशिरा काढलेल्या अधिसूचनेनुसार, राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्वसन विभागाशी सल्लामसलत केल्यानंतर याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. मिझोराम आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्वसन विभाग आणि गुवाहाटी आणि आयझॉल येथील आयएमडीच्या प्रादेशिक हवामान केंद्राने जारी केलेल्या हवामान अंदाज आणि इशाऱ्यानुसार, गुरुवारी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# ट्रम्प प्रशासनाचा व्हिसा बॉम्ब!

## चिनी विद्यार्थ्यांना मोठा फटका, भारतीय विद्यार्थ्यांनाही धक्का बसणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ट्रम्प प्रशासनाने परदेशी विद्यार्थ्यांच्या व्हिसा धोरणात मोठा बदल करत एक आक्रमक पाऊल उचलले आहे. या निर्णयाचा सर्वाधिक फटका चीनमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांना बसणार असून, त्यामुळे तब्बल तीन लाखांहून अधिक चिनी विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे भविष्य धोक्यात आले आहे. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांनाही मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

२०२३-२४ शैक्षणिक वर्षात चीनमधून २,७७,३९८ विद्यार्थी अमेरिकेत शिक्षणासाठी आले. हा भारतानंतरचा सर्वात मोठा विद्यार्थी समूह आहे. भारतातील विद्यार्थ्यांची संख्या या कालावधीत सर्वाधिक होती. पण ट्रम्प प्रशासनाच्या नव्या धोरणामुळे आता या आकडेवारीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी जाहीर केले की, "चीनमधील विद्यार्थ्यांचे, विशेषतः जे चायनीज कम्युनिस्ट पार्टी (सीसीपी) शी संबंधित आहेत किंवा संवेदनशील अभ्यासक्रम शिकत आहेत, त्यांचे व्हिसा रद्द करण्यात येतील."

या नव्या निर्देशानुसार, जगभरातील अमेरिकन दुतावास आणि कॉन्सुलेट्सना चिनी विद्यार्थ्यांच्या व्हिसा अपॉईंटमेंट्स तात्काळ थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आता व्हिसा प्रक्रियेत उमेदवाराच्या सोशल मीडिया खात्यांचे बारकाईने परीक्षण करण्यात येणार आहे.

रुबिओ यांनी दावा केला की, त्यांनी हजारो परदेशी विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले असून, त्यात इस्रायलविरोधी आंदोलने करणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी हार्वर्डसारख्या प्रतिष्ठित विद्यापीठांवर टीका करत, ते भेदभावाधारीत विचारसरणी पसरवणारे आणि अँटीसेमिटिझमला प्रोत्साहन देणारे असल्याची टीका केली. काही काळासाठी फेडरल संशोधन निधी रोखून ठेवला. हार्वर्डने या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले असून, सध्या या आदेशाची अंमलबजावणी थांबवण्यात आली.

या निर्णयावर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी नाराजी व्यक्त करत अमेरिकेला जागतिक शिक्षण व्यवस्था सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले. "आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे कायदेशीर हक्क आणि हित सुरक्षित ठेवणे अमेरिका सरकारचे कर्तव्य आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस यांनी स्पष्ट केले की, "विद्यार्थी असो वा पर्यटक, व्हिसा अर्जदाराची कसून तपासणी केली जाईल." कोणत्याही देशातून येणारे नागरिक अमेरिकेच्या कायद्यांचे पालन करतात की नाही, याची खात्री करूनच प्रवेश दिला जाईल.

### भारतालाही फटका

● भारतीय विद्यार्थी सध्या अमेरिकेत सर्वाधिक संख्येने शिक्षण घेत आहेत. त्यामुळे व्हिसा मुलाखतींवरील निर्बंधांचा भारतीय विद्यार्थ्यांवरही परिणाम होणार आहे, विशेषतः जे विद्यार्थी या वर्षीच्या शैक्षणिक सत्रात प्रवेश घेण्यासाठी तयारी करत आहेत त्यांना याचा अधिक फटका बसण्याची शक्यता आहे. आगामी काळात विद्यार्थ्यांनी अमेरिकेच्या या नव्या धोरणाचा अभ्यास करून आपले नियोजन करणे अत्यावश्यक ठरणार आहे.





# भारत जागतिक आर्थिक वाढीचे मुख्य इंजिन बनेल

## वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अहवालात उल्लेख

२०२५ आणि २०२६ मध्ये भारत जागतिक आर्थिक वाढीचे मुख्य इंजिन असेल, अशी शक्यता वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या मुख्य अर्थशास्त्रज्ञांच्या आऊटलुक अहवालातून व्यक्त करण्यात आली आहे. जगातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांच्या सर्वेक्षणावर आधारित हा अहवाल आहे. जागतिक पातळीवर अनिश्चितता असूनही भारताच्या मजबूत आर्थिक मूलभूत गोष्टी आणि आशावादी दृष्टिकोनाचा यात उल्लेख करण्यात आला आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दक्षिण आशिया आर्थिक विस्ताराबाबत सर्वात आशावादी आहे. विशेषतः या प्रदेशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला भारत विकासाचे प्रमुख इंजिन बनण्यास सज्ज असल्याचे दिसून येते." असे डब्ल्यूईएफने म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या जीडीपी वीढाचा दर २०२५ मध्ये ६.२ टक्के आणि २०२६ मध्ये ६.३ टक्के राहील, असा अंदाज वर्तवला आहे. यामुळे भारत दक्षिण आशियातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनेल. या मजबूत वाढीमुळे भारत या प्रदेशाच्या आर्थिक वाढीत आघाडी मिळवण्याची शक्यता आहे. दक्षिण आशिया काही आव्हानांना तोंड देत आहे. यात बदललेल्या चिनी निर्यातीचा परिणामाचा समावेश आहे. पण तरीही सकारात्मक चिन्हे दिसत असल्याचे अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे.

भारत आणि ब्रिटन यांच्यात नुकत्याच झालेल्या द्विपक्षीय व्यापार करारामुळे भारताच्या व्यापार दृष्टिकोनाला चालना मिळाली. अशाप्रकारच्या आर्थिक घडामोडींमुळे अर्थतज्ज्ञांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ झाला आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. संपूर्ण जगाच्या तुलनेत दक्षिण आशियाकडे सर्वात आशादायी म्हणून पाहिले जात आहे. एक तृतीयांश म्हणजे ३३ टक्के अर्थशास्त्रज्ञांनी २०२५ मधील उर्वरित काळात या प्रदेशात मजबूत अथवा खूप मजबूत वाढीची शक्यता व्यक्त केली आहे.

दरम्यान, येथील परिस्थिती चिंतेविना नसेल. कारण अलीकडील काही दिवसात भारत आणि पाकिस्तानदरम्यान निर्माण झालेल्या तणावामुळे या प्रदेशात अनिश्चितता वाढली. येथील महागाईच्या बाबतीत, बहुतांश आघाडीच्या अर्थतज्ज्ञांना येत्या काही महिन्यांत दक्षिण आशियातील किमतीत मध्यम (६१ टक्के) ते उच्च (२६ टक्के) वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### जागतिक अर्थव्यवस्था कमकुवत

● जागतिक स्तरावर, आर्थिक परिस्थिती कमकुवत राहिली आहे. विशेषतः वर्षाच्या सुरुवातीपासून जागतिक अर्थव्यवस्थेची एकूण स्थिती कमकुवत झाल्याचे अहवालात नमूद केले आहे. अमेरिकेचे बदलते आर्थिक आणि व्यापार धोरण ही यामागील एक प्रमुख चिंता असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. जागतिक स्तरावर अनेक आव्हाने असूनही, मजबूत आर्थिक निर्देशक, व्यापारातील वाढ आणि गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास यामुळे भारत आणि दक्षिण आशियाचे भविष्य उज्ज्वल असल्याचे भाकित या अहवालात व्यक्त करण्यात आले आहेत.



# उत्तर प्रदेशह अनेक राज्यांत पावसाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

यूपीसह देशातील अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे, ज्यामुळे उष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, हवामान खात्याने मान्सूनबाबत चांगली बातमी दिली असून येत्या एक ते दोन दिवसांत मान्सून बिहारमध्ये दाखल होऊ शकतो, असे म्हटले आहे. यंदा मान्सूनने वेळेआधीच भारतात प्रवेश केल्याने अनेक राज्यांमध्ये तो वेळेआधीच धडकला आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र आहे, त्यामुळे ईशान्य भारत, संपूर्ण हिमालयी पश्चिम बंगाल, सिक्कीममध्ये ३१ मेपर्यंत मुसळधार पाऊस पडणार आहे. याशिवाय मेघालयमध्ये ३० मे रोजी मुसळधार पाऊस पडेल. तर गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडूच्या घाट भागात ३० मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर वायव्य भारतात पुढील चार ते पाच दिवस पश्चिम विक्षोभामुळे पाऊस, वादळी वाऱ्याची शक्यता आहे. गुरुवारी मान्सून छत्तीसगड, ओडिशा आणि ईशान्य भारतातील राज्यांमध्ये दाखल झाला आहे. येत्या एक-दोन दिवसांत तो बिहार आणि पश्चिम बंगालच्या काही भागात पोहोचेल.

दक्षिण भारतात २९ मे रोजी तेलंगणा, उत्तर अंतर्गत कर्नाटक, ३१ मे आणि १ जून रोजी किनारपट्टी कर्नाटक, ३० मे रोजी दक्षिण अंतर्गत कर्नाटक, ३० मे रोजी केरळ, १ आणि २ जून रोजी माहे, ३० मे रोजी तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, कोस्टल कर्नाटक, ३१ मे रोजी केरळ आणि माहे येथे मुसळधार पाऊस पडेल. तर आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरामध्ये पुढील सात दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ईशान्य भारतात आठवडाभर मुसळधार पाऊस पडणार आहे.

# संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचा पाकला पुन्हा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानला दहशतवादाबाबत इशारा दिला आहे. ते म्हणाले की, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले होते. ही कारवाई पाकिस्तानच्या चिथावणीला जोरदार पण संयमी प्रत्युत्तर होती. भारतीय लष्कर पाकिस्तानला आणखी नुकसान करण्याच्या स्थितीत होते, पण सरकारला जगाला शिस्त आणि सामरिक समन्वय दाखवायचा होता, असे ते म्हणाले.

राजधानीत एका कार्यक्रमात बोलताना संरक्षणमंत्र्यांनी राष्ट्रीय सुरक्षा आणि स्वावलंबनाच्या उद्दिष्टांवरही भर दिला. भारतीय सशस्त्र दलांना बळकटी देण्यासाठी मेक इन इंडिया उपक्रमाचे ही त्यांनी कौतुक केले. संरक्षणमंत्री म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरदरम्यान आम्ही दहशतवाद्यांच्या तळांना कशा प्रकारे अचूकतेने लक्ष्य केले हे संपूर्ण जगाने पाहिले आणि जेव्हा पाकिस्तानने हिंमत केली तेव्हा आम्ही पाकिस्तानी हवाई तळही उद्ध्वस्त केले. आपण काहीही करू शकलो असतो, पण सत्तेचा आणि समन्वयाचा आदर्श जगासमोर ठेवला.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेली लष्करी कारवाई हा मोजका पण निर्णायक हल्ला होता, असे राजनाथसिंग म्हणाले. ७ मे पासून सुरू झालेल्या या कारवाईत जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीनच्या अनेक लक्ष्यांना लक्ष्य करण्यात आले. त्यामुळे १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. सीमेपलीकडून गोळीबार आणि ड्रोनघुसखोरीनंतर भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानच्या ११ हवाईतळांवरील महत्त्वाच्या लष्करी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त केल्या.



**गाझा सीमा** इस्रायलमधून दिसणाऱ्या एका दृश्यात इस्रायल-गाझा सीमेवर, उत्तर गाझामधील झालेला विनाश स्पष्टपणे दिसून येतो.

# रेल्वेची वेटिंग लिस्ट होणार कालबाह्य




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेमध्ये 'वेटिंग लिस्ट'आता कालबाह्य होणार आहे. रेल्वे आता प्रत्येक प्रवाशाला कन्फर्म सीट देण्याच्या योजनेवर काम करत आहे. २०३० अखेर सामान्य दिवसांमध्ये प्रत्येक प्रवाशाला कन्फर्म सीट उपलब्ध करून देण्याचे रेल्वेचे उद्दिष्ट आहे. यासाठी रेल्वे एकाच वेळी अनेक आघाड्यांवर काम करत आहे. यामध्ये कोचनिर्मितीपासून ते नवीन मार्गांचा विस्तार यांचा समावेश आहे.

येत्या ४-५ वर्षांत ५०० हून अधिक रेल्वे कोच तयार केले जातील, तर २०३० पर्यंत ४० हजार किमी नवीन रेल्वे मार्ग टाकण्याच्या दिशेने वेगाने काम सुरू आहे. हा आतापर्यंतचा सर्वात मोठा रेल्वे नेटवर्क विस्तार असेल. याअंतर्गत, ४३४ उपप्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. यावर सुमारे ११ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. या विस्तारामुळे गाड्यांची संख्या वाढेल, ज्यामुळे प्रमुख मार्गांवरील भार कमी होईल आणि तिकिटांच्या वेटिंगची समस्या हळूहळू संपेल, असे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले.

पाच वर्षांत ५०० हून अधिक नवीन कोच तयार करणार आहे. हे डबे केवळ संख्येने जास्त नसून, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि प्रवाशांसाठी अधिक आरामदायी असतील. याशिवाय, रेल्वेने ८ हजार ट्रेन सेट खरेदी करण्याची योजना आखली आहे. ज्यावर एक लाख कोटी रुपये खर्च केले जातील. रेल्वेच्या इंटिग्रल कोच फॅक्टरी (चेन्नई), मॉडर्न कोच फॅक्टरी (रायबरेली) आणि रेल कोच फॅक्टरी (कपूरथळा) या तीन प्रमुख कोच उत्पादन कारखान्यांमध्ये उत्पादन क्षमता सातत्याने वाढवली जात आहे.

२०३० पर्यंत २०० वंदे भारत आणि एक हजार अमृत भारत गाड्या चालवण्याची रेल्वेची योजना आहे. या गाड्या केवळ हाय-स्पीड नसतील, तर त्यात जागतिक दर्जाच्या सुविधाही असतील. वंदे भारत गाड्या आधीच अनेक मार्गांवर प्रवाशांना जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देत आहेत. अमृत भारत गाड्या प्रामुख्याने पारंपरिक लांब पल्ल्याच्या मेल/एक्स्प्रेस गाड्यांची जागा घेतील.

### एक हजार कोटी प्रवाशांसाठी तयारी

भारतीय रेल्वे सध्या दरवर्षी ८०० कोटींहून प्रवाशांना सेवा देते आणि २०३० पर्यंत हा आकडा एक हजार कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी, रेल्वे तीन हजार अतिरिक्त गाड्या चालवण्याची योजना आखत आहे. यामुळे अधिक प्रवाशांना कन्फर्म तिकिटे मिळतील, अशा पद्धतीने नियोजन करण्यात येत आहे.

# अवकाळीमुळे महावितरणचे लाखोंचे नुकसान

## राजगुरुनगर, चाकण विभागात वादळी वा-याचा सर्वाधिक फटका



## शेतकऱ्यांना अवकाळीचा फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** मागील ८ ते १० दिवसांपासून पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, कुंजीरवाडी, उरुळी कांचनसह परिसरात वादळी वाऱ्यासह व विजांच्या कडकडाटासह झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांची उभी पिके जमीनदोस्त झाली आहेत. तर सततच्या पावसाने पिके कुजण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे पावसामुळे नुकसान झाल्याने त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. कुंजीरवाडी, थेऊर फाटा येथील प्रगतशील शेतकरी सुनील जाधव यांचे काढणीला आलेले कोबी पिक पूर्णतः पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे त्यांचे अंदाजे कमीत-कमी अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

विशेषतः यामध्ये मोठ्या प्रमाणावर पालेभाज्या आणि फळवर्गीय पिकांचे नुकसान झाले आहे. मात्र सरकारी अधिकारी यांना सांगूनही कोणीही भेट द्यायला अथवा पाहणी करण्यासाठी आले नाहीत. तसेच एकदा फक्त तलाठी येऊन पाहणी करून गेले. या परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे १० ते १५ लाख रुपयांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. अशी आग्रही मागणी थेऊर फाटा येथील शेतकरी करू लागले आहेत. मे महिन्यात कधी नव्हे ते पडत असलेल्या संततधार पावसाने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. खरीपाच्या पूर्वमशागतीची कामे खोळंबली आहेत. रस्ते चिखलाने माखले असून ओढ्या नाल्यांना पाणी आले. शेतात सखल जागी पाणी साचले असून पाऊस उघडीप देत नसल्याने खरीपाच्या पूर्व मशागतीची कामे खोळंबून आहेत.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** अवकाळी पावसामुळे वीज वितरण कंपनीच्या तांत्रिक बिघाडामुळे खेड आणि मावळ तालुका मिळुन ६४ लाखांचे नुकसान झाल्याची माहिती खेड विभागाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र एडके यांनी दिली. खेड विभागातंर्गत खेड तालुक्यातील राजगुरुनगर, चाकण आणि चाकण एमआयडीसी मावळ तालुक्यात लोणावळा, तळेगाव आणि वडगाव मावळ असे सहा उपविभागातुन वीज वितरणचा कारभार चालत असतो.

गेले दहा बारा दिवसापासून सुरु असलेल्या वादळी वा-यासह अवकाळी पावसाने वीज वितरणच्या खेड विभागात हाय टेन्शन म्हणजे (एचटी ) ११, २२, ३३, केव्हीचे २५ विद्युत खांबाचे नुकसान होऊन ७ लाख ५५ हजारांचे नुकसान झाले, एलटी म्हणजेच २४० व्होल्टेज असणारे घरगुती ग्राहकासाठी विद्युत पुरवठा करणारे तब्बल २०१ खांब कोसळुन २१ लाखांचे नुकसान झाले. यामध्ये एचटी लाईनचे ३.३४ किलोमीटर नुकसान होऊन ५ लाख ४३ हजारांचे तर एलटी लाईनचे १५.२८ कि.मी नुकसान होऊन १५ लाखांचे नुकसान झाले. जमीनीखालील विद्युत केबलचे नुकसान होऊन एचटी लाईनचे ८ कि.मी केबलचे नुकसान होऊन सव्वादोन लाखांचे तर एलटी लाईनच्या १८ किमी चे केबलचे नुकसान होऊन २ लाख १६ हजारांचे नुकसान झाले. तर डीटीसी फेल्युलर अर्थात १५ ट्रान्सफर बंद पडुन साडे आठ लाखांचे नुकसान झाले, एक फिडर पिलरचे ८० हजारांचे नुकसान झाले, ट्रान्स्फर जवळील ८ फ्युज बॉक्सचे १ लाख ४२ हजारांचे नुकसान मिळुन एकुण ६३ लाख ९० हजारांचे नुकसान झाल्याचे उपकार्यकारी अभियंता मंगेश सोनवणे यांनी दिली.

खेड तालुक्यातील राजगुरुनगर उपविभागांतर्गत वाडा, कडुस, पाईट, राजगुरुनगर शहर आणि ग्रामीण सेक्शनमध्ये एसटीचे ६ खांबाचे कोलमडून पडुन १४ हजारांचे नुकसान झाले, तर १.१२ कि.मी. विद्युत तारांचे नुकसान होऊन २ लाख १२ हजारांचे नुकसान झाले. ४८ एलटी पोल्सचे नुकसान होऊन ४ लाख ९ हजारांचे नुकसान झाले,तर ४.३५ किमी विद्युत तारांचे नुकसान होऊन ४ लाख २५ हजारांचे नुकसान झाले.४ फ्युजन पेट्यांचे नुकसान होऊन ६२ हजारांचे नुकसान झाले.एलटी लाईनच्या जमीनीतील १ किमीच्या केबलचे १२ हजार मिळुन एकुण १२ लाख ६५ हजारांचे नुकसान झाल्याची माहिती उप कार्यकारी अभियंता उत्तम राव मंचरे यांनी दिली. चाकण विभागातंर्गत आळंदी शहर, ग्रामीण, भोसे आणि चाकण सेक्शन मध्ये १८ एचटी विद्युत खांबाचे नुकसान होऊन ४ लाख ५६ हजारांचे, १.२५ कि.मी विद्युत तारांचे नुकसान होऊन दोन लाखांचे नुकसान झाले. एलटीचे ७२ विद्युत खांब कोसळुन ५ लाख २६ हजारांचे तर ७.३७ किमी विद्युत वाहिन्यांचे नुकसान होऊन ६ लाख ५२ हजारांचे नुकसान झाले. जमीनीखालील ४ किमी विद्युत केबलचे नुकसान होऊन ४८ हजारांचे नुकसान झाले. २ फ्युज बॉँक्स नुकसानीपोटी चार हजारांचे नुकसान मिळुन एकुण १९ लाख १७ हजारांचे नुकसान झाल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता राजेंद्र गोरे यांनी दिली. चाकण औद्योगिक क्षेत्र उपविभागातंर्गत चाकण ग्रामीण निघोजे, वासुली सेक्शन मध्ये एचटीलाईनचे ३ पोल पडुन ७५ हजारांचे नुकसान तर विद्युत वाहीनीचे ०.१५ किमी नुकसानीपोटी २५ हजारांचे नुकसान झाले. भुमिगत ४ किमी केबलचे नुकसान होऊन सव्वा लाखांचे नुकसान झाले. एलटी लाईन २२ विद्युत खांब पडुन ३ लाखांचे नुकसान झाले.तर ६ किमी भुमिगत केबलचे नुकसानीपोटी ७२ हजारांचे नुकसान झाले. ७ ट्रान्सफार्मर बंद पडुन साडेचार लाखांचे नुकसान झाले. १ फिडर पिलरचे नुकसानपोटी ८ हजार मिळुन एकुण ११ लाख ३२ हजारांचे नुकसान झाल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता विजय गारगोटे यांनी दिली. एकुणच संपूर्ण खेड तालुक्यात एचटी लाईनचे २७ पोल पडुन २.५२ कि.मी विद्युत तारांचे नुकसान झाले.तर ४ किमी भुमिगत केबलचे नुकसान झाले. एलटी लाईनचे सर्वाधिक १४२ विद्युत पोल पडुन १२ कि.मी विद्युत तारांचे नुकसान झाले, तर ११ किलोमीटर भुमिगत केबलचे नुकसान झाले. एकुण ४३ लाख १४ हजारांचा फटका वीज वितरण कंपनीला बसला.

### मावळ विभागालाही फटका बसला

● मावळ तालुक्यात वीज वितरणचे लोणावळा, तळेगाव, वडगाव मावळ अशा तीन विभागामिळुन एचटीचे ८ पोलचे नुकसान होऊन १, ५६ हजार, २ किमी विद्युत वाहिन्यांचे नुकसान होऊन ७५ हजारांचे नुकसान झाले, भुमिगत केबलचे ४ किमी चे नुकसान होऊन १० हजारांचे नुकसान, एलटी लाईनच्या ७ लाख ८९ हजारांच्या ७४ खांबाचे नुकसान, तर ३ लाख ९२ हजारांच्या ३ किमी विद्युत वाहिन्यांचे नुकसान, ७ किमी भुमिगत केबलचे ८४ हजारांचे नुकसान मिळुन एकुण २० लाख ६७ हजारांचे नुकसान झाल्याची माहिती कार्यकारी अभियंता एडके यांनी दिली.

# इंदापूर पूर्वेतील रस्त्यांचे, पिकांचे नुकसान

## शासकीय अनास्थेचा सामान्यांना फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाचा खरा फटका तालुक्यातील पश्चिम भागातील गावांना बसला असला, तरी पूर्व भागातील शेती,रस्त्यांना ही या पावसाने दुखापत केली आहे. शासकीय यंत्रणेची अनास्था लोकांच्या गैरसोयीला कशी कारणीभूत ठरते भाटनिमगाव सारख्या गावातील शीव रस्त्याच्या प्रकरणामुळे समोर येते.

मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात इंदापूरात पाऊस पडतोच. यंदा मात्र त्याने कहर केला. सतत तीन दिवस इंदापूरात पाऊस लागून राहिला होता. या पावसाने इंदापूर नगरपरिषदेच्या सार्वजनिक कामाचे धिंडवडे काढले आहेत. शहरात मध्यंतरी केलेली डांबरीकरणाची कामे या पावसाने उद्ध्वस्त केली आहेत. पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरुन शहराच्या मुख्य रस्त्याने जाणारे पाणी डॉ.आंबेडकरनगर, अण्णाभाऊ साठेनगर, लोकमान्यनगर या भागात जावून साठत असे.पण तेथे काँक्रिटीकरण झाल्याने, यंदा तशी परिस्थिती आली नाही. त्यामुळे दलदल होणा-या शहराच्या वाढीव हद्दीतील भागात रस्त्याच्या डांबरीकरणाऐवजी काँक्रिटीकरण करावे अशी मागणी पुढे येत आहे.

इंदापूरच्या पश्चिमेला आठ ते नऊ किलोमीटर अंतरावर असणा-या भाटनिमगाव बेडसिग शिव रस्त्याची या पावसाने पार दैना केली. एक किलोमीटर अंतराच्या या शीव रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे गेल्या २५ वर्षापासून या रस्त्याचे काम मार्गी लागलेले नाही. इंदापूर,अवसरी,बेडशिंग या गावाकडे जाण्याचा त्या परिसरातील हा एकमेव रस्ता आहे.दुध, ऊस, तरकारी याची वाहतूक या रस्त्यावरुन होते. विद्यार्थी शाळेला जात असतात. निवडणूकी आधी क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते या रस्त्याचे भुमिपूजन झाले.भूमिपूजनाचा फलक गायब झाला. त्यानंतर निवडणूक निकालापाठोपाठ भूमिपूजन ही गुलदस्त्यात गेले आहे.

रविवारच्या पावसामुळे आधीच अरुंद असणा-या या शीव रस्त्याची एक बाजू पाण्यात गेली होती. त्या दिवशी साधे चालणे देखील अवघड झाले होते. तरकारीची वाहतूक करणा-या वाहनांना खुप कसरत करावी लागली. सतत होणा-या या त्रासामुळे त्रस्त झालेल्या भाटनिमगावकरांनी येणा-या सर्व निवडणुकांमध्ये कोणालाच मतदान करायचे नाही असा निर्णय घेतला आहे.

सरडेवाडी भरतील प्रशांत शिताप यांची सहा महिन्यांची अडीच एकरातील केळीची बाग पावसामुळे शब्दशः पाण्यात गेली आहे.पाणी ओसरले तरी त्यावर रोगराई पडणार असल्याचे दिसते आहे. त्यामुळे लवकरात लवकर पंचनामे होऊन किमान नुकसान भरपाई तरी मिळावी, अशी अपेक्षा शिताप यांनी व्यक्त केली आहे.

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या ठेकेदारी कंपनीच्या गलथान कारभारामुळे रविवारी पडलेल्या मुसळधार पावसाचे पाणी साठून देशपांडे व्हेज समोरचा महामार्गाचा परिसर जलमय झाला होता.

इंदापूर शहराच्या पूर्वेला पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत देशपांडे व्हेज हे हॉटेल आहे. त्याच्या बाजूला उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. नजीकच्या सेवा रस्त्यावरुन वाहतुकीच्या कोणत्या ही नियमाचे पालन न करतात रात्रंदिवस अवजड वाहनांची ये जा चालू असते.त्यामुळे उतार असणाऱ्या या सेवा रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. सांडपाणी व्यवस्थापनाचे काम ही झालेले नाही.

पावसाळ्याच्या पूर्वी सेवा रस्त्यावर पडलेले खड्डे भरुन घेण्याची व सांडपाणी व्यवस्थापन करण्याची आवश्यकता होती. मात्र संबंधित ठेकेदारी कंपनीने त्याच्याकडे सारासार दुर्लक्ष केले.परिणामी रविवारी पडलेल्या पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात सेवा रस्त्यावर साठून महामार्गालाच जलाशयाचे स्वरुप प्राप्त झाले होते.

संबंधित कंपनीने त्वरित खड्डे भरले नाहीत, सांडपाणी व्यवस्थापन केले नाही या मार्गावरुन ये जा करणारांना यंदाच्या पावसाळ्यात मोठ्या अपघाताला सामोरे जाण्याची वेळ येईल असे चित्र निर्माण झाले आहे.



भाटनिमगाव बेडसिंग शीव रस्त्याची पावसामुळे दुरवस्था झाली आहे.

# श्री छत्रपती कारखान्याच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज जाचक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** श्री छत्रपती कारखान्याच्या अध्यक्षपदी साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज साहेबराव जाचक व उपाध्यक्षपदी कैलास रामचंद्र गावडे यांची निवड करण्यात आली.

श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाची नुकतीच निवडणूक झाली असून या निवडणुकीमध्ये श्री जय भवानी माता पॅनलला कारखान्याच्या सभासदांनी उच्चांकी मतांनी निवडून दिले. या निवडणुकीनंतर आता कारखान्याच्या अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवड करण्यात आली.

या निवडणुकीमध्ये प्रांताधिकारी वैभव नावडकर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक अशोक जाधव, फायनान्स मॅनेजर हनुमंत करवर, कामगार नेते युवराज रणवरे, डॉ. राकेश मेहता, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य सचिन सपकळ, इंदापूर तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक अमोल भोईटे, सिद्धार्थ जाचक, अण्णा पाटील, सतीश काटे, नवनिर्वाचित संचालक शरद जामदार, रामचंद्र निंबाळकर, शिवाजी निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपत कदम, विठ्ठल शिंगाडे, प्रशांत दराडे, अजित नरुटे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, सतीश देवकाते, निलेश टिळेकर, अशोक पाटील, मंथन कांबळे, माधुरी राजपुरे, सुचिता सपकाळ, तानाजी शिंदे, योगेश पाटील, हे उपस्थित होते. निवडी पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानी पवार यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित संचालक मंडळांची बैठक पार पडली.

“ उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे व सर्व सभासदाचा मी आभारी आहे. फार मोठे यश सभासदांनी दिले आहे. या यशाच योग्य ते चीज करायचे आहे. दिलेला शब्द पाळायचा आहे. सर्व संचालकांच्या वतीने मी शब्द देतो कारखान्याला पूर्वीचे वैभव प्राप्त करण्यात करायचे आहे.



— **पृथ्वीराज जाचक** श्री छत्रपती कारखाना

# रांजणगाव गणपतीसाठी १२ कोटींचा निधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** चौंडी तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथे मंत्री परिषदेच्या झालेल्या बैठकीमध्ये अष्टविनायक मंदिरांच्या जीर्णोद्धार व विकास कामासाठी १४७.८१ कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आले असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले. रांजणगाव देवस्थानसाठी सुमारे १२ कोटी १३ लाख ८२ हजार ४३६ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचेही देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथे संपन्न झालेल्या मंत्रीपरिषदेच्या बैठकीत अष्टविनायक गणपती मंदिर जीर्णोद्धार विकास आराखड्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला. सदर बैठकीत "अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोध्दार करणे विकास आराखड्याच्या" प्रस्तावित रु.१४७.८१ कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली होती. "अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोध्दार करणे विकास आराखड्याच्या" प्रस्तावित १४७.८१ कोटी किमतीच्या विकास आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

अष्टविनायक गणपती मंदिराचा जीर्णोध्दार करण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यात आला, यात रांजणगाव महागणपती देवस्थान ट्रस्टच्या जतन, संवर्धन व परिसर व्यवस्थापनासाठी सुमारे १२ कोटी १३ लाख ८२ हजार ४३६ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र रांजणगावयेथे जिर्णोद्धार करण्यासाठी विकास आराखड्याला महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली व



सुमारे १२ कोटी १३ लाख ८२ हजार ४३६ रुपयांचा निधी मंजूर झाला. यानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देवस्थान समितीने आभार व्यक्त मानले आहेत. महायुती सरकारकडे श्री क्षेत्र रांजणगाव गणपती ट्रस्टने गेल्या काही वर्षांपासून या जिर्णोद्धार निधीसाठी सतत देवस्थान ट्रस्ट ने पाठपुरावा केला व या पाठपुराव्यास यश आले, त्याबद्दल श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टकडून आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# अवसरी खुर्द ता. आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरच पावसाचे पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** अवसरी खुर्द ता. आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र एप्रिल २०२३ पासून सुरू झाले असून या आरोग्य केंद्राचे संदर्भात अनेक कामे अद्यापही मार्गी लागलेली नाहीत गेल्या दहा दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे आरोग्य केंद्राच्या समोर पावसाचे पाणी साचून तळ्याचे स्वरूप निर्माण झाले आहे. रुग्णांना व कर्मचाऱ्यांना आरोग्य केंद्रात येजा करताना कसरत करावी लागत आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आरोग्य केंद्रची इमारत आतून बाहेरून रंग काम करून देणे, पावसाळ्यात साचलेले पाणी निघून जाण्यासाठी कॉंक्रिटीकरण गटर करून देणे, कर्मचाऱ्यांसाठी एक खोली बांधून देणे, रुग्णाला देणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी शेड तयार करणे, अशी मागणी माजी उपसभापती संतोष भोर यांनी केली आहे.

अवसरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु झाल्यापासून पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. यापूर्वीही आरोग्य खात्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी, माजी उपसभापती संतोष भोर, उत्तम शिंदे यांच्या सोबत तसेच ग्रामपंचायतचे सरपंच सर्व सदस्य यांनी प्रत्यक्ष येऊन पाहणी केली होती. त्यावेळी आरोग्य खात्याचे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी पावसाची पाणी साचते त्यासाठी गटर मंजूर करू, कर्मचारी यांना राहण्यासाठी कॉटर्स बांधून देऊ, तसेच रुग्णाच्या नातेवाईक यांना वेटिंग शेड, अॅम्बुलन्स व इतर गाड्या करता पार्किंग शेड बांधून देवू असे आश्वासन दिले होते मात्र आजपर्यंत यातील कुठलेही काम पूर्ण झालेले नाही. तालुक्यातील इतर आरोग्य केंद्रांच्या कामांची मागणी जिल्हा परिषदे कडून पूर्ण करण्यात आली आहे मात्र अवसरी खुर्द येथील आरोग्य केंद्राकडे नेहमी दुर्लक्ष केले जात आहे. आता तरी जिल्हा परिषदेत आरोग्य विभागाने याकडे लक्ष देऊन ही कामे मार्गी लावावी अशी मागणी गावचे सरपंच वैभव वायाळ, उपसरपंच प्रवीण भोर, माजी उपसरपंच अनिल शिंदे यांसह स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.




अवसरी खुर्द ता. आंबेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर पावसाचे पाण्यामुळे तयार झालेली पाण्याची डबकी

# पुरंदर विमानतळः भूसंपादन मोबदल्याबाबत पॅकेज




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर विमानतळासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाच्या मोबदल्यासाठी राज्य सरकारने हालचाली गतीने सुरू केल्या आहेत. यासंदर्भात शेतकऱ्यांना कोणत्या स्वरूपाचा मोबदला देता येईल, यावर शासन पातळीवर सध्या सखोल चर्चा सुरू आहे. लवकरच पॅकेज जाहीर केले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

प्रस्तावित विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधून सुमारे २ हजार ६७३ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. या निर्णयाला ग्रामस्थांकडून तीव्र विरोध झाला आहे. आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी या गावांतील सर्व्हेक्षणही थांबवले होते.

या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांची भेट घेतली होती. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांना मोबदल्यासाठी प्रस्ताव सादर करण्यास सात दिवसांची मुदत दिली होती. अन्यथा शासन स्वतःच कायदेशीर पॅकेज जाहीर करेल, असा इशारा त्यांनी दिला होता.सध्या शासन स्तरावर विविध पर्यायांचा विचार करण्यात येत आहे.

**सुमारे ३ हजार शेतकरी भूमिहीन होणार**

विमानतळासाठी सुमारे ६ हजार ५०० एकर जमीन आवश्यक आहे. सध्या ४ हजार ५०० शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर या प्रकल्पाची नोंद करण्यात आली आहे. या भूसंपादनामुळे ३ हजारपेक्षा अधिक शेतकरी पूर्णतः भूमिहीन होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सरकारकडून जाहीर होणाऱ्या पॅकेजची माहिती आणि शेतकऱ्यांची प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

**अंतिम मुदत २९ मेपर्यंत**

भूसंपादन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना २९ मेपर्यंत हरकती नोंदवता येणार आहेत. आतापर्यंत ७९४ शेतकऱ्यांनी हरकती सादर केल्या आहेत. या हरकतींवर लवकरच सुनावण्या घेतल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे वनपुरी येथील शेतकऱ्यांनी हरकती नोंदवण्यासाठी १० दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

## पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी गायकवाड



**जेजुरी :** पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेत सन २०२५ ते २०२८ या तीन वर्षासाठी अध्यक्षपदी प्रसाद गायकवाड, दौंड यांची निवड झाली आहे. पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा मुख्याध्यापक भवन, पुणे येथे संघाचे विश्वस्त हनुमंत कुबडे, शिवाजीराव किलकिले व अरूण थोरात तसेच आदिनाथ थोरात, कुंडलिक मेमाणे, हरिश्चद्र गायकवाड, महेंद्र गणपूले यांच्या मार्गदर्शनाखाली सभा संपन्न झाली. या सभेत संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. नूतन कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्ष प्रसाद जगताप, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, मावळ, उपाध्यक्ष तबाजी वागदरे, जुन्नर, कल्याण बरडे हवेली, सुधाकर जगदाळे पुरंदर, सचिव शिवाजी कामथे पुणे शहर, सहसचिव उत्तम पोटवडे खेड, मारूती कदम शिरूर, संभाजी पडवळ पिंपरी चिंचवड, गणपत गवळी बारामती, भानुदास रिठे, पुणे शहर, जगन्नाथ पाटील इंदापूर, गणपत काळे पिंपरी चिंचवड, दत्तात्रय चाळक मुळशी, मोहन ताकवले भोर, खजिनदार विनोद बोंबले, आंबेगाव, सहखजिनदार मोहन किन्हाळे राजगड, गणेश घोरपडे इंदापूर, रामचंद्र नातू दौंड, संजय बोरकर खेड, लक्ष्मण जगताप मुळशी, हनुमंत पवार, पुरंदर, वंदना आणेकर, तुकाराम बेनके, गौरी टप्पू पुणे शहर, राज्य प्रतिनिधी महामंडळ — सचिव नंदकुमार सागर, पुरंदर, राज्य प्रवक्ता—सुरेश कांचन हवेली.

## संस्कार शिबिरात १०३ विद्यार्थ्यांचा सहभाग



**मंचर :** कळंब (ता. आंबेगाव) येथील भक्ती शक्ती गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेत झालेल्या संस्कार शिबिरात १०३ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. तसेच विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नामदेव महाराज वाळके, पांडुरंग महाराज येवले, आदिनाथ महाराज जुन्नरकर, १०८ स्वामी कैवल्यानंद गिरीजी, विकास महाराज हगवणे, भीमाशंकर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरदराव लेंडे, पांडुरंग पवार, मथाजी पोखरकर, अजय आवटे, अंकित जाधव, दत्ता बांगर, दादाभाऊ पोखरकर, माऊली घोडेकर, गुलाब नेहरकर, उद्योजक गोविंद खिलारी, बाबाजी टेमगिरे, किरण घोडेकर, बाबाजी चासकर उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक गणेश महाराज घोडेकर यांनी संस्थेचा ७ वा वर्धापन दिन, संस्थेची वाटचाल आणि मान्यवरांचे मोलाचे योगदान या विषयी माहिती दिली. संस्कार शिबिरात सहभाग घेतलेल्या १०३ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. शिबिरासाठी विजय महाराज खाडे आणि गौतम महाराज भालेराव यांनी योगदान दिले. अथर्व महाराज भास्कर यांचे किर्तन झाले. उद्योजक बाबाजी टेमगिरे यांनी ५१ हजार रुपयांची देणगी संस्थेला दिली. तसेच उद्योजक शंकर पिंगळे यांनी महाप्रसादासाठी साहित्य दिले. कार्यक्रमाचे संयोजन भक्ती शक्ती गुरुकुल वारकरी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब बोऱ्हाडे, कार्याध्यक्ष प्रशांत अभंग, उपाध्यक्ष संदीप थोरात, सचिव जनार्दन नाईकडे, माजी आदर्श सरपंच अशोकराव मोढवे, शरद बँकेचे संचालक अजय घुले, सचिन वायाळ, हेमंत चिखले, वैभव पोखरकर यांनी केले. सूत्रसंचालन आणि स्वागत सतीश जाधव यांनी तर प्रास्ताविक वैभव महाराज शिंदे यांनी केले.

## एमआयडीसीच्या जमिनीमधून मुरुमाची चोरी

**शिरूर :** करडे (ता.शिरूर) येथील एमआयडीसी परिसरातून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीचा तब्बल ३३०० ब्रास मुरूम अनधिकृतपणे उत्खनन करून चोरी करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी स्थापत्य विभागाचे उपअभियंता मिलिंद रामचंद्र कासार (वय ५६, रा. मीतिलानगरी, पिंपळे सौदागर, पुणे) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार शिरूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, १६ मे रोजी उपअभियंता मिलिंद कासार हे करडे एमआयडीसी येथे विविध कामांच्या पाहणीसाठी गेले असता, गट नंबर ११५/अ, ११५/ब, ११५/६ आणि १०७ या एमआयडीसीच्या मालकीच्या जमिनींमधून अंदाजे ३३०० ब्रास मुरूम अज्ञात व्यक्तीने जेसीबी व डंपरच्या सहाय्याने काढून नेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर एमआयडीसी स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित मुरूम चोरावर कारवाई व्हावी, यासाठी महसूल विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. अखेर एमआयडीसी स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे निमोणेच्या मंडलाधिकाऱ्यांनी २३ मे रोजी संबंधित मुरूम चोरीचा पंचनामा करून वरिष्ठ कार्यालयाकडे अहवाल सादर केला. त्यानंतर मंगळवारी शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींच्या विरोधात सुमारे ३३०० ब्रास मुरूम चोरी केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला.

## पुरग्रस्तांना वस्तूचे वाटप

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे येथे झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने सर्वत्र हाहाकार सुरू आहे त्यामुळे तेथे पूर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे संसदरत्न खासदार सौ सुप्रियाताई सुळे यांचा सूचनेनुसार राष्ट्रवादी काँग्रेस इंदापूर तालुका शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने त्यांना जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या त्यामध्ये पाच क्विंटल अन्नधान्य देण्यात आले यावेळी तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष सागर मिसाळ शेटफळगढे सरपंच शंकर राऊत पुणे जिल्हा संपर्कप्रमुख अमोल मुळे जिल्हा उपाध्यक्ष संमदभाई सय्यद अमोल झगडे संदीप मचाले दीपक वाबळे दुपारगुडे विकास खिलारे उपस्थित होते

## ऐन मे महिन्यात नदीला पूर



आंबेगाव पिंपळगाव-खडकी (ता.आंबेगाव ) मे महिन्यात घोडनदीला आलेला पूर. (छाया : अरूण गोरडे.)

## मुसळधार पावसामध्ये घोड नदीला पूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** अनेक वर्षांत मे महिन्यात पहिल्यांदाच घोड नदीला पूर आला आहे. अशा स्वरूपाचा पाऊस याआधी कधीच झाला नव्हता. मे महिन्यात घोड नदीला कधीच पूर आला नव्हता, असे जुन्या-जाणत्या शेतकऱ्यांनी सांगितले. पावसामुळे गावागावांतील ओढ्या-नाल्यांना पाणी आले आहे. याआधी मे महिन्यात वळवाचा पाऊस व्हायचा. परंतु, एक-दोन पाऊस याठिकाणी व्हायचे. जून महिन्यात मान्सूनचा पाऊस सुरू व्हायचा. त्यानंतर जुलै, ऑगस्ट महिन्यात ओढ्या नाल्यांना पाणी यायचे.डिंभे धरण भरल्यानंतर घोड नदीत पाणी सोडले जायचे. त्यानंतर घोड नदीला पूर यायचा. चास तालुका आंबेगाव येथिल माऊलीची चास या ठिकाणी पूर्वकालीन जे कुंड आहे. तेथे पूर परस्थिती सारखा पाऊस पडत असून पाणी खळखळून वाहत असल्याने निसर्गरम्य वातावरण निर्माण झाले आहे पुढील काही दिवसात पाऊस झाला तर नदीचे पाणी वाढण्याची शक्यता असून नदी काठच्या लोकांनी सावधान राहणे गरजेचे असल्याचे गावातील पोलीस पाटिल सांगत आहे.

# उन्हाळी बाजरीला अवकाळीचा फटका

## अवकाळी पावसाचा फटका; कणिसे काळी पडण्याची भिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसाचा फटका उन्हाळी बाजरी पिकाला सर्वाधिक बसला आहे. अनेक ठिकाणी उन्हाळी बाजरीचे पीक भुईसपाट झाले आहे. आता बाजरीची कणिसे काळी पडण्याची भीती बाजरी उत्पादक शेतकऱ्यांनी मधून व्यक्त केली आहे.

आंबेगाव तालुक्यात उन्हाळी बाजरीचे पीक सर्वाधिक शेतकरी घेतात. यंदा उन्हाळी बाजरीला सुरुवातीपासूनच मुबलक प्रमाणात पाणी व स्वच्छ हवामानाची साथ मिळाली. त्यामुळे बाजरीचे पीक जोमात आले. परंतू बाजरीचे पीक काढणीला आले असताना अवकाळी पावसाने सर्वत्र थैमान घातले.

या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका बाजरी पिकाला मोठ्या प्रमाणावर बसला.पारगाव, शिंगवे, काठापूर, रांजणी, नागापूर, थोरांदळे, वळती, भागडी आदी परिसरातील बाजरी पिक अनेक ठिकाणी भुईसपाट झाले.

या परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी बाजरी पिकाची काढणी सुरू केली असतानाच अवकाळी पावसाने सुरुवात केली.त्यामुळे बाजरीची कणिसे पावसात भिजली.अनेक शेतकऱ्यांनी बाजरीची कणिसे काढून प्लास्टिकच्या कागदाखाली झाकून ठेवली आहेत.परंतू या भागात दररोज मुसळधार पाऊस पडत असल्याने अनेक ठिकाणी कणिसांमध्ये पाणी शिरून कणसे आता काळी पडण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



रांजणी (ता. आंबेगाव )येथे उन्हाळी बाजरीची काढणी करून कणिसे प्लास्टिकच्या कागदा खाली झाकून ठेवली आहेत. (छाया : किशोर खुडे.)

## सांडभोरवाडीतील बचत गटांना १७ लाख ४० हजारचे वाटप.



सांडभोरवाडीतील बचत गटांना समृद्धी महिला ग्रामसंघाच्या माध्यमातून धनादेश वाटप करताना.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** ' उमेद ' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत खेड तालुक्यातील सांडभोरवाडी स्वराज्य समृद्धी महिला ग्रामसंघाच्या माध्यमातून सांडभोरवाडी (तिन्हेवाडी) , ता.खेड येथे २९ बचत गटांना CIF निधीचे १७ लाख ४० हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. या माध्यमातून जवळपास ३०० महिलांना उद्योग व्यवसाय करण्यासाठी आर्थिक मदत होणार आहे.

गाई म्हशी व शेळी पालन, कुक्कुटपालन, पापड, लोणची तयार करणे, डाळी, पीठ गिरणी अशा विविध व्यवसायांसाठी या निधीचा उपयोग होणार आहे. पुणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्या माध्यमातून व खेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांना उद्योग व्यवसाय वृद्धीसाठी हा निधी देण्यात आला आहे.

प्रभाग समन्वयक अनिल वखरे यांनी यावेळी महिलांना मार्गदर्शन केले.लतिका भालेराव,सांडभोरवाडीच्या लोकनियुक्त सरपंच प्रतीक्षा पाचारणे, उपसरपंच रंगनाथ आरूडे, सदस्य प्रियांका पाचारणे, कविता आरुडे , पोलिस पाटील ॲड सुषमा आरुडे, ग्रामसेवक बाबाजी चव्हाण, ग्रामसंघाच्या अध्यक्ष शीला आरुडे, उपाध्यक्ष सुरेखा पाचारणे, सचिव नंदिनी सांडभोर, लेखनिक सीमा आरुडे, समन्वयक मनिषा आरुडे तसेच सर्व बचत गटांच्या अध्यक्ष,सचिव, सभासद लाभार्थी महिला, प्रभागसंघ पदाधिकारी, ग्रामसंघ पदाधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## नूकसानग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** गेले काही दिवस सुरु असलेल्या अतिवृष्टीने शेतकरी आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी विविध पदाधिकारी आणि शासकीय अधिकाऱ्यांसमवेत तालुक्याच्या पूर्व भागातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. शेती, मालमत्ता, रस्ते यांच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन संकटग्रस्त नागरिकांना वळसे पाटील माध्यमातून शासकीय पातळीवरील सर्व साहाय्य देण्याचे आश्वासन विवेक पाटील यांनी दिले आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी आंबेगाव तालुक्याच्या पुर्व भागातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागात नायब तहसीलदार शांताराम किर्वे, मंडळ अधिकारी भाऊसाहेब शिंदे, तलाठी शशांक चौदंते, ग्रामविकास अधिकारी ज्योतीतम बोर्डे यासंह पाहणी दौरा केला.यामध्ये प्रामुख्याने वडगावपीर येथील गुळवेवस्ती येथील रस्ते, पोखरकरमळा क्रमांक २ येथील राहते घराची दुरावस्था, वाळुंजनगर येथील स्मशानभूमी जवळील भाग,वाहतुकीचे रस्ते,राहते घर तसेच अनेक शेतीबांधांचे झालेल्या नुकसानीचा समावेश होता.

यावेळी त्यांच्या समवेत आंबेगाव तालुका पंचायत समितीचे सदस्य रविंद्र करंजखेले, तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, शरद बँक संचालक अशोक आदक पाटील, माजी सरपंच उद्धवराव लंके, वसंत पडवळ,अवसरी बुदूक राष्ट्रवाही काँग्रेस पक्ष गणप्रमुख बाळशीराम वाळुंज,बाळासाहेब भोर,माजी सरपंच संजय पोखरकर,माजी उपसरपंच अण्णा पोखरकर,सुमित वाळुंज तसेच पक्षाचे पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.



आंबेगाव तालुक्याच्या पुर्व भागातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागाची पहाणी करताना विवेक वळसे पाटील, रविंद्र करंजखेले व पदाधिकारी.

# मे महिन्याच्या पावसातच तलाव ओव्हर फ्लो




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले आहे. मे महिन्याच्या शेवटचा आठवडा सुरू झाला आहे. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू झालेला पाऊस अजूनही बंद होण्याचे नाव घेत नाही. याला नक्की अवकाळी म्हणावे की वादळी म्हणावे हेच कोणाला कळत नाही. तज्ज्ञ मंडळी आपापल्या परीने अंदाज लावून पावसाचे वर्णन करत आहेत. तथापि, मे महिन्यात एवढा पाऊस कधी पडला असेल, असे जिवंत असणारी कोणतीच पिढी सांगत नाही. तसा मे महिना उन्हाळ्यातील महिना आणि जून महिन्याच्या सुरवातीला वळवाचा पाऊस सुरू होतो. त्याला मान्सून पूर्व पाऊस म्हणून संबोधले जाते. तर १० जूनच्या पुढे मान्सून केरळ मार्गे महाराष्ट्रात प्रवेश करत असतो. पण यावर्षी मान्सून महाराष्ट्र मार्गे केरळ वरून अंदमानला जातो की काय, असं वाटायला लागले आहे.

या पावसाने पहिल्यांदाच मे महिन्यात सर्व पाणवठे तुडुंब भरल्याचे पाहायला मिळत आहे. ज्या महिन्यात काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची अडचण असते आज त्याच ठिकाणी सर्व विहिरी, नाले, तलाव यामध्ये बऱ्यापैकी पाणीसाठा तयार झाला आहे. या पावसाने जनावरांना चारा देखील लवकर मिळणार आहे. पण आता त्याने उघडीप द्यायला हवी. कारण शेतीची योग्य मशागत करून जमीन उगवती करणे शेतकऱ्याच्या समोरील सर्वात मोठे आव्हान असते आणि यंदा वेगळेच हवामान दिसत असल्यामुळे शेतकरी देखील संभ्रमात पाहायला मिळत आहे. त्यात यंदा आंब्याचा सिजन देखील अर्धाच झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी संकटात आहे. तसेच गवार, टोमॅटो, कोबी, फ्लावर, मेथी, कोथिंबीर यांसारखी पिके या पावसात येणे शक्य नसल्याने शेतकरी अधिक चिंतेत आहे.

माळरानावरील जमीन आणि राणातले पाणवठे भरल्याने शेतकरी वर्ग सध्या तरी समाधानी दिसत आहे. परंतु आता पावसाने थांबणे गरजेचे आहे. पुढे पंढरपूरची वारी देखील आहे. जर वेळेत पेरणी वगैरे झाली तर यंदा शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणावर वारीला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरू असलेला पाऊस समाधान देणारा असला तरी आता त्याने थांबायला आहे.या पाणवठ्यांचा फायदा यंदा लवकरच शेतकऱ्यांना घेता येईल हे मात्र नक्की.

## गरोदरपणात यूव्ही थेरेपी ?

**विचारा प्रश्न**

माझी ३६ वर्षांची मैत्रीण गरोदर आहे. त्यातच तिला व्हिटिलिगो हा विकार झाला आहे. याबाबत तिने त्वचा तज्ज्ञांचा सल्ला घेतला. त्यांनी तिला यूव्ही लाईट थेरपीचा सल्ला दिला आहे. गरोदरपणाच्या काळात ही थेरपी घेता येईल, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे. त्यांचं म्हणणं योग्य आहे का? माझी मैत्रीण यूव्ही थेरपी घेऊ शकते का?

**उत्तर** : यूव्ही थेरपी ही अत्यंत सुरक्षित अशी उपचारपद्धती आहे. व्हिटिलिगोचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. शरीरातल्या कोणत्याही अवयवाला यामुळे त्रास होत नाही. पण यामुळे मानसिक त्रास होऊ शकतो. थोडी अस्वस्थता जाणवू शकते. या विकारावर तातडीने उपचार घेण्याची काहीच गरज नाही. प्रसूती झाल्यानंतरही यावर उपचार घेता येतील. त्यामुळे काळजीचं काहीच कारण नाही.



डेंगी, मलेरिया यासारखे आजार डास चावल्यामुळे होतात हे सर्वांना माहीत आहे. हे आजार टाळता येण्याजोगे आणि पूर्णपणे बरे होऊ शकणारे आजार आहेत; पण तरीही मलेरियाच्या नावाने आजही धडकी भरते. त्याला कारणही तसेच आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्यामाहितीनुसार मलेरियाने दर दुसऱ्या मिनिटाला एका मुलाचा मृत्यू होतो, तर दर वर्षी मलेरियाच्या २० कोटी प्रकरणांची नोंद होते.

## मलेरियाने दर दोन मिनिटाला मृत्यू



**डॉ. अंजिक्य बोऱ्हाडे**

गेल्या दशकात मलेरिया निर्मूलनासाठी अनेक प्रयत्न केले गेले. २०१५ पासून मलेरियाविरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने २०१८ मध्ये आपला 'ग्लोबल मलेरिया रिपोर्ट' सादर केला. ताज्या माहितीनुसार, २०१५ ते २०१७ वर्षांत मलेरिया रुग्णांच्या संख्येमध्ये कोणतीही घट झालेली नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षात मलेरियामुळे ७८ हजार रुग्णांचा मृत्यू झाला आहे, तर ७२ हजारांपेक्षा अधिक रुग्णांना मलेरियाची लागण झाली आहे. हा आजार झाल्यानंतर वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा हा आजार जीवघेणा ठरतो.

ॲनाफिलीस डासाच्या प्रजातीमधील मादी डासामुळे हा आजार होतो. ही मादी डास साठवलेल्या पाण्यामध्ये वास्तव्य करून अंडी घालत असल्यामुळे या आजाराचा त्रास होऊ नये म्हणून या डासांची उत्पती स्थळे नष्ट करुन परिसर स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. या आजारांमध्ये रुग्णाच्या शरीरामध्ये रक्तामधील प्लेटलेट्स देखील कमी होतात.

ताप, डोकेदुखी आणि थंडी ही मलेरियाची प्राथमिक लक्षणे असून मलेरियाचा डास चावल्यानंतर १०-१५ दिवसांत ही लक्षणे दिसतात. ही लक्षणे कधीकधी सुप्त किंवा कमी तीव्रतेची असतात आणि पटकन लक्षात येत नाही; मात्र त्यावर २४ तासांमध्ये उपचार न केल्यास जीवाला धोकाही निर्माण होऊ शकतो. पाच वर्षांखाली मुलांना मलेरियाचा सर्वाधिक धोका असतो. २०१७ मध्ये जगभरात मलेरियाने झालेल्या मृत्यूंमध्ये ६१ टक्के प्रमाण हे पाच वर्षांखालच्या मुलांचे होते. तसेच गरोदर महिला आणि रोगप्रतिकारशक्ती कमी असणाऱ्यांना देखील मलेरिया होण्याची शक्यता जास्त असते.

जगात सर्वात जास्त तरुणवर्ग भारतात आहे; पण हाच तरुणवर्ग व्यसनाच्या विळख्यात अडकला आहे. आपल्या देशात तंबाखू सेवन करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तंबाखू खाणे आरोग्यास हानीकारक आहे, असा इशारा दिला जातो; पण यानंतरही तंबाखूजन्य पदार्थांचा वापर वाढत चालला आहे. जगात तंबाखूचे सेवन करण्यात दुसरा क्रमांक भारताचा लागतो.

## तंबाखू खाण्यात भारत जगात दुसरा!



**डॉ. सतीश सोनवणे**

'केपी.एम.जी. इन्शुरन्स अँड कन्सल्टिंग सर्व्हिसेज 'एलएलपी'ने तयार केलेल्या एका अहवालामध्ये ही चिंताजनक बाब समोर आली आहे. खैनी, गुटखा, सुपारी, तंबाखू, जर्दा, बिडी, सिगरेट आणि हुक्का सारख्या उत्पादनांच्या सेवनात मोठी वाढ झाल्याचे या अहवालामध्ये नुमद करण्यात आले आहे. भारतामध्ये धुम्रपान किंवा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनने दर वर्षी दहा लाख लोकांचा मृत्यू होता. या आकडेवारीत गेल्या ३० वर्षात ५८.९ टक्के वाढ झाली आहे.

भारतात तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे १९९० मध्ये सहा लाख लोकांचा मृत्यू झाला होता. २०१९ मध्ये हाच आकडा वाढून १० लाखांवर पोहोचला आहे. आता जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या अहवालामध्ये जगभरात तंबाखूच्या वापरामुळे दर वर्षी जवळपास १०५.४ कोटी रुपयांचा खर्च होत असल्याचं समोर आले आहे. हा खर्च तंबाखूमुळे आजारा पडलेल्या लोकांच्या उपचारांवर खर्च होत आहे. देशात तंबाखूचे सेवन करण्यात मिझोरम हे राज्य पहिल्या स्थानावर आहे. मिझोरममध्ये तब्बल ६७ टक्के लोक तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतात, तर सर्वात कमी म्हणजे नऊ टक्के तंबाखूचा वापर गोव्यात होतो. अहवालानुसार, महिलांमध्येही तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामध्ये वाढ झाली आहे. प्रत्येक सहावी महिला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करते. अनेक महिला मजूर गुटखा, खैनी, विडी यांचे सेवन करतात तर काही महिला सिगारेट ओढणे, गुटखा खाणे स्टेटस म्हणून सुरू करतात आणि त्यानंतर व्यसनाला बळी पडतात.

तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने माणसाच्या आरोग्यावर अनेक दुष्परिणाम होतात. यात सर्वात मोठा धोका असतो तो कॅन्सर अर्थात कर्करोगाचा. तंबाखूमुळे तोंडाचा, ओठाचा, जबड्याच्या, फुफ्फुसाचा, घशाचा, पोटाचा, किडनीचा आणि मूत्राशयाचा कर्करोग होण्याची भीती असते. यापैकी भारतामध्ये तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. धुम्रपानामुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढते आहे. तंबाखूमुळे छातीत दुखणे, हृदयविकार झटका येणे, रक्तवाहिन्याचे विकार इत्यादी रोग जडतात. धूम्रपानामुळे टी.बी. सुद्धा होऊ शकतो.


## जिममधल्या व्यायामानंतर...

**आपण कुठे चुकतो?**

जिममध्ये जाऊन घाम गाळताना प्रचंड मेहनत करावी लागते. पण जिममधल्या व्यायामानंतर आपण काही गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. यामुळे व्यायामाचा काहीच लाभ होत नाही. जिममधल्या व्यायामानंतर काय करायला हवं याविषयी...

✻ जिममध्ये व्यायाम केल्यानंतर शरीर ताणण्याचे व्यायाम करायला हवेत. इतकंच नाही, तर शरीराला सर्वसामान्य पातळीवर आणायला हवं. व्यायाम करताना स्नायूंवर बराच ताण येतो. त्यांचा आकार बदलतो. व्यायामानंतर शरीर ताणण्याचे व्यायाम केल्याने स्नायू आपल्या मूळ स्थितीत परत येतात. व्यायाम केल्यानंतर शरीराचं तापमान वाढतं. रक्तदाब आणि हृदयगतीही वाढलेली असते. त्यामुळे शरीर सामान्य पातळीवर आणणं गरजेचं असतं.

✻ आहारातल्या कॅलरींची काळजी करणारे अनेकजण व्यायामानंतर पोषक आहार घेत नाहीत. व्यायामानंतर शरीराला पोषक घटकांची सर्वात जास्त आवश्यकता असते. त्यामुळे फळं, भाज्या, डाळी, कडधान्य असा आहार घ्यायला हवा. शरीराला योग्य असलेले पदार्थ खाणं गरजेचं आहे. तेलकट पदार्थ खाणं टाळायला हवं. तसंच व्यायाम केला म्हणून शरीरावर जंक फूडचा मारा करू नये.



✻ व्यायामादरम्यान शरीरातलं पाणी कमी होतं. यासोबतच मीठ आणि इतर पोषक घटकही घामावाटे बाहेर पडतात. त्यामुळे व्यायामानंतर भरपूर पाणी प्यायला हवं. तसंच नारळ पाणी, फळांचे रस, ग्रीन टी, चॉकलेट मिल्क, ताक अशी पेयंही पिता येतील.

✻ व्यायामानंतर शरीरातचं तापमान प्रचंड वाढलेलं असतं. हे तापमान पुन्हा पूर्वीसारखं होईपर्यंत थंड पाण्याने आंघोळ करू नका. व्यायामानंतर लगेच थंड पाण्याने आंघोळ केली तर हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. त्यामुळे व्यायामानंतर साधारण अर्ध्या तासाने आंघोळ करावी.

✻ व्यायामानंतर शरीराला प्रथिनांची गरज असते. पण ही गरज तासाभरासाठीच असते. त्यानंतर आपल्या पचनसंस्थेला योग्य आहाराची गरज असते. त्यामुळे फक्त प्रोटीन शेक किंवा जेवणाच्या पर्यायी गोष्टींवर अवलंबून राहू नका. पोषक आहार घ्या.

✻ व्यायामानंतर आरामही गरजेचा असतो. त्यामुळे थोडीशी झोप काढायला हरकत नाही. सोफ्यावर बसून राहणं, काही तरी खात राहणं किंवा आवडती मालिका बघणं हा आरामाला पर्याय असू शकत नाही. त्यामुळे थोडा वेळ डोळे बंद करून पडा. यामुळे स्नायूंनाही आराम मिळेल.

## धोके मोबाईल गेमच्या व्यसनाचे

**तंत्र आरोग्याचे**

मोबाईल गेमचं व्यसन अनेकांना असतं. त्यातही तरूण आणि लहान मुलांना याचं व्यसन लवकर लागतं. मोबाईलवर नवनवे गेम येत असतात आणि आधी त्याची सवय आणि मग त्यांचं व्यसन कसं लागतं हे कळतच नाही. फोर्टनाईट या गेमने अनेकांना वेड लावलं आहे. या गेमचे परिणाम आणि दुष्परिणाम याबाबत चर्चा होत असली तरी घरातल्या लहान मुलांवर पडलेला त्याचा प्रभाव चिंतेचं कारण असू शकतो. या गेम्सच्या स्वरूपामुळे लोकांना त्यांची सवय लागून जाते. गेम खेळल्याशिवाय चैन पडत नाही. गेम खेळताना आयुष्यातल्या इतर गोष्टी मागे पडतात. मुलं अभ्यास करत नाहीत, घरातली कामं करत नाहीत. वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत. खाण्याकडे त्यांचं लक्ष नसतं. घरच्यांसोबत किंवा मित्र-मैत्रिणींसोबत बाहेर जात नाहीत. महत्त्वाचं म्हणजे मैदानी खेळ खेळत नाहीत. या सगळ्याचा त्यांच्या जडणघडणीवर दूरगामी परिणाम होऊ शकतो.



या गेम्सचं व्यसन जडलं की मुलांची बरीच सामाजिक कौशल्यं कमी होतात. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांचा इतरांशी असलेला संवाद कमी होतो. माणसांची आपल्याला गरज आहे असं मुलांना वाटत नाही. या गेम्सचा वापर मुलांची कौशल्यं वाढवण्यासाठी करता येतो. स्मरणशक्ती वाढवणं, एकाग्रता वाढवणं, भाषाज्ञान यासाठी गेम्सचा वापर करता येऊ शकतो. या गेम्सचा वापर मर्यादित काळासाठी केला तर ही उद्दिष्ट साध्य करता येऊ शकतात. मुलांना लागलेलं मोबाईल गेमचं व्यसन किंवा सवय ही अनेक पालकांची समस्या असते. यावर उपाय शोधण्याचाही त्यांचा प्रयत्न असतो. मुलांना लागलेलं मोबाईल गेमचं व्यसन कमी करण्यासाठी काय करता येईल याविषयी जाणून घ्यायला हवं.

मुलांचा गेम खेळण्याचा वेळ कमी करायला हवा. त्यांचं गेम खेळणं एकाएकी पूर्णपणे थांबवू नका. पण हळूहळू वेळ कमी करा. मुलांना इतर गोष्टींमध्ये रमवा. मुलांना विविध प्रकारची गॅझेट्स वापरू देऊ नका. मोबाईलवर मुलं कोणते गेम्स खेळतात ते बघा. व्यसन जडण्यासारखे गेम्स त्यांना खेळायला देऊ नका. शारीरिक मेहनत करावी लागेल अशा गेम्सची निवड करा. मुलांना वेळ द्या. त्यांच्याशी बोला. इतर छंद जोपासायला मदत करा. मुलं कुटुंबासोबत जास्तीत जास्त वेळ कसा घालवतील ते बघा. लहान वयाच्या मुलांना मोबाईल हाताळू देऊ नका. गेम्सचं जडलेलं व्यसन किंवा सवयींकडे दुर्लक्ष करू नका. मानसोपचार तज्ज्ञ किंवा समुपदेशकांची मदत घ्या. मोबाईलवर गेम खेळण्याचं व्यसन लागल्याने वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होऊ शकतो. मुलांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. मुलं हिंसक आणि हट्टी बनू शकतात. त्यामुळे मुलांची ही सवय वेळीच सोडवा.

## तरुणांमध्ये उच्चरक्तदाब मोठी समस्या

**डॉ. महेश दळे**

उच्च रक्तदाब ही आजच्या काळामधली मोठी समस्या आहे. चिंतेची बाब म्हणजे तरुणांमध्येही याचा त्रास वाढत आहे. 'कार्डिओलॉजी सोसायटी ऑफ इंडिया'च्या अहवालानुसार, भारतातील प्रत्येक पाच तरुणांपैकी एक तरुण हा उच्च रक्तदाबाचा बळी ठरत आहे. त्यानुसार भारतातील सुमारे आठ कोटी तरुण उच्च रक्तदाबाचे बळी आहेत. पाश्चिमात्य तरुणांच्या तुलनेत भारतीय तरुणांसाठी ही मोठी समस्या आहे. यामुळेच अलीकडच्या काळातमध्ये तरुण वयात हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात अशा घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

आपल्या शरीरातील सर्व अवयवांना कार्य करण्यासाठी भरपूर पोषक तत्वांची आवश्यकता असते. या पोषक तत्वांची पूर्तता करण्यासाठी, आपण दररोज अन्न आणि आरोग्यदायी गोष्टी खातो; परंतु हे पोषक घटक केवळ खाल्ल्याने आपल्या अवयवांचे पोषण होऊ शकत नाही. शरीरासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक रक्ताद्वारे आपल्या अवयवांपर्यंत पोहोचवले जातात. रक्त आपल्या शरीरातून वाहते, तेव्हा ते नसा आणि धमन्यांच्या कडांवर दबाव आणते. रक्तवाहिन्या आणि शिरा यांच्यावर पडणाऱ्या या दाबाला रक्तदाब म्हणतात. रक्तदाब खूप वाढला तर हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक सारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यात रुग्णाचा तात्काळ मृत्यू देखील होऊ शकतो.

आजकाल तरूणाई पॅकबंद आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खातात. यामध्ये जास्त प्रमाणात सोडियम असते. जास्त प्रमाणात सोडियमचे सेवन केल्याने शरीरात पाणी साचून रक्तवाहिन्यांवर दबाव येतो. तणावामुळे शरीरातील हार्मोन्सचा स्त्राव वाढतो. हार्मोन्स हृदयाचे ठोके वाढवतात आणि रक्तवाहिन्या अरुंद करतात. एखादी व्यक्ती दीर्घकाळ तणावाखाली राहिली तर शरीरात जळजळ होते. त्यामुळे रक्त वाहून नेणाऱ्या नसा खराब होतात. आजकाल बहुतेक लोक ऑफिसमध्ये नऊ तास डेस्क जॉब करतात. यामुळे शारीरिक हालचाली कमी होऊ लागतात आणि उच्च रक्तदाबाचा धोकाही वाढतो. कमी वेळ झोपणे, अति मद्यपान आणि सिगारेट यांसारख्या सवयींमुळेही रक्तवाहिन्या आकसतात. त्यामुळे उच्च रक्तदाबाची समस्याही तसेच हृदयविकाराचा धोकाही वाढतो.

## हृदयविकाराच्या झटक्यानंतर...



**आरोग्यमंत्र**

हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण सध्या बरंच वाढलं आहे. वयाच्या तिशी, चाळीशीतही हृदयविकाराचा झटका आल्याचं पहायला मिळत आहे. हा झटका आपलं आयुष्य बदलून टाकतो, जगण्यावर बरीच बंधनं येतात. हृदयविकाराच्या झटक्यानंतर होणाऱ्या बदलांविषयी...

✻ हृदयविकाराचा झटका आल्यानंतरचे २८ दिवस खूप महत्त्वाचे असतात. या काळात हृदयक्रिया बंद पडून झटका आलेल्या रूग्णांचा मृत्यू होण्याचा धोका बराच वाढतो तसंच इतर गुंतागुंती निर्माण होण्याची शक्यताही जास्त असते. रूग्णालयातून घरी आल्यानंतरही उपचार सुरू ठेवावे लागतात.

✻ हृदयविकाराच्या झटक्यांची कारणं जाणून घेणं महत्त्वाचं असतं. हृदयविकाराचा झटका आलेल्या तरूणांसाठी तर हा मुद्दा खूप महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेऊन तणावमुक्त आयुष्य जगण्याचा प्रयत्न करायला हवा.

✻ हृदयविकाराचा झटका अनेकांना मानसिक धक्का देतो. अशा घटनेनंतर रूग्ण आतून पूर्णपणे कोलमडून जातो. खूप अस्वस्थ होतो. अशा वेळी त्याला आधाराची गरज असते. आयुष्यावर बरीच बंधनं येतात. यामुळे काळजीत अधिकच भर पडते.

✻ हृदयविकाराचा झटका आल्यानंतर शारीरिक हालचालींवर मर्यादा येतात. सर्वसामान्य आयुष्य सुरू करण्याआधी शरीराला विश्रांतीची गरज असते. शारीरिक हालचालीची गरज असली तरी प्रत्येकाने आपल्या हृदयाचा आवाज ऐकायला हवा. धाप लागणं, चक्कर येणं अशा समस्या उद्भवत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. शरीराला विश्रांती द्यायला हवी.

✻ हृदयविकाराच्या झटक्यानंतर रूग्णाच्या शरीरात गुंतागुंत निर्माण होते. अनेकांना छातीत जळजळ जाणवू शकते. काही खाल्ल्यावर हा त्रास जास्त प्रमाणात जाणवतो. छातीत जळजळलं किंवा दुखलं तर लगेच काळजी वाटायला लागते. पुन्हा हृदयविकाराचा झटका येईल की काय, हा विचार अस्वस्थ करून जातो. अशा वेळी हात जड होणं, तोंड कोरडं पडणं अशा समस्या उद्भवतात.

✻ हृदयविकाराच्या झटक्यानंतर वेळेत औषधं घेणं गरजेचं असतं.झटका येऊन गेल्यानंतर शारीरिक संबंधांमध्ये अडचणी येतील असं अनेकांना वाटतं. पण पुरेशा विश्रांतीनंतर सर्वसामान्य आयुष्य जगू लागल्यानंतर लैंगिक संबंधांमध्ये बाधा येत नाही. रूग्ण नीट चालत असेल किंवा दोन जिने चढल्यानंतर दम लागत नसेल तर नियमित लैंगिक संबंधांमध्ये कोणतीही अडचण येत नाही.

**नवसंशोधन**

### मधुमेहामुळे वाढतो कॅन्सरचा धोका!

मधुमेहाचे बरेच धोके आहेत. त्यातच आता एका नव्या धोक्याची भर पडली आहे. मधुमेहींना कॅन्सर होण्याची शक्यता जास्त असल्याची बाब एक संशोधनातून समोर आली आहे. तसंच मधुमेहींचा कॅन्सर बरा होण्याची शक्यताही बरीच कमी असते असंही संशोधकांचं म्हणणं आहे. विविध प्रकारच्या कॅन्सरचा संबंध मधुमेहाशी जोडण्यात आला आहे. मधुमेहींमध्ये स्तनांच्या कॅन्सरची शक्यता पाच टक्क्यांनी अधिक असते. तसंच कॅन्सरचं निदान झालेल्या मधुमेहींमध्ये मृत्यूची शक्यताही बरीच जास्त असते. स्तनांच्या आणि प्रोस्टेट कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूची शक्यता मधुमेहींमध्ये २५ ते २९ टक्क्यांनी वाढते, असंही हे संशोधन सांगतं.



**डोळ्यांचं आरोग्य**

### मोतीबिंदू आहे?


मोतीबिंदू असलेल्या प्रौढांना ऑस्टिओपोरोसिस आणि हाड मोडण्याचा धोका असतो. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. मोतीबिंदूचं निदान झाल्यानंतर रूग्णाचा ऑस्टिओपोरोसिस आणि हाड मोडण्याचा धोका २९ टक्क्यांनी वाढत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे ऑस्टिओपोरोसिस आणि मोतीबिंदूचा धोका वाढतो. त्यामुळे मोतीबिंदूचं निदान झालेल्या प्रौढांनी ऑस्टिओपोरोसिस आणि हाडांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.



**दंतारोग्य**

### का राखावं तोंडाचं आरोग्य?

तोंडाचं आरोग्य आणि शारीरिक आरोग्य यांच्यात खूप जवळचा संबंध आहे. तोंडाचं आरोग्य राखलं नाही तर बऱ्याच विकारांना निमंत्रण मिळू शकतं. तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केलं तर हृदयविकार, एंडोकार्डिटिस, वेळेआधी होणारी प्रसूती, जन्माच्या वेळी बाळाचं वजन कमी असणं अशा समस्या उद्‌भवू शकतात. तोंडातले बॅक्टेरिया रक्तवाहिन्यांमध्ये प्रवेश करून सर्वांगिण आरोग्य बिघडवू शकतात. त्यामुळे तोंडाच्या आरोग्याला महत्त्वाचं स्थान देणं गरजेचं आहे.



**आजीबाईंचा बटवा**

### लाभ गुलाबपाण्याचे...

गुलाबपाणी फक्त सौंदर्यवृद्धीसाठी उपयुक्त ठरतं असं नाही तर त्याचे इतरही अनेक लाभ आहेत. घसा खवखवत असेल तर डॉक्टर अँटीबायोटिक्स देतात. पण गुलाबपाण्याने घसा बरा होऊ शकतो. सर्दी, फ्लू, खोकला असेल तर गुलाबपाणी प्यावं. जंतूसंसर्गावरही गुलाबपाणी गुणकारी ठरतं. डोकं दुखत असेल तर गुलाबपाणी लावलेला रूमाल कपाळावर ठेवल्याने आराम पडू शकतो. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यासाठीही गुलाबपाणी उपयुक्त ठरतं. बद्धकोष्ठतेची समस्या असणाऱ्यांनीही गुलाबपाणी घ्यावं.









# मुंबईचे तीन खेळाडू मायदेशी परतले

## रोहितसोबत नवे खेळाडू : आज एलिमिनेटर लढतीत होणार गुजरात टायटन्सशी सामना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा संघ इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये एलिमिनेटर लढत खेळणार आहे. ३० मे रोजी गुजरात टायटन्सविरुद्धच्या लढतीपूर्वी मुंबईचे तीन खेळाडू परदेशात परतले आहेत. मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातील विल जॅक्स, रायन रिकेल्टन आणि कॉर्बिन बॉश हे एलिमिनेटर लढतीत उपलब्ध नसणार आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी ते राष्ट्रीय कर्तव्यावर मायदेशात परतले आहेत. मुंबई इंडियन्सने त्यांच्या या तिन्ही खेळाडूंना आनंदाने निरोप दिला आणि हा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला.



पंजाब किंग्सविरुद्धच्या लढतीनंतर हा निरोप समारंभाचा सोहळा ड्रेसिंग रुममध्ये रंगला होता. जॅक्स हा वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत इंग्लंड संघाचा सदस्य आहे आणि ही मालिका आजपासून सुरू होत आहे. रिकेल्टन व बॉश हे दक्षिण आफ्रिकेच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलसाठी निवडलेल्या संघाचे सदस्य आहेत. ११ ते १५ जून या कालावधीत ही फायनल ऑस्ट्रेलियाविरुद्ध लॉर्ड्सवर होणार आहे. त्याच्या तयारीसाठी हे दोघंही मायदेशात परतले आहेत.

जॅक्सने आयपीएल २०२५ च्या १३ सामन्यांत २३३ धावा केल्या आणि ६ विकेट्स घेतल्या. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने राईट टू मॅच कार्ड न वापरल्याने जॅक्स मुंबईच्या संघात दाखल झाला. रायन रिकेल्टनने मुंबईकडून या पर्वात ३८८ धावा केल्या आहेत आणि त्यात ३ अर्धशतकांचा समावेश आहे. मुंबईकडून सर्वाधिक धावा करणारा तो दुसरा फलंदाज आहे.

पाकिस्तान सुपर लीग सोडून बॉश आयपीएल खेळण्यासाठी आला. त्याने ३ सामन्यांत ४७ धावा केल्या व १ विकेट घेतली. या तिघांच्या बदल्यात मुंबई इंडियन्सने जॉनी बेअरस्टो, रिचर्ड ग्लीसन व चरिथ असलंका यांना करारबद्ध केले आहे. बेअरस्टो एलिमिनेटर लढतीत रोहित शर्मासोबत सलामीला येण्याची शक्यता आहे.

मुंबई इंडियन्सला क्वालिफायर १ मध्ये जादा मिळवण्याची संधी होती, परंतु त्यांनी ती संधी गमावली. आता पंजाब किंग्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात क्वालिफायर १ चा सामना होईल. तेच मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स हा एलिमिनेटर सामना होईल. ३ जूनला अहमदाबाद येथे फायनल खेळवली जाईल.

# पुणे जिल्हा संघाचे आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात



**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्युआयएफए) यांच्यावतीने आयोजित 'महाराष्ट्र राज्य आंतर जिल्हा' सब-ज्युनिअर मुलांच्या (१३ वर्षाखालील) गटाच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघाला ठाणे संघाकडून ०-१ असा पराभव स्विकारावा लागला आणि पुणे संघाचे आव्हान उपांत्य फेरीतच संपुष्टात आले. धुळे जिल्ह्यातील शिरपुर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने आपली विजयी घौडदौड कायम ठेवताना अंतिम चार संघांमध्ये आपले स्थान निश्चित केले होते. आज सकाळी ठाणे संघाविरूध्द झालेल्या सामन्यामध्ये पुणे संघाला १-० असा पराभव स्विकारावा लागला. सामन्यचप्रया सुरूवातीला दोन्ही संघांनी आक्रमक सुरूवात केली. १५ व्या मिनिटाला शिवम रॉय याने गोल करून ठाणे संघाला महत्वपूर्ण अशी १-० आघाडी मिळवून दिली. पुर्वार्धात ही आघाडी कायम होती. उत्तरार्धात पुणे संघाला ही आघाडी मोडून काढता आली नाही आणि पुणे संघाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. उपांत्य फेरीमध्ये दाखल होताना पुणे संघाने हिंगोली संघाचा ६-० असा तर, उप-उपांत्यपुर्व फेरीमध्ये रायगड संघाचा २-१ असा पराभव केला होता. पुणे संघासह स्पर्धेत अमरावती, अकोला, हिंगोली सातारा, ठाणे, अहमदनगर, पालघर, अमरावती आणि मुंबई हे संघ सहभागी झाले होते.

# एचआर कॅपिटा, ट्रोजन्स क्रिकेट, एलके इलेव्हन संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एचआर कॅपिटा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने आयोजित पहिल्या छत्रपती करंडक मिश्र कॉर्पोरेट टी 20 क्रिकेट स्पर्धेत एचआर कॅपिटा क्रिकेट क्लब, ट्रोजन्स क्रिकेट क्लब, एलके इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

ब्रिलियंट्स क्रिकेट अकादमी व स्केल अप मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सौरभ रावलिया 85धावा) याने केलेल्या सुरेख फलंदाजीच्या जोरावर एचआर कॅपिटा क्रिकेट क्लब संघाने फिनिक्स इलेव्हन संघाचा 87 धावांनी पराभव केला.

दुसऱ्या लढतीत रोहित सिंग(51धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ट्रोजन्स क्रिकेट क्लब संघाने एक्सपेंडेबल्स वायओ संघाचा 6 गडी राखून पराभव केला. अन्य





लढतीत विपुल खैरे(3-16 व नाबाद 58) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर एलके इलेव्हन संघाने गट्स अँड ग्लोरी संघाचा 5 गडी राखून पराभव केला.

# सातारा वॉरियर्स व पुणे वॉरियर्स संघाच्या सराव सत्राला प्रारंभ; खेळाडूंना आव्हान रोहित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) आणि वूमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) या स्पर्धेत यंदा नव्याने समावेश करण्यात आलेल्या पुरुष गटात सातारा वॉरियर्स आणि महिला गटात पुणे वॉरियर्स या संघांच्या पहिल्या सराव सत्राचे उदघाटन महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहीत पवार यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

अक्षय त्रितीयेच्या मुहूर्तावर अथ एलिट मैदानावर पार पडलेल्या या उदघाटन समारंभास वाईन इंटरप्रिंसेस प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आणि पुणे वॉरियर्स व सातारा वॉरियर्स संघाचे मालक मनप्रीत उप्पल, जीजी इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आणि सातारा वॉरियर्स संघाचे मालक गौरव गढोक, एमसीएच्या संघटनेच्या कार्यकारी समितीचे सदस्य व ग्राउंड कमिटीचे अध्यक्ष सुशील शेवाळे, एमसीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी



अजिंक्य जोशी, गोयल गंगा समूहाचे संचालक अनुज गोयल आदी मान्यवर उपस्थित होते.

खेळाडूंना उद्देशून एमसीएचे अध्यक्ष रोहित पवार यावेळी म्हणाले की, सातारा वॉरियर्स आणि पुणे वॉरियर्स संघाच्या फ्रँचायझी मालकांनी खेळाडूंसाठी सरावासाठी अत्यंत उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. खेळाडूंना त्यांनी योग्य तो मान दिला आहे. त्याबद्दल मी मनप्रीत उप्पल व गौरव गढोक यांना खेळाडू व संघटनेच्या वतीने धन्यवाद देतो. आम्ही सर्वांनी मिळून एमपीएल सुरु केली, त्यावेळी आमच्या मनात एकच हेतू होता कि, महाराष्ट्रातील खेळाडूंना उत्तम आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत आणि साऱ्या जगाने त्यांचे कौशल्य पाहिले पाहिजे.

पुणे वॉरियर्स व सातारा वॉरियर्स संघांचे फ्रँचायझी मालक हे अतिशय चांगल्या कुटुंबातील उत्तम व्यावसायिक असून त्यांनी क्रिकेटवरील प्रेमापोटी हे संघ खरेदी केले आहेत. तसेच,तुम्हाला तज्ञ प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ उपलब्ध करून दिला आहे. आता तुम्हाला हे लक्षात ठेऊन सर्वोत्तम कामगिरी करणे आवश्यक आहे, या स्पर्धेच्या माध्यमातून आयपीएलच नव्हे तर भारतीय निवड समितीचे देखील लक्ष तुमच्यावर राहणार आहे आणि त्यामुळेच तुमचे भविष्य खऱ्या अर्थाने घडणार आहे.

तुम्ही सर्व खेळाडू हे चांगल्या कुटुंबातून आणि साध्या परिस्थितीतून आलेले आहात.आम्ही तुमच्यावर पूर्ण विश्वास ठेवलेला आहे. त्यामुळे तुम्ही आपले सर्वोतोपरी योगदान देणे आवश्यक आहे. तुम्ही सर्व खेळाडूंमध्ये चांगली गुणवत्ता असल्याची आम्हाला खात्री आहे. परंतु तुम्हाला हे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जे मित्र लागतात ते हे फ्रँचायझी मालक आहेत. त्यांनी केलेल्या प्रचंड गुंतवणुकीतून त्यांना फायद्याची अपेक्षा नसून केवळ महाराष्ट्रातील खेळाडूंना उज्वल भवितव्य प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी हि गुंतवणूक केली आहे.

# पहिल्या टी-२० मध्ये पाकिस्तानने बांगलादेशला हरवले



**नवी दिल्ली :** पहिल्या टी-२० सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा ३७ धावांनी पराभव केला. यासह, संघाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. बुधवारी लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ७ गडी गमावून २०१ धावा केल्या. २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी बांगलादेश मैदानात उतरला आणि १९.२ षटकांत सर्वबाद १६४ धावांवर बाद झाला. पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाने अर्धशतक (५६) झळकावले. ही त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळी होती. शादाब खानने 48 तर हसन नवाजने 44 धावांचे योगदान दिले. शादाबने दोन विकेट घेतल्या आणि दोन झेलही घेतले. सलमान आगाने ३४ चेंडूत ५६ धावा केल्या. पाकिस्तानकडून कर्णधार सलमान आगाने ३४ चेंडूत ५६ धावा केल्या. शादाब खानने २५ चेंडूत ४८ धावा आणि हसन नवाजने २२ चेंडूत ४४ धावा केल्या. सलमानने मोहम्मद हरिस (३१) सोबत तिसऱ्या विकेटसाठी ४८ आणि हसन नवाज सोबत चौथ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी केली. शेवटच्या षटकांमध्ये, शादाब आणि फहीम अश्रफ (नाबाद ११) यांनी सातव्या विकेटसाठी फक्त २२ चेंडूत ५० धावा जोडत संघाला २०० धावांच्या पुढे नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. बांगलादेशकडून शरीफुल इस्लामने ३२ धावांत दोन बळी घेतले. हसन अलीने ५ विकेट्स घेतल्या. बांगलादेश संघ १९.२ षटकांत १६४ धावांवर ऑलआउट झाला. संघाकडून कर्णधार लिटन दासने सर्वाधिक ४८ धावा केल्या. झाकीर अली (३६) आणि सलामीवीर तन्जीद हसन (३१) यांनाही त्यांच्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयश आले. पाकिस्तानकडून हसन अलीने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या.

# बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात विरेश शरणार्थी याला, मुलींच्या गटात निहिरा कौल यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पुणे जिल्हा 17 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात विरेश शरणार्थी याने, तर मुलींच्या गटात निहिरा कौल यांनी अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात नवव्या फेरीत पहिल्या पटावर विरेश शरणार्थीने अविरत चौहानचा पराभव करून 8.5गुणांसह विजेतेपद पटकावले.




विरेश शरणार्थी याने क्वीन्स गॅम्बिट पद्धतीच्या ओपनिंगने प्रारंभ केला. विरेश हा सिटी इंटरनॅशनल स्कूल मध्ये दहावी इयत्तेत शिकत आहे. तर, प्रथमेश शेरलाने भुवन शितोळे चा पराभव करून 7.5 गुण(51.5बुकोल्स कट) याने दुसरा क्रमांक पटकावला. तिसऱ्या पटावरील लढतीत श्लोक शरणार्थी याने आरव धायगुडे चा पराभव करून 7.5गुण(50.5बुकोल्स कट) याने तिसरा क्रमांक मिळवला.

मुलींच्या गटात सातव्या फेरीत निहिरा कौल हिने श्रावणी उंडाळेला बरोबरीत रोखले व 6 गुणांसह विजेतेपद पटकावले. निहिरा हिने फ्रेंच डिफेन्स पद्धतीने आपल्या डावास सुरुवात केली व 42चालीमध्ये श्रावणी उंडाळेला बरोबरीत रोखले. निहिरा हि पवार पब्लिक स्कूल मध्ये आठवी इयत्तेत शिकत आहे. तर, सई पाटील हिने दुर्वा बोंबलेचा पराभव करून 6गुण(28.5बुकोल्स कट) हिने दुसरे स्थान मिळवले. अनुष्का कुतवळ हिने मेहेक कटारिया चा पराभव करून 5.5गुणांसह तिसरे स्थान पटकावले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूला करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण राष्ट्रीय बुद्धिबळपटू व बुद्धिबळ प्रशिक्षक अनिल राजे, पीडीसीसीचे सह सचिव शेखर जोरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर आयए विनिता श्रोत्री आदी मान्यवर उपस्थित होते.

# शुभमन गिल व ऋषभ पंत भारतीय संघाचे भविष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरने नवनियुक्त कर्णधार शुभमन गिल आणि उपकर्णधार ऋषभ पंत यांना भारतीय संघाचे भविष्य म्हटले आहे. तो म्हणाला- ते दोघेही (गिल आणि पंत) मोठे खेळाडू आहेत आणि भारतीय क्रिकेटचे भविष्य आहेत.

३३ वर्षीय गोलंदाज म्हणाला - गिल आणि पंत यांचे स्वभाव वेगवेगळे आहेत. गिल शांत आणि गंभीर स्वभावाचा आहे, तर पंत खेळकर स्वभावाचा आहे. हे देखील त्या दोघांचे एक वैशिष्ट्य आहे. याशिवाय, शार्दुल माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि दिग्गज फलंदाज विराट कोहली यांच्या निवृत्तीबद्दलही बोलला. शार्दुल म्हणाला- ते दोघे आसपास असल्याने मला सुरक्षित वाटायचे.

गिल आणि पंत यांनी अनेक वेळा मोठी कामगिरी केली आहे आणि यामुळे ते भविष्यात भारतासाठी आशादायक खेळाडू बनतात.

२४ मे रोजी बीसीसीआयने शुभमन गिलची भारतीय कसोटी संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती केली. तर, ऋषभ पंतला या संघाचा उपकर्णधार बनवण्यात आले. रोहित-कोहलीच्या निवृत्तीवर शार्दुल म्हणाला- ड्रेसिंग रूममधील सर्वांना रोहित आणि कोहलीची आठवण येईल. दोघेही कसोटी क्रिकेटला पुढे नेत होते, परंतु जेव्हा एखाद्या खेळाडूला वाटते की तो पूर्वीइतके योगदान देऊ शकणार नाही तेव्हा निवृत्ती हा वैयक्तिक निर्णय असतो.

# गतिमंद चिंतामणीची वेटलिफ्टिंगमध्ये भरीव कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हडपसर (पुणे) येथील चिंतामणी राऊत हा गतिमंद विशेष मुलगा. त्याने स्वतःच्या हिमतीवर मोठे व्हावे, ही त्याच्या वडिलांची तीव्र इच्छा. त्याच्या शारीरिक ठेवणीचा आणि भविष्याचा विचार करून त्याने वेटलिफ्टिंगमध्ये भवितव्य घडविण्याचा मनोदय निश्चित केला आहे.

आजघडीला राऊत कुटुंब त्याला घडविण्यात गुंतले असून, चिंतामणीने ऑलिम्पिकमध्ये कामगिरी करावी, असा निर्धार केला आहे. चिंतामणीचे वडील बाळासाहेब राऊत यांनी व्यस्त व्यावसायिक जीवनातून वेळ काढून चिंतामणीला घडविण्याचे ठाम ध्येय ठेवले. त्यांच्या इच्छेला पत्नी रूपाली, मुली कादंबरी व ऋतुजा यांनीही खंबीर साथ दिली.

**७व्या वर्षांपासून प्रयत्न सुरू**

चिंतामणीला सातव्या वर्षांपासून घडविण्यासाठी कुटुंबीयांनी प्रयत्न सुरू केले. जोरबैठका, धावणे, उड्या मारणे आदी शिकण्यासाठी दोन वर्षे खर्ची घातली. आई-वडिलांसह बहिणींनीही परिश्रम घेतले. राजहंस मेहंदळे यांच्याकडे चिंतामणीने प्रशिक्षण घेतले.

'पॉवरलिफ्टिंग'चे राज्य सचिव संजय सरदेसाई, सहायक सचिव रवींद्र यादव यांचे मार्गदर्शन मिळाले. चिंतामणीला पाँडिचेरीला प्रशिक्षण देण्याचे ठरविले. वर्षभरापासून राऊत कुटुंब त्याच्यासोबत प्रशिक्षणासाठी पाँडिचेरी मुक्कामी आहे.



नुकत्याच झारखंड येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत चिंतामणी ९३ किलो वजन गटात खेळला. ऑलिम्पिकमध्ये खेळलेल्या याच गटातील खेळाडूचे रेकॉर्ड त्याने मोडले. याच जोरावर चिंतामणी ऑलिम्पिकमध्ये यश मिळवेल, असा विश्वास आहे.

## आठवी 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धा

# फोर लायन्स्, स्टेपओव्हर फुटबॉल संघांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आठव्या 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धेत स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमी संघांनी आक्रमक खेल का प्रदर्शन करते हुए आपल्या प्रतिद्वंदी टीमला हरवून विजेता खिताब जीता.

बावधन येथील हॉटफुट अॅकॅडमीच्या मैदानावर आयोजित १३ वर्षाखालील गटामध्ये अंतिम गटसाखळी सामन्यांमध्ये स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीने उत्कर्ष क्रीडा मंच फुटबॉल अॅकॅडमीचा ६-० असा सहज




पराभव केला. यामध्ये तनवीश खैरनार याने दोन गोल नोंदविले. याशिवाय विरेन शर्मा, राघव मांडवे, श्रवण कुकडे आणि वरद दोशी यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. फोर लायन्स् फुटबॉल अॅकॅडमी आणि स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमी यांच्यामधील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. सामन्यात फोर लायन्स् संघाकडून ओम शिंदे याने तर, स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीकडून वरद दोशी याने गोल नोंदविले. स्पर्धेत स्टेपओव्हर फुटबॉल अॅकॅडमीने १४ विजय, एक बरोबरी (टाय) आणि एकही पराभव न स्विकारता ४३ गुणांसह अव्वल स्थान मिळवले. फोर लायन्स् संघानेही १४ विजय, एक बरोबरी (टाय) आणि एकही पराभव न स्विकारता ४३ गुण मिळवले. परंतु चार गोल फरकांमुळे संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुणे हॉटफुटचे मुख्य (ऑपरेशन) इवॅन डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संयोजक केतन सरोदे, सहभागी संघांचे प्रशिक्षक, खेळाडू आणि पालक उपस्थित होते. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना करंडक आणि पदक देण्यात आले.

#रा